THE BOOK WAS
DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_192902
UNIVERSAL
LIBRARY

लघुकथासंग्रह

# — ताडगोळे —

लेखक—

शंकर कृष्ण आठवले,

एम्. ए. एल् एल्. बी. ॲडव्होकेट.

मार्च १९३९ ] [ १ रुपया

मुद्रकः—
कृष्णाजी नारायण सापळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग,
त्रिभुवनरोड, मुंबई नं. ४

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

प्रकाशकः—
शंकर कृष्ण आठवले,
एम्. ए. एल् एल्. बी.
शिक्षानगर, गिरगांव, मुंबई नं. ४

तुम्हाला तुमचें खरें भविष्य जाणण्याची जिज्ञासा आहे ना ?

तर मग

५० वर्षांचा अनुभव असलेल्या

**पंडित पी. रामराव उपाध्ये**

ह्यांना अवश्य भेटा.

( पं. पी. रामराव ह्यांच्या धंद्याचा सुवर्ण-महोत्सव २८ ऑगस्ट १९३८ ला साजरा करण्यांत आला. )

**धि इन्डियन इन्स्टिट्यूट**

**ऑफ**


**ॲस्ट्रॉलॉजी ॲंड सामुद्रिक**

सरदार गृह–पहिला मजला, मुंबई नं. २

संस्थापक:–पं. पी. रामराव उर्फ परशुराम वामन उपाध्ये.

संचालक:—गणेश परशुराम उपाध्ये, बी. कॉम्.

# दृष्टीशिवाय सृष्टी व्यर्थ !



या करितां आपल्या डोळयांची काळजी घ्या.

आमचेकडे शास्त्रोक्त पद्धतीनें डोळे मोफत तपासून व डॉक्टरच्या नंबराप्रमाणें चष्मा गॅरंटीसह दिला जातो. आधुनिक पद्धतीचा सर्व तऱ्हेचा मनपसंत माल माफक दरांत मिळण्याचें एकच प्रसिद्ध ठिकाण—

## दि स्टार ऑप्टिकल कंपनी,

प्लाझा सिनेमासमोर, दादर, मुंबई

---

वियोगाच्या कष्टप्रद समयीं—
एकत्रितपणाच्या रसिकक्षणीं—
तुमचें हृदय उल्हसित होईल—
'व्हॅन्गार्ड'मध्यें काढलेल्या तुमच्या आप्तेष्टांच्या फोटोनें

## व्हॅन्गार्ड स्टुडिओज्

२६५ गिरगांव रोड, ठाकुरद्वार, मुंबई. (टे. नं. २५७८२)


---

मुंबई व अहमदाबाद येथें दक्षिणी पद्धतीचें सुग्रास
जेवण व इतर फराळ ह्यासाठीं

## तांबे आरोग्य भुवनांतच या

दुकानें:— मुंबई-फोर्ट, ठाकुरद्वार, दादर.
अहमदाबाद—बालाहनुमान गांधी रोड.

गरिबांना आणि श्रीमंतांना सारखाच उपयोगी—




# अद्भुत मॅग्नेट ताईत

नाना प्रकारच्या उपाधींनीं ग्रस्त झालेल्या जनतेच्या कल्याणासाठीं, योगविद्येच्या साह्यानें, अत्यंत परिश्रम करून, हा ताईत तयार करण्यांत आला आहे. त्यापासून होणारे फायदे—

(१) मनांतली इच्छा पुरी होऊन संपत्ति व संतति प्राप्त होते.
(२) मानसन्मान, कीर्ति आणि यश प्राप्त होतात.
(३) शत्रुंवर विजय मिळतो. वैवाहिक सौख्य मिळते.
(४) कोर्टाचें कामांत यश मिळून नोकरींत बढती मिळते.
(५) पापग्रहांच्या वाईट दृष्टीचा परिणाम टळतो व सर्व ग्रहांची शुभ दृष्टी रहाते.
(६) चेटकें, भुताटकी वगैरे पासून संरक्षण होतें.
(७) कांहीं कारणामुळें ज्यांच्या मैत्रींत बिघाड झाला आहे अशा मित्रांची आणि प्रेमीजनांची पुनः पूर्ववत् मैत्री होते.
(८) सर्व प्रकारचीं संकटें आणि आकस्मित आपत्तींपासून बचाव होतो.


**नं. ४ चा ताईत – किंमत २ रुपये ८ आणे**

[ चांदीच्या 'केस'मध्यें ] [ टपालहंशील जादा ]

## प्रो. मोतीवाला हिप्नॉटिस्ट

**टी. आर. १९४, ओल्ड पार्शी स्टॅच्यु,**
**इम्पीरिअल बॅंकेसमोर, मुंबई नं. ८**
[ टेलिफोन नं. ४२७२७ ]

Under the distinguished Patronage
of the Citizens of Bombay



**Messrs**

# SOMAN & SONS

**SCIENTIFIC OPTICIANS**

*Saraswati Nivas,*
*Thakurdwar,*
*BOMBAY 2.*

THE ONLY QUALITY HOUSE FOR
SCIENTIFIC SPECTS.

Eyes examined free. Trial Solicited.

# कोटयावधी रुपये मिळतात

## पण केव्हां

## अनुकूल कालांत उद्योगधंदा केला तरच

द्रव्य मिळण्याचा प्रत्येक वर्षातला अनुकूल काल काढून घेऊन व्यवहार करा–खात्रीनें फायदा होईल.

**अनुकूल काळ काढून देण्याची फी सात रुपये.**
**प्रत्येक वर्षाची फी आगाऊ.**

## ज्यो. धामणीकर

C/o शं. कृ. आठवले
शिक्षा नगर, गिरगांव, मुंबई.

## विमा कोठें उतराल ?

# धी ऑल इंडिया सिक्युरिटी लाईफ अँड जनरल अॅशुरन्स कं. लि. वरच

**तुमची व तुमच्या कुटुंबियांची जबाबदारी टाका.**

हिंदुस्थानांतील प्रत्येक जिल्ह्याकरतां चीफ एजन्टस् नेमणें आहेत. विम्याची माहिती असलेल्या गृहस्थांस सढळ अटी. तसेंच ऑर्गनायझर्स, इन्स्पेक्टर्स्, एजंटस् म्हणून काम करूं इच्छिणारे स्त्री-पुरुष भरपूर पगारावर व कमिशनवर पाहिजेत. **आजच लिहा—**

**ऑल इंडिया सिक्युरिटी लाइफ अँड जनरल अशुरन्स कं. लि.**

**हेड ऑफिस—**

पांचवा मजला — सर विठ्ठलदास चेंबर्स. १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

# कालवश झालेल्या

स्वजनांची स्मृति चिरंजीव करण्याकरितां ‘ व्हॅन्गार्ड ’च्या कलेचें साह्य घ्या !

**वैशिष्ट्य—**

कितीहि जुना, अस्पष्ट, पिवळा तसेंच ग्रुप फोटोमधून वेगळा काढून हुबेहुब एन्लार्जमेन्ट

**कलात्मक फोटोग्राफीचें सुप्रसिद्ध ठिकाण—**

# व्हॅन्गार्ड स्टुडिओज्

**३६५ ठाकुरद्वार पोस्टासमोर, मुंबई. टे. नं. २५७८२**

# दृष्टीमुळेंच सृष्टी

आयुष्य समाधानकारक घालविण्यासाठीं
नजर साफ असावी लागते !

कोणत्याही कारणामुळें जर तुमच्या डोळ्यांस
त्रास होत असेल तर

सर्वांच्या खात्रीचें आणि विश्वासू

## चष्म्यांचे व्यापारी

## आर एन्. शिंदे ॲण्ड सन्स

यांच्या येथें डोळ्यांच्या हॉस्पिटलमध्यें काम कर-
णाऱ्या तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून घ्या.

उत्तम माल व माफक दर !

(१) २०७ गिरगांवरोड, मुंबई नं. ४
(२) चमारबाग, पोयबावडी, मुंबई नं. १२
(३) रानडे रोड, दादर, मुंबई नं. १४
(४) शिवाजीचौक, कल्याण.
(५) खडे बझार, बेळगांव

# रसग्रहण

श्री. शंकर कृष्ण आठवले एम्. ए. एल्. एल्. बी. यांच्या लेखणींतून उगवलेले हे वीस 'ताडगोळे' प्रास्ताविक विलंब न करतां तावडतोबच मला वाचकांच्या हातांत द्यावयास पाहिजेत; कारण 'ताडगोळे' ही चीजच अशी आहे कीं, तिचा आस्वाद घेतांना फार दीर्घसूत्रीपणा केल्यास त्यांच्यांतील लसलशीत आणि रसरशीत लज्जत विनाकारण ओसरून जावयाची! श्री. आठवले यांचे हे 'ताडगोळे' नांवाप्रमाणेंच डौलदार आकर्षक आणि 'पाणीदार' आहेत. मात्र सामान्यत: ताडगोळ्यांच्या गाभ्यांतून जो मधुर आणि लुसलुशित द्रव चोषावयाला मिळतो त्याऐवजीं या 'ताडगोळ्या'मध्यें अतिशय जलाल नि झणझणीत असाच मसालेदार रस चाखावयाला मिळेल—जिभेबरोबर हृदयालाही चांगलाच चटका बसेल—कदाचित् त्या झिणझिण्या मस्तकापर्यंत पोहोंचल्यावांचून रहाणार नाहींत! या 'ताडगोळ्यां'त समाजाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालील असाच जळजळीत मालमसाला भरलेला आहे. पाश्चात्य जीवन आणि विचारसरणीच्या एकसारख्या होत असलेल्या आक्रमणामुळें मध्यमवर्गीय हिंदुसमाजाची अत्यंत तिरपीट उडालेली आहे. शेंकडों वर्षें जतन करून ठेवलेल्या पारंपरिक कल्पना, रूढ ध्येयें, सामाजिक संकेत यांना जबरदस्त धक्का बसल्यामुळें, समाजाची घडी विस्कळली कीं काय असा क्षणभर मनांत संभ्रम उत्पन्न होतो. समाजांतले पूर्वींचे शिस्तीचे लगाम पुष्कळच

सैल पडल्यानें म्हणा किंवा जीवनांत स्वतंत्र विचाराचें वारें जास्त खेळूं लागल्यामुळें म्हणा नवीन जमान्याची घडी स्थिर-स्थावर होई तोंपर्यंत मध्यंतरीच्या या काळांत समाजांत पुष्कळच गोंधळ माजल्याशिवाय रहाणार नाहीं. या संक्रमण काळांतील कांहीं हृदयभेदक दृश्यें श्री. आठवले यांनीं आपल्या मर्मभेदक दृष्टीनें निवडून या लघुकथासंग्रहांत मांडलेलीं आहेत.

सवंग देशभक्तीच्या आलेल्या पर्वणींत, विलासलोलुप आणि स्वार्थसाधु ' देशभक्त ' आपला लग्गा कसा साधतात ( पान १ ), समाजांतील असहाय्य बालविधवांच्या जीवनावर भोंवतालचे कावळे आणि बगळे निंदेचे शिंतोडे उडवून त्यांना जगणें कसें अशक्य करून सोडतात ( पान ४ ) कामुक वृत्तीचे दांभिक लोक आपला हेतु साधण्यासाठीं मानीव 'बहिणीं'चीं नातीं कशीं जोडतात ( पान १४ ), नवमतवादाच्या नांवाखालीं विवाहित पुरुष पत्नीव्यतिरिक्त इतर संबंध कसे जमवतात (पान १९), देवळांतले कांहीं बदमाष पुजारी अस्पृश्यांना देवळांत यावयाची बंदी करून स्वत: मात्र देवालयाच्या पवित्र प्राकारांत काय काय अनन्वित प्रकार करतात ( पान ३१ ), मातृत्व ही अत्यंत सामर्थ्यवान् शक्ति असूनही समाजनिंदेपुढें ती किती दुबळी ठरते ( पान ३८ ), सिनेमांत पदार्पण करणाऱ्या ' कुलीन ' नटींना शेवटीं आपल्या कुलिनत्वाला कसें मुकावें लागतें (पान ७४), असे आजकाल समाजाच्या हृदयांत बोचणारे अनेक भेदक प्रश्न ह्या लघुकथांमध्यें आलेले आहेत. ' विजयेचा विजय ' ही गोष्ट कोणत्याही वाचकाच्या भावना पिळवटून टाकल्यावांचून रहाणार

नाहीं. एका वाक्याच्या फटकाऱ्यांत सबंध चित्रचें चित्र उभें करण्याचें अनुपम कौशल्य श्री. आठवले यांच्या लेखणींत आहे. शब्दांचा आणि वर्णनांचा विनाकारण फापटपसारा निर्माण न करतां अगदीं मोजक्या, आवश्यक आणि रेखीव शब्दांत कथाभाग ठळकपणें रंगविण्याची कला श्री. आठवले यांच्यामध्यें आहे. समाजाच्या जीवनाशीं वाङ्मय निगडित असलें पाहिजे या आधुनिक साहित्यविषयक विचाराशीं श्री. आठवले यांचें हें लिखाण सर्वस्वीं जुळणारें असेंच आहे. समाजाला धक्के देऊन जागृत करण्याचें श्री. आठवले यांच्या लेखणींत असलेलें सामर्थ्य याहीपेक्षां वाढेल असा मला विश्वास वाटतो. सदर 'ताडगोळ्यां'चा आस्वाद घेतल्यानंतर मनांत एक प्रकारची अस्वस्थता उत्पन्न होईल व मस्तक भडकून जाईल आणि वाचक समाजाकडे डोळे उघडून ताठर दृष्टीनें पाहूं लागेल !

म्हणूनच या 'ताडगोळ्यां'ना 'बॉंबगोळे' हें नांव दिलें असतें तरी तें शोभण्यासारखें होतें ! यांत सर्व कांहीं आलें !

२३ फेब्रुवारी १९३९ }
सारस्वत वसाहत, पुणें १. }

प्रल्हाद केशव अत्रे.

# प्रस्तावना

श्री. शंकर कृष्ण आठवले एम्. ए. एल्. एल्. बी. यांचें लिखाण वाचकांच्या परिचयाचें आहे. समाजांतील निरनिराळ्या प्रसंगांतील चालनात्मक विचार श्री. आठवले यांनीं आपल्या जोरदार लेखणींतून लघुकथारूपानें वाचकांपुढें मांडले आहेत. श्री. आठवले यांची भाषा प्रगल्भ, प्रौढ व भारदस्त आहे आणि वर्णनशैली चटकदार व स्पष्ट आहे. लेखकाचे मनांतील विचार सहजसुलभ गोष्टींत गुंतवल्यामुळें सामान्य वाचकांसही ते समजण्यासारखे आहेत. जुनें तें सोनें असें मानणारा सनातनीपक्ष आणि नवमतवादी व पुरोगामी विचारसरणी या दोहोंमध्यें असणारा तारतम्यभाव व उजवेडावेपणा यांचें गुणदोषात्मक विवेचन श्री. आठवले यांनीं स्थूलरूपानें मांडण्याचा जो प्रयत्न केला आहे तो यशस्वी झाला आहे. सामाजिक संक्रमणकाळांत जुन्यानव्याचा गोंधळ मोठमोठ्या विचारी पुरुषांसही कसा धक्के देतो याचें जिवंत उदाहरण श्री. आठवले यांच्या कथांमधून दृग्गोचर होतें.

" गण्डान्तर " व " त्याचा विनयभंग " या गोष्टींतील शास्त्र व रूढि यांचें विवेचन वाचकांस चांगलेंच आवडण्यासारखें आहे. देशकाल परिस्थितीनुरूप चालीरितींत व धर्मांतही बदल केला पाहिजे या तत्वास पोषक असेंच विवेचन ह्या गोष्टींत केलेले आढळतें. तसेंच " राजयक्ष्मा " ही गोष्ट वाचून मोठेपणाची हाव प्रत्येकानें आपापल्या कुवतीप्रमाणेंच ठरविली पाहिजे हा

बोध घेण्यासारखा आहे. ध्येय व परिस्थिति यांची सांगड घालणें प्रत्येक व्यक्तीस कसें अत्यंत आवश्यक आहे हें श्री. आठवले यांनीं वरील गोष्टींवरून सूचित केलें आहे. " न ओढलेली सिगारेट " ही गोष्ट चटकदार व मनोरंजक वाटते. कांहीं गोष्टींतून श्री. आठवले यांनीं ज्याप्रमाणें समाजांतील विशिष्ट भावनांची एक बाजू मांडली आहे त्याचप्रमाणें जर समाजांतील सात्त्विक व तेजस्वी भावनांवर कांहीं लघुकथा ते आपल्या ओजस्वी लेखणींतून उतरवितील तर त्या समाजास बोधप्रद व उपयुक्त झाल्याशिवाय रहाणार नाहींत असा आम्हांस विश्वास आहे.

३ मार्च १९३९
विजय निवास, ३१ सी फस
चौपाटी, मुंबई नं. ७

**केशव बाळकृष्ण जोशी,**
एम्. ए. एल्. एल्. बी. सॉलिसिटर.

# चार शब्द

सूचकता, संयम, उत्कंठासंवर्धन, परिणामकारक शेवट, कथानकाचा विकास, भाषेचा विलास, अलंकारप्राचुर्य, भावनांचा परिपोष इत्यादि तांत्रिक प्रश्नांच्या कसोटीला प्रस्तुत लघुकथासंग्रहांतल्या 'ताडगोळ्यां'तला रस कितपत उतरेल हा एक प्रश्नच आहे. तथापि हा प्रश्न टीकाकारांच्या कक्षेंत येतो आणि टीकाकार आपल्या रसायनशाळेमध्यें 'ताडगोळ्यां'तल्या रसाचें रासायनिक पृथ:करण करतीलहि.

लेखकाची भिस्त सामान्य पण सहृदय वाचकांवर आहे. ह्या वाचकांना हे ताडगोळे नीरस किंवा बेचव लागणार नाहींत आणि त्यांतील रसाच्या बाबतींत त्यांचा विरस होणार नाहीं असा लेखकाचा अंदाज आहे.

लघुकथांतील विषयांची एकांगी निवड, बऱ्याचशा कथांमधील त्रोटकपणा, भाषा वापरतांना न वापरलेला आडपडदा, समाजांतील उच्च व नीच थरांशीं समरस होण्याच्या अलिकडे रूढ होऊं पहाणाऱ्या प्रथेबद्दल दिसून येणारी अनास्था आणि विचारसरणीमध्यें कांहीं वेळां आढळून येणारा गांभीर्याचा अभाव—हीं वैशिष्ट्यें हें पुस्तक वरवर चाळणाऱ्यालाहि दिसून येतील. ह्या बाबतींत, हीं वैशिष्ट्यें सहेतुक आहेत एवढेंच लेखक सांगूं इच्छितो.

'मैनी' ह्या कथेचें कथानक एका बंगाली कथेवरून सुचलें आहे.

' रसग्रहण ' केल्याबद्दल प्रि. अत्रे ह्यांचा, सुंदर प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल श्री. के. बा. जोशी एम्. ए. एल्. एल्. बी. सॉलिसिटर ह्यांचा, पुण्याचे श्री. दत्तोपंत नगरकर बी. ए. व ' उषा ' मासिकाचे संपादक श्री. ह. वि. देसाई ह्यांचा लेखक मनापासून आभारी आहे.

' बॉंबगोळे ' ह्या नांवानें दुसरा लघुकथासंग्रह यथावकाश प्रसिद्ध करण्याचा लेखकाचा मानस असून तो लघुकथासंग्रह रसिक वाचकांना आवडेल अशी लेखकाला आशा आहे.

२ मार्च १९३९<br>
शिक्षा नगर<br>
गिरगांव, मुंबई नं. ४

रसिकांचा नम्र,<br>
**शंकर कृष्ण आठवले.**

---

*

# *W. G. HARCHEKAR*

## GOLD & SILVER ORNAMENTS
## MERCHANT

Kohinoor Cinema Building,
Lady Jamshetji Road,
Dadar, BOMBAY.




STOCKIST OF MOST EXQUISITE PATTERNS
IN GOLD & SILVER ORNAMENTS
AND ARTICLES

**आमचा अगदीं नवीन अमरज्योती हार भगिनींना
फारच आवडूं:लागला आहे.**

# क था क्र म


| कथेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ शोध लागला | १ |
| २ शिंतोडे | ४ |
| ३ सूड | ११ |
| ४ मानलेला भाऊ ! | १४ |
| ५ रहस्यस्फोट | १९ |
| ६ परीक्षकांचा कट | २६ |
| ७ मारुतीचा अश्रुपात ! | ३२ |
| ८ राजयक्ष्मा | ३४ |
| ९ बंधनाच्या अलिकडे | ३८ |
| १० न ओढलेली सिगारेट | ४० |
| ११ चंचला | ४६ |
| १२ विजयेचा विजय ! | ५१ |
| १३ धर्मपत्नी ! | ६१ |
| १४ गण्डान्तर | ६७ |
| १५ कुलीन नटी | ७४ |
| १६ मैत्री | ८१ |
| १७ त्याचा विनयभंग | ८९ |
| १८ संभावित | ९३ |
| १९ चुकलेली वाट | ९६ |
| २० समाजसेवक ! | १०१ |

Why not be a perfect stenographer ?
Problem of unemployment—
Solve it at once

*by joining*

# Model Shorthand
# &
# Typewriting Institute

*212, Girgaum Road, Kelewadi Naka,*
*BOMBAY 4.*

Principal:–**S. B. Padhye.**

Ambitious Men,

This is your opportunity to train for success. Model Institute also undertakes Type-copying and Duplicating at Moderate Rates.

A trial will convince you of our quality work.

Model Shorthand & Typewriting Institute is the ***Model Institute.***

## १

# शोध लागला

दोघेहि देशभक्त. दोघांच्या डोक्यांवर खादीची टोपी. पण देशभक्ती-शिवाय इतर कोणत्याहि बाबतींत दोघांमध्यें गुणांचें साधर्म्य दिसून येत नसे. एकाची मुद्रा करारी तर दुसरा अजागळ, एकाचा संताप सात्विक तर दुसरा प्रत्यक्ष जमदग्नीचा अवतार! एक वाचाळ तर दुसरा स्तब्धतेचा जणुं काय स्तंभच! एक ब्रह्मचर्याचा कट्टा पुरस्कर्ता तर दुसरा विलासप्रिय!

दोघांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर असतांहि देशभक्तीच्या बाबतींत दोघांची एकवाक्यता कशी झाली? दोघेहि देशभक्त कसे झाले? देशभक्तीचा खडतर मार्ग तपस्वी–ब्रह्मचाऱ्याला आणि विलासी–भ्रमराला सारखाच कसा मानवला? लोक आश्चर्यमूढ झाले. ‘असं कसं होईल’ हा प्रश्न सर्वांच्या डोक्यांत एकसारखा घोळूं लागला.

* * *

महात्मा गांधींनीं कायदेभंग पुकारला.

खादीचा डगला चढवून, ऐषआरामांत, ‘साईड बिझनेस’ (Side Business) म्हणून, फावल्यावेळीं, देशभक्ती करण्याची वेळ निघून गेली. टाळ्यांच्या गजरांत लांबलचक व्याख्यानें झोडण्याचे दिवस आतां संपले.

प्रत्यक्ष कार्य करण्याची वेळ आली. जहाल देशभक्तांना रात्रंदिवस चैन पडेनासें झालें. स्वदेशासाठीं आपण कोणता पराक्रम केव्हां गाजवावा या प्रश्नाचा उलगडा करण्यांत त्यांचे तासचे तास खर्च होऊं लागले. तोतये देशभक्तांची तारांबळ तर कांहीं विचारूंच नका ! तो खडतर कारागृहवास, त्या हालअपेष्टा, ती उपासमार, त्यांच्या डोळ्यांपुढें एकसारखीं थैमान घालूं लागलीं. देशभक्तीच्या पेचांतून सुटण्याचा मार्ग कसा सांपडेल हा एकच विचार त्यांना सतावून सोडूं लागला. डोकें खाजविण्यास त्यांनीं प्रारंभ केला. पळवाट कशी काढतां येईल याचा ते विचार करूं लागले.

कापडाच्या दुकानांवर 'पिकेटिंग' होऊं लागले. जिकडे तिकडे केशरी साड्या झळकूं लागल्या–देशसेविकांची जणूं काय सांथच पसरली.

विलासी देशभक्ताला विलक्षण पेंच पडला. निर्गुण परब्रह्माची उपासना करणें फार दुर्घट आहे. देशभक्ती म्हणजे काय ? ती डोळ्यांना दिसत नाहीं, तिला स्पर्श करतां येत नाहीं. मग निर्गुण 'देशभक्ती'ची उपासना करणार तरी कशी ? भक्तिमार्गांत पडलेला आणि प्राथमिक अवस्थेंत असलेला मुमुक्षू निर्गुण परब्रह्माची उपासना करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. उपासनेचा तो मार्ग त्याला झेपत नाहीं.

देशभक्तीची उपासना करण्यापेक्षां देशसेवेच्या प्रतिकाची–देशसेविकेचीच–उपासना करणें उत्तम असा एक विचार विलासी देशभक्ताच्या मनांत चमकून गेला.

ठाकुरद्वारीं ती कापडाच्या दुकानांवर 'पिकेटिंग' करूं लागली. परदेशी कापडावरील बहिष्काराचें महत्त्व लक्षांत घेऊन मोठ्या दूरदर्शीपणानें विलासी देशभक्तानेंहि हेंच काम पत्करलें !

त्याची आणि तिची ओळख झाली. तो देशभक्त ! ती देशसेविका ! तो तिचा व्यवसायबंधु–ती त्याची व्यवसायभगिनी ! व्यवसायबंधुभगिनींची मैत्री जमण्यास कितीसा अवधी लागणार !

तो कच्चा भक्त नव्हता. नवविधा भक्ती त्याला पूर्णपणें अवगत होती.

तो तिचा भक्त झाला. आपली आराध्य–देवता प्रसन्न राहावी म्हणून तिच्या बरोबर तो रात्रीं सिनेमाच्या शेवटल्या ‘शो’ला जाऊं लागला.

शेवटीं व्हावयाचें तेंच झालें. भक्ताला देवतेचा विरह सहन होत नाहीं आणि देवतेला भक्तावर प्रसादाचा वर्षाव केल्याशिवाय चैन पडत नाहीं !

‘अभिनंदनीय मिश्रविवाह’ ह्या शीर्षकाखालीं एके दिवशीं दोघांचे फोटो वर्तमानपत्रांतून चमकले. वधुवरांच्या धाडसाची तारीफ होऊं लागली. समाजसुधारक म्हणून त्यांचा गौरव होऊं लागला.

ह्यावेळीं तपस्वी देशभक्त येरवड्याच्या जेलमध्यें सूत काढीत बसला होता. राजद्रोहात्मक भाषण केल्याच्या आरोपावरून त्याला तीन वर्षांची शिक्षा फर्मोविण्यांत आली होती.

अखेर गूढ उकललें. विलासी देशभक्त, देशभक्त नसून देशसेविकाभक्त आहे असा शोध लागला !

# २

## शिंतोडे

विचारी लोकांना वाटे कीं, ती बालविधवा म्हणजे गरीब गाय आहे—भेदरलेलें एक कोंकरूं आहे.

तरुण उच्छृंखल लोकांना वाटे कीं, ती एक फुलपाखरूं आहे—ती एक मैना आहे.

जुन्या पिढींतील पोक्त बायका छातीठोकपणें सांगत कीं, तिनें मागच्या जन्मीं पाप केलें व म्हणूनच ह्या जन्मीं ती बालविधवा झाली.

सकाळीं उठल्याबरोबर प्रसंगवशात् त्या बालविधवेचें म्हाताऱ्यांना दर्शन घडे. त्यावेळीं त्यांच्या अंगाचा तिळपापड होई.

ह्याच जुन्या पिढींतील कांहीं रंगेल म्हातारे मात्र तिच्याबद्दल आपल्याला सहानुभूतीची उकळी फुटल्याचा बहाणा करीत. तिच्याशीं मनमोकळेपणानें गप्पा मारायला मिळाव्या म्हणून आपल्या वार्धक्याच्या जोरावर ते तिच्या जवळ जात व चार कळकळीचे—अथवा प्रेमाचे—शब्द तिला सांगत.

ती बालविधवा आहे म्हणजे तिनें गेल्या जन्मीं पाप केलें असलेंच पाहिजे असा निष्कर्ष त्यांनीं काढला होता.

नव्या पिढींतील लोकांची कल्पनाशक्ति मात्र म्हाताऱ्यांच्या कल्पनाशक्ति-इतकी चलाख नव्हती. तरुण पिढीचें तर्कशास्त्राचें ज्ञान इतकें हुकमी नव्हतें.

तिला पाहिल्यावर ते गोंधळांत पडत—तिच्या पापपुण्यासंबंधीं कसलाच निष्कर्ष त्यांना काढतां येत नसे.

तिला रस्त्यामध्यें पाहणारे लोक म्हणत–हिला भटकण्याची संवय आहे. तिला खोलीमध्यें बसलेली पाहिली कीं पाहाणारे लोक म्हणत–ही वस्ताद आहे. आपण काय करतों याचा पत्ता ही लागूं देत नाहीं.

तिला ट्रॅममध्यें पाहिली कीं लोक म्हणत–लोकांना झुलवायला ही बाहेर निघाली आहे. रेल्वे स्टेशनवर जर ती कोणाला दिसली तर ते म्हणत–हिची आज कुठें तरी ' अॅपॉइंटमेंट ' आहे.

रस्त्यावरून जातांना जर ती एकटीच दिसली तर लोक म्हणत–ती कुणाला तरी भेटायला निघाली आहे. रस्त्यांतून जातांना क्वचित् एखादा नातेवाईक जर तिच्याबरोबर असला तर सभ्य लोक कांहींच बोलत नसत. मात्र पुनः पुनः मागें वळून तिला आणि तिच्याबरोबर असणाऱ्या माणसाला न्याहाळण्याचा मोह त्यांना आवरत नसे.

दुपारीं दोन वाजतां ती शिवणाच्या क्लासला जाऊं लागली कीं, कांहीं कुजबुजत–हें निव्वळ ढोंग आहे. ही फसवणूक आहे. संध्याकाळीं पांच वाजतां ती पेटीच्या क्लासला जात असे. त्यावेळीं ते म्हणत–ती ' हॅंगिंगगार्डन'वर जात आहे.

अस्सल सनातनी म्हणत–तिनं केशवपन केलं पाहिजे. सुधारक म्हणत–तिनं पुनर्विवाह लावावा हें चांगलं. महिलांच्या पुढारी म्हणून मिरविणाऱ्या बायका म्हणत–तिनं कुंकू लावायला सुरुवात करावी. स्वतःला शहाण्या समजणाऱ्या कांहीं बायकांनीं तर तिला केवळ गौर पहाण्यासाठींच नव्हे तर चैत्र-गौरीच्या वासंतिक हळदीकुंकवासाठीं निमंत्रण केलें.

तिच्यावर डोळा ठेवणारे ' बुवा ' म्हणत–परमेश्वराच्या सेवेंतच तिनं आयुष्य घालवावं. ही सेवा तिनं आमच्याजवळ राहून केलेली बरी म्हणजे आमचं तिच्यावर चांगलं लक्ष ( ! ) राहील.

शिक्षकिणी म्हणत–हिनं 'व्हर्नाक्युलर–फायनल 'ची परिक्षा देऊन शाळेंत शिक्षकिणीची नोकरी पत्करावी. कांहीं अनुभवी दूरदर्शी डॉक्टर म्हणत–हिनं ' नर्सिंग मिड्वाइफ्री 'चा कोर्स पुरा करावा व मग हॉस्पिटलमध्यें नर्सची ' ड्युटी ' करावी.

कांहीं विधुर म्हणत–शिकण्याच्या भानगडींत न पडतां स्वयंपाकासाठीं अथवा घरकामाकरतां आमच्याकडे हिनं आपलं घर समजून रहावं.

तिचा प्रसन्न चेहरा पाहून—

विचारी लोकांना वाटे–बिचारी शहाणी आहे. प्राप्त झालेल्या परिस्थितींत समाधानानें दिवस काढणारी आहे. टवाळखोर लोक म्हणत–हिचं कुठं तरी जमलं आहे!

तिचा विषण्ण चेहरा पाहून—

सभ्य लोक म्हणत–बिचारीवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली आहे. ती रडेल नाहींतर काय करील? टवाळखोर लोक म्हणत–तिचं अजून कुठंहि जमत नाहीं. बिचारी मोठ्याच काळजींत दिसते.

कधीं कधीं जर ती किर्तनाला किंवा देवदर्शनाला गेली तर संभावित लोक म्हणत–देवळांत ही बालविधवा कुणाचं दर्शन घेते–देवांचं कीं पुरुषांचं? आणि जर ती संध्याकाळच्या वेळीं देवदर्शनाला गेली नाहीं तर दुसरे संभावित लोक म्हणत–गॅलरींत उभं राहून वेळ घालविण्याऐवजीं देवदर्शन व कथाश्रवण ह्या मध्येंच तिनं आपलं मन आतां रमविलं पाहिजे.

बेजबाबदार लोक म्हणत–वैधव्यपंकांत रुतलेली ही गाय त्या पङ्कांतून बाहेर काढण्यास आम्ही तयार आहोंत. पण ती आम्हांला बोलावितच नाहीं!

पोक्त बायका म्हणत–हिनं पुरुषांचं दर्शनहि घेतां कामा नये. उरलेला काळ हिनं ईश्वराच्या सेवेंत घालवावा.

छिचोर विधवा मनांत म्हणत–आमच्याप्रमाणं ही पुरुषांत मिसळत नाहीं. आयुष्यांतील गंमत बिचारीला अजून समजली नाहीं!

* * * *

'सुशीलाबाई, मग तुम्हीं करणार तरी काय?'

मास्तर पुढें बोलणार होते. पण कंठ दाटून आल्यामुळें तोंडावाटे त्यांचे शब्द बाहेर पडले नाहींत.

सुशिलेची वृद्ध आई किर्तनाला गेली असतां संधी साधून मास्तरांनीं आज सुशिलेची मुद्दाम भेट घेतली.

‘ मास्तर, बालविधवेला कांहींच करतां येत नाहीं.’ सुशिलेनें जबाब दिला.

‘ कांहींच करतां येणार नाहीं ? ’

‘ होय.’

‘ कां ? ’

‘ तिनं कांहींहि केलं तरी लोक तिला स्वस्थ बसूं देत नाहींत.’

‘ स्पष्ट बोलल्याबद्दल रागावूं नका—मला वाटतं तुम्हीं पुनर्विवाह करणं उत्तम. ’

‘ पुनर्विवाह ’ हे शब्द ऐकतांच सुशिलेच्या डोळ्यांपुढें तिच्या पतीची अंधुक मूर्ति उभी राहिली. पतिची मूर्ति दिसूं लागल्यामुळेंच तिला किंचित् भय वाटलें असावें असें तिच्या कावऱ्याबावऱ्या चेहऱ्यावरून दिसलें.

‘ मास्तर, पुनर्विवाह—मी पुनर्विवाह करूं ? ’

‘ होय. ’

‘ कसा—आणि कुणाशीं ? ’—अडखळत मोठ्या माराकुटीनें सुशिलेनें शब्द उच्चारले.

‘ कुणाशीं हें मी कसं सांगूं ? ’

‘ तुम्हाला नाहीं का सांगतां येणार ? ’ अत्यंत दीन मुद्रा करून सुशिलेनें प्रश्न विचारला.

सुशीला स्फुंदूं लागली. मास्तरांच्या हृदयांतहि विलक्षण कालवाकालव सुरू झाली.

* * * *

मे महिन्याची सुट्टी असल्यामुळें मास्तर घरींच होते. पंधरा दिवसांपूर्वींच त्यांची पत्नी निवर्तली होती व त्यामुळें भकास उदासीनतेच्या आणि भीषण विषण्णतेच्या दाट छायेनें त्यांचा मुखप्रांत व्यापला होता.

एकाएकीं त्यांच्या मनांत काय विचार आला कुणास ठाऊक ! कोटाच्या खिशांतील ‘फाऊन्टनपेन’ त्यांनीं बाहेर काढलें व टेबलाजवळ खुर्ची ओढून एका गुलाबी ‘नोटपेपर’वर त्यांनीं लिहिण्यास सुरुवात केली.

' सुशिलाबाई,

माझी पत्नी जिवंत असताना तुमच्याशीं पुनर्विवाह लावण्याचें धैर्य मी दाखवूं शकलों नाहीं त्याबद्दल क्षमा करा. तुमच्या असहाय्य स्थितीबद्दल मला खरीखुरी कळकळ वाटत असतांहि माझ्या पत्नीच्या मनावर आघात होऊं नये म्हणून मी तुमच्याशीं पुनर्विवाह लावण्याची तयारी किंवा मनोधैर्य त्यावेळीं दाखविलं नाहीं. आतां तुमची जर इच्छा असेल तर तुमच्याशीं मी विवाह लावूं इच्छितों. **—मास्तर.'**

मास्तरांनीं तो कागद पाकिटांत घातला आणि पाकीट बंद केलें.

* * * *

निष्पाप सुशिलेला वाटे—पुनर्विवाह करावा. ती अबला, विधवा आणि गरीब होती. पण त्या तिन्ही गोष्टींना तिचा इलाज नव्हता आणि म्हणून त्या निराधार स्थितींत कोणाच्या तरी बाहुचा आसरा असलेला बरा असें तिला वाटूं लागलें.

पण पुनार्विवाह केला तर लोक काय म्हणतील असा प्रश्न करून तिचें मन तिला भेडसावूं लागलें.

ती पत्र लिहूं लागली.—

' मास्तरसाहेब,

पुनर्विवाह लावला तर कुचेष्टेखोर लोक माझी टवाळी करतील व प्रतिष्ठित स्त्रिया माझा उपहास करतील म्हणून पुनर्विवाह लावण्याचं धाडस माझ्या हातून होईल असं वाटत नाहीं.

तुमची शेजारीण,

**सुशीला.'**

* * * *

पुनर्विवाह लावला तर सभ्य व सदाचारी म्हणून मिरविणारे लोक धर्मबाह्य वर्तन केल्याबद्दल आपला तिरस्कार करतील, चेष्टा करतील अशी सुशिलेची कल्पना होती.

पण पुनर्विवाह न लावतांहि, अलिकडे लोकनिंदेच्या फटक्यांमुळें ती पोळून निघूं लागली.

# शितोडे

मास्तरांची पत्नी निवर्तल्यापासून लोकांमध्यें विलक्षण प्रवाद उठले होते.

मास्तर तिचे शेजारी आणि त्यांत कांहीं महिन्यांपूर्वी त्यांची पत्नी निवर्तलेली. मग काय विचारतां ? लोकांनीं तर्कांचे मजल्यावर मजले चढविण्यास प्रारंभ केला.

‘ मास्तर सुशिलेच्या शेजारीं राहतात. ते विधुर आहेत—सुशीला विधवा आहे. सुशिलेची आई वृद्ध—सुशिलेवर कुणाचा दाब नाहीं. मास्तरांचा आणि सुशिलेचा संबंध असलाच पाहिजे.’

‘ जातस्य हि ध्रुवो मृत्युः ’ हें तत्त्व लोकांना माहित होते. परंतु मास्तरांच्या पत्नीनें आतांच कां मरावें हा विषय कांहीं शोधक बुद्धीच्या लोकांनीं संशोधनासाठीं घेतला.

‘ मास्तरांचा आणि सुशिलेचा पहिल्यापासूनच संबंध होता ही गोष्ट मास्तरांच्या पत्नीला कशी आवडणार ? नवऱ्याच्या बदफैलीपणामुळें तिला जबर धक्का बसला व म्हणून त्या माऊलीला प्राणाला मुकावं लागलं.’ संशोधकांनीं शोध लावला.

कांहीं म्हणत—मास्तरांचा सुशिलेशीं संबंध आल्यामुळें त्यांना आपली बायको आवडेनाशी झाली. म्हणून त्यांनीं तिचा छळ केला. त्यामुळंच बिचारीचं मरण ओढवलं.

एके दिवशीं तर ह्या कुटाळकीचा अगदीं कळस झाला. लोकनिंदेच्या कठोर प्रहारामुळें उदासीन बनलेली सुशीला अलिकडे बाहेर जात नसे.

पण चांडाळ चौकडी म्हणूं लागली—सुशिला बाहेर पडत नाहीं. कांहीं तरी घोटाळा आहे खास !

सुशिलेच्या कानांवर ही कुणकुण येतांच तिचें रक्त सळसळूं लागलें.

‘ पुनर्विवाह केला नाहीं तरीहि लोक छळतातच. मग त्यापेक्षां पुनर्विवाह लावलेला काय वाईट. ’ तिच्या मनांत विचार आला.

* * * *

कुटाळखोरांच्या जाचाला कंटाळून सुशिलेनें मास्तरांशीं पुनर्विवाह लावला

खरा. पण त्यामुळें लोकप्रवादांचा ओघ ओसरण्याऐवजी त्याला जोराची भरती आली.

कुटाळखोरांची कल्पना झाली कीं, आपला अंदाज खरा ठरला व म्हणून ते आपली पाठ आपणच थोपटूं लागले.

' पहा ! मास्तरांनीं जमविलंच कीं नाहीं. मी हें अगोदरच ताडलं होतं.' एकजण दुसऱ्याला सांगूं लागे.

मास्तरांची पत्नी निवर्तल्याबद्दल कळकळ आणि हळहळ व्यक्त करून दुसरा म्हणे, ' मास्तर तिच्या मरणाचीच वाट बघत होते. पहा, आतां लावलाच कीं नाहीं त्यांनीं सुशिलेशीं पुनर्विवाह.'

' हे शाळेंतले मास्तर—काय करतील आणि काय नाहीं ! ' तिसरा म्हणे.

' अरे मास्तर दिसतो साधाभोळा. पण रंगेल आहे स्वारी. ' चौथा सांगे.

' बालविधवा कधीं शुद्ध राहिल्या आहेत काय ? त्यांना पुनर्विवाहाशिवाय कसं चैन पडणार ? ' पांचव्याच्या तोंडातून मुक्ताफळें निघत.

' त्या मास्तरची काय हिंमत आहे पुनर्विवाह लावण्याची ! कांहींतरी घोटाळा झाला असावा व म्हणून तिनं त्याला पुनर्विवाह लावण्यास भाग पाडलं असावं.' विशेष शोध लावल्याचा आविर्भाव करून सहावा सांगे.

त्या सर्व गोष्टी सुशिलेच्या कानावर येत नव्हत्या असें नाहीं. लोकनिंदेच्या शिंतोड्यांचा हा भडिमार कसा चुकविता येईल हा सुशीला व मास्तर यांच्यापुढें एक जबरदस्त प्रश्न होता.

## ३

# सूड

हास्यविनोदाला अगदीं ऊत आला होता. निमंत्रित मंडळी श्रीखंडपुरीवर चांगलाच हात मारीत असल्याचें दिसत होतें.

उन्हाळा नुकताच सुरू झाला असल्यामुळें किंचित् उकाडा होत होता. म्हणून व मिष्टान्नांचा समाचार घेत असतांना होणाऱ्या श्रमाचा परिहार व्हावा ह्या उद्देशानें विजेच्या पंख्यांनीं आपली घरघर सुरू केली होती.

रेडिओंतील कर्णमधुर संगीत कानावर पडत असल्यामुळें प्रत्येकजण अगदीं खुशींत होता.

मंडळींचीं मनें सुप्रसन्न राहावीं म्हणून उंची उदबत्त्याहि पेटवून पानांपुढें मांडल्या होत्या. त्यांचा सुवास तेथील हवेंत दरवळून राहिला होता.

तथापि धुगधुगणाऱ्या उदबत्त्यांच्या त्या लहानग्या जिवांची, अत्यंत झगझगीत प्रकाशानें तळपणाऱ्या विद्युद्दीपांना दादहि नसावी असें दिसत होतें. मोठ्या दिमाखानें मंडळींना प्रकाश पुरविण्याचें काम त्यांनीं चालविलें होतें.

ते कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नव्हते. तथापि त्यांचा विलक्षण ताठरपणा आणि कमालीची बेपर्वाई तेथें पडलेल्या प्रकाशाच्या झोतामध्यें प्रतीत होत होती.

मागील डब्यांना चालना दिल्याबद्दल आगगाडीच्या इंजिनला जशा प्रकारची प्रौढी वाटावी तशाच प्रकारची प्रौढी हातातोंडाना चालना देण्याच्या कामीं लोकांना मदत केल्याबद्दल त्या दिव्यांना वाटत होती.

त्या दिवशीं त्यांचा रुबाब कांहीं और होता ह्यांत संशय नाहीं. त्यांचा तो डामडौल व थाटमाट पाहून त्यांना अहंकाराचा कैफ चढला असला पाहिजे अशी कोणाचीहि खात्री झाली असती.

त्यांच्यापैकीं कांहींचें गाल अगदीं लालबुंद दिसत होते. कांहींनीं जांभळा कोट चढवला असून कित्येकांच्या अंगांत पांढरा स्वच्छ शर्ट शोभत होता.

त्यांची दृष्टी अगदीं निश्चल होती. कसल्या तरी गूढ चिंतनांत ते गर्क झाले असल्याचें स्पष्ट दिसलें. ते पूर्वीचे दिवस त्यांना आठवले.

समई, मेणबत्ती, चिमणी, कंदील, पेट्रोमॅक्स व इन्कन्डीसन्ट लॅम्पस्‌चीं चित्रें त्यांच्या दृष्टीसमोर हलूं लागलीं.

तीं चित्रें दिसूं लागल्यावर त्यांना गालांतल्या गालांत हसूं आलें व मनांत विचारांची गर्दी उसळली.

'अंगांत बिलकूल त्राण नाहीं. तोंडाच्या फुंकरेनेंही तिचा जीव जाईल' —मिणमिण जळणाऱ्या समईची आठवण होऊन एकजण म्हणाला.

'बेढब—अवजड—अंगांत सौजन्याचा लवलेश नाहीं.' पेट्रोमॅक्सची स्मृति होऊन दुसऱ्याला वाटलें.

'पांढऱ्या पायाची—शेळपट !' पांढऱ्या मेणबत्तीची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहिल्यामुळें तिसऱ्याला वाटूं लागलें.

'चेहरा अगदीं निस्तेज—अंगांत दम नाहीं' चिमणीकंदिलाबद्दल चवथ्याला वेचार सुचला.

'सोसाट्याच्या वाऱ्यालाहि आम्ही दाद देणार नाहीं' स्वसामर्थ्याचा विचार मनांत प्रबळ पावल्यामुळें सर्व म्हणूं लागले.

'टापटीप, स्वच्छता, तत्परता ह्या गुणांच्या जोरावर आपण नांव कमाबलें असून त्यांना चीत केलें आहे' आपल्या विलक्षण लोकप्रियतेबद्दल अभिमान वाटून सर्वजण म्हणूं लागले.

त्यावेळीं त्यांना अहंकाराची धुंदी चढूं लागली. समई मेणबत्तीसारख्या क्षुद्र जिवांशीं आपली तुलना करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल कांहीं जणांना तर अतिशय लाज वाटली.

विजयोन्मदानें ते अगदीं बेहोष होऊन गेले होते. संताप—उपहास—तिरस्काराच्या मिश्र छटा त्यांच्या चेहऱ्यांबर स्पष्टपणें उमटल्या होत्या. त्या बेभान स्थितींत त्यांना 'काय करूं आणि काय नको' असें होऊन गेलें.

इतक्यांत—

किंचित् फटकन् आवाज झाला.

पंख्यांची घरघर हलुहळू बंद पडली.

रेडिओंतल्या संगीताचे कर्णमधुर आलाप ऐकूं येईनासे झाले.

लोकांची धांवपळ सुरू झाली.

मिस्किल लोक ओरड करूं लागले.

मेणबत्तीनें त्या दिवाणखान्यांत प्रथम प्रवेश केला. तिची ती तेजपूर्ण प्रशांत मुद्रा पाहून लोकांना समाधान वाटलें. नंतर समई डौलानें मिरवूं लागली. चिमण्या व कंदीलहि चमकूं लागले.

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं मागें राहणें पेट्रोमॅक्सलाही प्रशस्त वाटेना. यथाशक्ति साह्य करण्याच्या उद्देशानें त्यानेंहि तळपण्याला प्रारंभ केला.

समई, मेणबत्ती, चिमणी, कंदिल व पेट्रोमॅक्स सर्वजण वर पाहूं लागले. विजेच्या दिव्यांनीं माना खालीं घातल्या होत्या. कित्येकांचे चेहरे हिरवे पिवळे दिसत होते. फजीति झाल्यामुळें ते अगदीं ओशाळून गेले होते. कांहीं मिनिटांपूर्वी त्यांच्या तोंडांवर चमकणाऱ्या तेजाचा आतां पूर्णपणें लोप झाला होता.

# ४

# मानलेला भाऊ !

त्याला एक बहिण होती खरी. पण चार पांच वर्षांपूर्वी विषमज्वराच्या सांथींत तिचा अंत झाला होता.

कधीं कधीं बहिणीची मूर्ति त्याच्या डोळ्यांसमोर उभी राही आणि त्यावेळीं त्याला अगदीं भडभडून येई.

कित्येक वेळां वाईटांतून चांगलें निघतें ही गोष्ट त्याला माहीत होती. आपल्या बहिणीच्या मृत्युमुळें एखादी चांगली गोष्ट घडण्याचा संभव आहे किंवा काय असा विचार त्याच्या मनांत क्वचित् प्रसंगीं चमकून जाई. ह्या प्रश्नाबाबत त्यानें एक दिवस खूप विचार केला. मरणासारख्या पराधीन व अपरिहार्य गोष्टीबद्दल एकसारखा शोक करण्याइतका तो कमकुवत मनाचा नव्हता.

बहिणीनें इहलोकची यात्रा संपविली खरी पण त्यामुळें मला मात्र माझ्या यात्रेंत रोमान्स करण्याची संधी मिळणार आहे अशी कल्पना त्याच्या मनांत उद्भवे व बहीण मेली हें एक प्रकारें बरें झालें असा एक ओझरता विचार त्याच्या मनाला चाटून जाई. मात्र, इतके नीच व क्षुद्र विचार उद्भवल्याबद्दल त्याची त्यालाच अतिशय लाज वाटे व ह्या विषयासंबंधीचा आणखी विचार करण्याचें तो सोडून देई

बहिणीच्या मृत्युमुळें व मृत्यूनंतर त्याची ऐहिक यात्रा गंमतीदार कशी काय होऊं शकतें हा विषय भोळ्याबाबळ्या लोकांना सहजासहजीं आकलन करतां येण्यासारखा नव्हता. तथापि त्याला ह्या विषयाचा पुरा उलगडा झाला होता.

## मानलेला भाऊ !

आपल्याला एखादी मानलेली बहिण असावी व आपण तिचा मानलेला भाऊ म्हणून मिरवावें अशी इच्छा त्याच्या मनांत अलिकडे प्रबळ होऊं लागत होती.

' मानलेला भाऊ ' होणें ह्या घटनेमध्यें ' रोमान्स ' चे झरे दडून राहिले आहेत असा त्याचा तर्क होता.

स्त्रिया, सौंदर्य, व्यभिचार, कामवासना हे विषय निघाले म्हणजे तो अगदीं पोपटासारखा बोलूं लागे. त्यावेळीं त्याची मति यत्किंचित्‌हि कुंठित होत नसे.

नाहीं म्हणायला इंग्रजी पांचव्या यत्तेंत मात्र त्याची मति कुंठित झाली होती. तीं संस्कृत रूपें, अंकगणितांतले ते आंकडे, तें व्याकरण आणि त्या परीक्षा—ह्या साऱ्या गोष्टी त्याला झेपेनाशा झाल्या.

'सुशिक्षित बेकारांची संख्या दिवसेंदिवस फुगत आहे—ह्यापुढें शिकण्यांत काय अर्थ आहे' असें लोकांजवळ तो नेहमीं म्हणे. जणूं काय आपण अत्यंत दूरदर्शीपणानेंच शाळेला रामराम ठोकला असें भासविण्याचा त्याचा प्रयत्न असे.

* * * *

त्याच्या मानानें ती पुष्कळ श्रीमंत होती. शिक्षणाच्या दृष्टीनें विचार करतांहि दोघांमध्यें बरेंच अंतर होतें. पहिल्या यत्तेपासून दोघेहि एकाच वर्गात असल्यामुळें दोघांची मैत्री जरी नव्हे तरी दाट ओळख होती.

ती 'इंटर आर्ट्स'मध्यें होती. त्यानें 'टाईपरायटींग'चा कोर्स पुरा करून ' मोटार ड्रायव्हींग'चा कोर्स नुकताच हातीं घेतला होता.

तिला भाऊ नव्हता.

आपल्याला भाऊ नाहीं असा विचार तिच्या मनांत कधीं कधीं येई व त्यावेळीं आणि विशेषतः भाऊबीजेच्या दिवशीं तिला किंचित् खेद वाटे. जीवाभावाच्या मैत्रिणींजवळ ही गोष्ट ती बोलून दाखवी.

त्याच्या जवळहि ही गोष्ट तिनें कित्येक प्रसंगीं स्पष्ट केली होती. कारण तिचा स्वभाव मनमोकळा होता. आपल्या हृदयांतील गुपितांचा दाट परिचयाच्या माणसांजवळ स्फोट केल्याशिवाय मनमोकळ्या माणसांना चैन कसें पडणार ?

तिच्याशीं भावाचें नातें जोडावयाचा त्यानें बेत केला.

परंतु तें नातें केव्हां व कसें जोडावयाचें हा त्याला पेंच पडला.

पुष्कळ वेळां तो डोकें खाजवून पाही–खूप विचार करी–परंतु कांहीं केल्या समाधानकारक उपाय सुचत नसत. मांजराच्या गळ्यांत घंटा बांधण्या-संबंधाच्या उंदरांच्या बेताची त्याला आठवण झाली. बेत ठरविणें जितकें सोपें तितकेंच तो पार पाडणें कठीण असल्याबद्दल त्याची खात्री झाली.

भाऊ नसल्यामुळें आपल्या मनाला वाटणाऱ्या विषादाचा ती त्याच्याजवळ जेव्हां उल्लेख करी तेव्हां त्याच्या मनांत अत्यंत चुळबूळ होई. तुझा भाऊ होण्यास मी एका पायावर तयार आहें असें तिला चटकन् सांगून मोकळे व्हावें असा त्याच्या मनांत त्यावेळीं पटकन् विचार येई. परंतु एकाएकीं दुसऱ्या क्षणींच त्याचा धीर खचून जाई.

विचारी मन म्हणे–पण ती काय म्हणेल ! तिनं मनांत भलताच संशय घेतला तर ? त्यापेक्षां असल्या भानगडींत न पडणंच बरं.

विकारी मन विचारी–नेहमीं भिऊन भिऊन काय साध्य होणार ? प्रेमिक, प्रियतमेजवळ प्रेमाची घोषणा करण्यास घाबरतो काय ?

विचारी मन उत्तर देई–ह्याच प्रेमिकांपैकीं कित्येकांना थप्पडा खाव्या लागत नाहीं काय ? असभ्य प्रश्न विचारल्याबद्दल त्यांची चांगलीच फजीति उडत नाहीं का ? प्रेमाचा स्वीकार होण्याचें भाग्य सर्वांनाच लाभेल काय ?

इतक्यांत विकारी मनानें उचल खावी आणि म्हणावें–धडाडीशिवाय कार्यभाग कसा साधणार !

योग्य संधी मिळतांच आपली मनीषा तिला कळविण्याचें धाडस करण्याचें त्यानें ठरविलें.

पुष्कळ वेळां शब्दांपेक्षां कृतीच अधिक प्रभावी ठरते–कित्येक वेळां बोलण्यापेक्षां मौनांतच गूढ अर्थ भरलेला असतो–ह्याची त्याला जाणीव होती.

चांगली संधी केव्हां सांपडेल ह्याची त्याच्या मनाला एकसारखी हुरहूर लागली.

सुदैवानें त्याला फारशी वाट पहावी लागली नाहीं.

*　　　*　　　*

## मानलेला भाऊ !

भाऊबीजेचा दिवस उजाडला.

'तुम्हाला कोणती वस्तु आवडते?' संध्याकाळीं तो तिला विचारीत होता.

तो तिच्या दाट परिचयाचा होता. तथापि तिच्या घरीं जाण्याचा त्याचा आजपर्यंत परिपाठ नव्हता.

त्याच्या अनपेक्षित आगमनामुळें ती अगोदर किंचित् आश्चर्यचकित झालेली होती. त्यांत त्याच्या चमत्कारिक प्रश्नानें तर ती अगदींच घोटाळ्यांत पडली.

'कितीतरी वस्तु मला आवडतात!'—त्याला उत्तर मिळालें.

'तसं नव्हे हो. सगळ्यांत अधिक काय आवडतं तुम्हांला?' त्यानें स्पष्टीकरण केलें.

अजूनहि त्याच्या म्हणण्याचा तिला नीटसा अर्थ कळला नाहीं. ती बुचकळ्यांत पडली.

'आज भाऊबीज आहे ना—म्हणून विचारतो' त्यानें अर्थाची आणखी फोड केली.

'अस्सं! अस्सं! मग मला काय ओंवाळणी घालण्याचा विचार आहे वाटतं?'—मानेला किंचित् हिसका देऊन तिनें विचारलें.

'ओंवाळून घेतल्याशिवाय राहूं नये म्हणतात ना?' तो उद्गारला.

नंतर ओंवाळणीदाखल द्यावयाच्या वस्तुबद्दल त्यांची बरीच चर्चा झाली आणि कापडाच्या दुकानांत जाऊन तिच्या पसंतीचें जरीचें सुंदर पातळ खरेदी करण्याचें त्यांनीं ठरविलें.

टॅक्सी करून दोघांनीं दुकान गांठलें.

तिनें त्याला आजपासून भाऊ मानण्याचें ठरविलें व ओंवाळणीचा समारंभ पार पडल्यानंतर त्याला तसें स्पष्ट बोलूनहि दाखविलें. भावाप्रमाणें आपल्यावर प्रेम करणारा एक तरी पुरुष मिळाला ह्या विचारानें तिला खरोखरच अतिशय आनंद झाला होता.

हवी होती तीच गोष्ट त्याच्या कानावर पडली. 'रेसकोर्स'वर गेलेला मनुष्य मोठें बक्षीस पटकावून विजयोन्मादानें ज्याप्रमाणें घरीं परत यावा त्याचप्रमाणें अतिशय हर्षित होऊन तो घरीं परतला.

तिच्या आईबापांनाहि त्याच्याबद्दल कौतुक वाटलें.

*   *   *   *

तो तिचा मानलेला भाऊ व ती त्याची मानलेली बहिण असल्यामुळें दोघेहि एकमेकांच्या घरीं वारंवार जात येत असत.

त्यांच्या वर्तणुकीबद्दल तिच्या भोळ्याभाबड्या आईबापांना कधींहि संशय आला नाहीं.

तो दगा देईल अशी तिची मुळींसुद्धां कल्पना नव्हती.

तथापि एके दिवशीं ती त्याच्या घरीं गेली असतां तिच्यावर चमत्कारिक प्रसंग ओढवला.

मोठ्या शिताफीनें त्याच्या तडाख्यांतून तिनें आपली सुटका करून घेतली. त्याच्या दुष्ट मनोवासनेबद्दल तिला संशय उरला नाहीं.

आपल्या आईवडिलांच्या कानावर ही गोष्ट कशी घालावी ह्याचा त्या नरपशूच्या तावडींतून सुटून घरीं आल्यावर ती एकसारखा विचार करूं लागली.

आपण त्याच्याकडे जाण्याचा परिपाठ ठेवला म्हणूनच आपल्यावर हा प्रसंग ओढवला असें म्हणून आई व वडील आपल्यालाच दोष देतील असें तिला वाटूं लागलें.

त्या ढोंगी कामांध नराधमाची तिला चीड आली.

संतापानें तिचें मस्तक सुन्न झालें. हळुहळू अंगांत ताप भरूं लागला. तापाचा जोर वाढूं लागल्यामुळें ती बिछान्यावर स्वस्थ पडून राहिली.

तो नराधम आपल्यावर जबरदस्ती करण्याच्या तयारीनें पुढें सरसावत आहे असें तिला अर्धवट गुंगींत पडलेल्या स्वप्नामध्यें दिसलें.

जबरदस्तीच्या भीतीनें जागी होऊन तिनें एकदम किंचाळी फोडली व ‘ अरे, तूं मानलेला भाऊ ना ’ असें उद्गार काढले.

त्या उद्गारांचा व किंचाळीचा तिच्या आईला अर्थ समजला.

दुसऱ्या दिवसापासून त्याची तिच्या घरची खेप बंद झाली.

## ५

# रहस्यस्फोट

‘ तुम्हीं बायका म्हणजे कमालीच्या संशयी ! ’

‘ आणि तुम्ही पुरुष म्हणजे कमालीचे प्रामाणिक ! कोणीहि तुमच्यावर डोळे मिटून विश्वास ठेवावा ! ’

‘ पुरुषांच्या नांवांनीं खडे फोडण्याचा आजकाल बायकांनीं रिवाज पाडला आहे खरा. स्त्री सुशिक्षित असली कीं तिनें पुरुषांवर ताशेरा झाडलाच पाहिजे. समाजसुधारक म्हटला कीं त्यानें स्त्रियांची बाजू घेऊन पुरुषांवर हल्ला चढविलाच पाहिजे. पुरुषजातीची ज्या नाटककाराला व्यवस्थित बदनामी करतां येते तोच उत्कृष्ट नाटककार ! समाजसुधारणेची त्यालाच खरी कळकळ ! ’

‘ थांबा. मी अशी फसणार नाहीं बरं ! हिच्यापुढं व्याख्यानबाजी केली म्हणजे ही आपला प्रश्न विसरून जाईल अशी तुमची कल्पना असेल ! पण आतां मी पूर्वीइतकी भोळी राहिलें नाहीं हो ! बोला, कमलिनीकडे जाऊन आलांत कीं नाहीं ? ’ अरविंदच्या वाक्यप्रवाहाला प्रतिबंध करून वत्सला म्हणाली.

वत्सलेनें मुद्दयालाच हात घातलेला पाहून अरविंद किंचित् चपापला. कमलिनीच्या व आपल्या प्रेमसंबंधाचा हिला सुगावा तर लागला नसेल ना अशी शंका त्याच्या मनांत उपस्थित झाली. ‘ बोल, चोरी केलीस ना ’ असा प्रश्न विचारल्यावर पळून जाऊं इच्छिणाऱ्या–पण दुर्दैवानें हातीं सांपडलेल्या–चोराची जी अवस्था होते तशीच अरविंदची झाली. तथापि उसनी ऐट व धैर्य अंगांत आणून तो म्हणाला—

'वत्सले, तुला वेड तर लागलं नाहीं ना? कमलिनी मला माझ्या बहिणी-सारखी! तिच्याबद्दल पापवासना माझ्या मनांत कधीं तरी येणं शक्य आहे का?'

'नवमतवाद्यांचा भरवंसा कोणीहि धरूं नये' वत्सलेनें टोमणा मारला.

'वत्सले, तुझ्या शपथ मी कमलिनीकडे गेलों नाहीं.'

'नवमतवाद्यांना शीलाची जितकी किंमत असते तितकीच शपथांचीहि असते!' वत्सलेनें पुनः टोमणा मारला.

'माझ्या वर्तनाबद्दल तूं भलताच संशय घेशील याची मला कल्पना आहे. म्हणूनच कमलिनीच्या घरीं जाण्याचं मी अलिकडे सोडलं आहे.' वत्सलेच्या संशयाचें निरसन व्हावें म्हणून अरविंदनें खुलासा केला.

'मग आतां तिच्याशीं 'हँगिंग गार्डन'वर 'ॲपॉइंटमेंट' असते काय?' वत्सलेनें खोंचक प्रश्न विचारला.

'शर्थ झाली तुझ्यापुढें...'

'भावाला बहिणीची भेट घेतल्याशिवाय कसं चैन पडेल? आणि भावाचं दर्शन घेतल्याशिवाय बहिणीला तरी कसं स्वस्थ बसवेल!' अरविंदच्या उत्तराला प्रतिबंध करून वत्सला उपरोधिक स्वरांत म्हणाली.

'स्त्रियांच्या इतकी संशयी आणि मत्सरी जात दुसरी कोणतीहि नाहीं हेंच खरं. लाडके, मी काय करूं म्हणजे तुझी खात्री पटेल?' वत्सलेचा गोंडस हात हातांत घेऊन अरविंद म्हणाला. वादविवाद करून वत्सलेची खात्री पटविण्यापेक्षां थोडासा लडिवाळपणा केला म्हणजे बायकांची भोळी जात पटकन् खूष होते असें अरविंदला वाटलें व असाच अरविंदचा आजपर्यंतचा अनुभव होता.

'आपण इतकं कांहीं मनावर घेऊं नये. आपल्याबद्दल असा भलताच संशय मी कधीं तरी घेईन का? उगाच थट्टा करून एका माणसाची गंमत पाहिली!' अरविंदच्या लडिवाळपणाचा अंमल चढल्यामुळेंच वत्सलेच्या तोंडून अशा प्रकारची भाषा निघूं लागली.

अरविंदचा कमलिनीशीं प्रेमसंबंध असलाच पाहिजे अशी वत्सलेची जवळजवळ खात्री होती. अरविंदची थट्टा करून त्याची गंमत पाहण्याचा

वत्सलेचा मुळींच इरादा नव्हता. उलटपक्षीं त्याची चांगल्यापैकीं कानउघाडणी करण्याचेंच तिनें आज ठरविलें होतें. तिनें आपल्या भाषणांत जी गोष्ट अरविंदला आज ऐकविली ती त्यानें मनावर घेऊं नये असें तिला मुळींच वाटत नव्हतें. किंबहुना ती गोष्ट त्यानें मनाला लावून घ्यावी व कमालिनीशीं असलेला प्रेमसंबंध तोडून टाकावा अशीच वसत्लेची हार्दिक इच्छा होती. पण धूर्त अरविंदनें भोळ्याभाबड्या वत्सलेला आपल्या लडिवाळपणाच्या पाशांत अडकविलें हेंच खरें. नाहींतर अरविंदची कानउघडणी करण्याचा तिचा जो मूळ उद्देश त्याच्याशीं विसंगत अशी भाषा तिच्या तोंडून निघालीच नसती.

* * * *

अरविंद नवमतवादी होता. 'शीलं परं भूषणम्' हें तत्व प्रतिपादन करून सनातनी लोक आपल्या आचरटपणाचा कळस करतात अशी त्याची समजूत होती.

शील धुतलेल्या तांदुळाप्रमाणें स्वच्छ राहणें निदान विसाव्या शतकांत तरी अशक्य आहे असा त्याचा तर्क होता.

कमलिनी एका म्युनिसिपल स्कूलमध्यें शिक्षकीण होती. 'व्हर्न्याक्युलर फायनल'पर्यंत तिचें शिक्षण झालें होतें. तिची विद्वत्ताहि बेताचीच होती. तथापि नवमतवादामध्यें कांहीं तरी गंमत आहे—बराच रोमान्स आहे ही गोष्ट मात्र तिच्या चटकन ध्यानांत आली.

जीवितामध्यें ज्याला खरा आनंद लुटावयाचा असेल त्याला नवमतवादाचा पुरस्कार करण्यावांचून गत्यंतरच नाहीं असें ती नेहमीं आपल्या शिक्षिका-भगिनींजवळ म्हणत असे.

कमलिनी विधवा असल्यामुळें वैवाहिक सौख्याला पारखी झालेली होती. विधवांच्या करुणास्पद स्थितीची रसभरीत वर्णनें ती कादंबऱ्यांतून वाचीत होती. ती सिनेमाला गेली कीं विधवेच्या शोकपूर्ण आयुष्याची दुःखपर्यवसायी कथा तिला रुपेरी पडद्यावर पहावी लागे. शिवाय विधवांच्या निराधार

स्थितीबाबत समाजसुधारकांकडून व्यासपीठावर जो टाहो फोडला जात होता त्याचा नादहि तिच्या कानांत रात्रंदिवस घुमत होता.

त्यांत तिला जो मित्र भेटला तो विधवांच्या असहाय्य स्थितीबद्दल अश्रु ढाळणारा! आपण वैधव्यांत दिवस काढीत आहोंत हें कांहींतरी विलक्षण पाप करीत आहोंत असें अशा प्रकारच्या वातावरणांत वावरणाऱ्या कमलिनीला साहजिकच वाटूं लागलें.

शिवाय 'अभिनंदनीय विवाह' ह्या शीर्षकाखालीं पुनर्विवाह लावण्याचें धाडस केल्याबद्दल वृत्तपत्रें विधवांचीं मधूनमधून अभिनंदनें करीतच होतीं.

'मीच असं कोणतं पातक केलं आहे कीं मी वैधव्यावस्थेंतच दिवस कंठले पाहिजेत' असें विचार कमलिनीच्या मनांत अलिकडे घोळूं लागले होते.

अरविंदबरोबर ती लग्न लावण्यास तयार होती.

नवमतवादी अरविंद कमलिनीला आपली सहचारिणी करण्यास तयार नव्हता असें नाहीं. पण तो तिला वारंवार विचारी–'लग्नांतच मोठसं काय आहे? तुझं माझ्याबर आणि माझं तुझ्यावर गाढ प्रेम आहे...'

अशा वेळीं कमलिनीनें त्याला मध्येंच प्रश्न विचारावा—

'वत्सलेच्याहून माझ्यावर तुमचं गाढ प्रेम आहे?'

'कमल, तूंच मला आवडतेस, तुझं नांव तरी किती रोमॅन्टिक! तुझ्या सहवासांत माझा वेळ केव्हां जातो तें समजत नाहीं!'

अरविंदच्या म्हणण्यांत बराच तथ्यांश होता ह्यांत संशय नाहीं. कारण वत्सलेहून कमलिनी खरोखरच सुंदर आणि चलाख होती. वत्सलेमध्यें नसलेला लाडिकपणा कमलिनीच्या ठिकाणीं भरपूर होता. ह्या लाडिकपणाच्या जोरावर कमलिनी अरविंदला आपल्याकडे खेचून घेत होती.

* * * *

मे महिन्याची शाळेला सुट्टी असल्यामुळें एका मैत्रिणीकडे चार दिवस राहण्यासाठीं म्हणून कमलिनी पुण्याला आली होती.

अरविंदचें आज पत्र येईल असा तिचा अंदाज होता.

तिच्या अपेक्षेप्रमाणें अरविंदचें पत्र आलें. मोठ्या उत्सुकतेनें पत्र फोडून ती वाचूं लागली—

श्री.

मुंबई, ता. १५–५–३७

' प्रिये वत्सले

तुला माहेरीं जाऊन आज पंधरा दिवस होतील. मी तुझ्या पत्राची इतके दिवस अत्यंत उत्सुकतेनं वाट पाहिली पण अखेर निराशाच माझ्या पदरांत आली. माझ्या लाडकीला मीच अगोदर पत्र लिहिलं पाहिजे असा समंजस-पणाचा विचार केला आणि हें पत्र लिहिण्यास बसलों.

कमलिनी सुद्धां पुण्याला गेली आहे. म्हणून मी आतां तिच्या घरीं जात असेन अशी शंका घेण्याचं तुला मुळींच कारण नाहीं.

लाडके, मी कमलिनीकडे जातों म्हणून माझ्याबद्दल मागें एकदां तूं भलताच संशय घेतला होतास. पण वत्सले, विधवांच्या पाठीमागें लागून स्वतःची बेअब्रू करून घेण्याइतके का आम्ही मूर्ख आहोंत ?

कमलिनीच्या नीतिमत्तेबाबत येथें लोकांमध्यें किती गवगवा झाला आहे हें तुला माहीत आहेंच. अशा छिचोर विधवेशीं नुसती ओळख असल्याचें तरी मी दाखवीन का ? म्हणूनच ' तूं मला बहिणीप्रमाणें आहेस ' असं मी तिला मागेंच सांगितलं व तिच्या घराची पायरी चढण्याचंहि बंद केलं.

माझ्याबद्दल भलताच संशय घेऊन त्यावेळीं तूं विनाकारण रागावलीस, रुसलीस. पण तुझा तो राग व रुसवा किती गोड होता...............' ;

पत्रामध्यें इतरहि बराच मजकूर होता. शेवटीं ' केवळ तुझाच ' ह्या शब्दांखालीं अरविंदची सही होती.

कमलिनीनें तें पत्र वाचलें. वत्सलाहि त्याच वेळीं पुण्याला माहेरीं गेली होती. तिला लिहिलेलें पत्र, ज्या पाकिटावर कमलिनीचा पत्ता लिहिला होता त्या पाकिटांत अरविंदनें नजरचुकीनें घातलें. पत्र वाचून अरविंदच्या नवमतवादी हृदयाची तिला पुरी कल्पना आली.

संतापाच्या भरांत तिनें फक्त दोन ओळींचें पत्र अरविंदला पाठविलें.

श्री.

पुणें, ता. १६–५–३७

‘ अरविंद,

तुम्ही मला पाठविलेलं पत्र पोंचलं नाहीं. तथापि आजपासून तुमचा व माझा संबंध तुटला.

—कमलिनी’

कमलिनीला ज्यावेळीं पत्र मिळालें त्याच वेळीं वत्सलेलाहि एक पत्र मिळालें.

वत्सलेनें तें पत्र फोडलें—

श्री.

मुंबई, ता. १५–५–३७

‘ लाडके कमलिनी,

मे महिन्याची सुट्टी मुंबईत घालविण्याऐवजीं पुण्याला जायची दुर्बुद्धि तुला कां आठवली हेंच मला समजत नाहीं.

कमल, आमच्या सौभाग्यवती माहेरीं गेल्या आहेत. अशा वेळीं तूं जर येथें असतीस तर......

आपल्या प्रेमसंबंधाबाबत वत्सला नेहमीं संशय घेत असते. आपण एकमेकांच्या भेटी घेतों अशी तिची जवळजवळ खात्री आहे. कमलिनीच्या घरीं मी जात नाहीं–मी तिला बहिणीप्रमाणें मानतों अशा थापा मारून मला वत्सलेची समजूत घालावी लागते.

कमल, तुझ्यांत आणि वत्सलेंत केवढं जमीन अस्मानाचं अंतर आहे ! कमलिनी–वा–तुझं नांव तरी किती रोमॅण्टिक. तुझ्या सौंदर्यावर मी लुब्ध झालों हा दोष कोणाचा ? माझा कीं तुझ्या सौंदर्याचा ? कां हा कोणाचाच दोष नाहीं ?

ह्या वेळीं सौभाग्यवतीला मी बरेच दिवस माहेरीं ठेवणार आहे. तूं मात्र मुंबईला लवकरच निघून ये.

केवळ तुझाच,
अरविंद.’

अर्थात्‌च हें पत्र अरविंदनें कमलिनीला लिहिलें होतें. पण ज्या पाकिटा-वर वत्सलेचा पत्ता लिहिला होता त्या पाकिटांत तें पत्र त्यानें चुकीनें घातलें. अरविंदच्या हातून ही चूक घडली व म्हणूनच कमलिनीशीं असलेल्या त्याच्या प्रेमरहस्याचा स्फोट झाला.

संतापाच्या भरांत वत्सलेनेंहि आपल्या पतिराजांना पुढील पत्र पाठविलें—

श्री.

पुणें, ता. १६–५–३७

अरविंद,

तुम्हीं मला पाठविलेलं पत्र पोचलं नाहीं. तथापि, मला बरेच दिवस माहेरीं ठेवण्याचा तुमचा बेत मात्र मला कळून चुकला आहे. तुमचा हा बेत मला अर्थात्‌च मान्य नाहीं. म्हणून मुंबईला येण्यासाठीं मी उद्यांच येथून निघणार आहे. विशेष खुलासा भेटीअंतीं.

—वत्सला.'

# ६

# परीक्षकांचा कट

आतांपर्यंत संजीवन सात वेळां बी. ए. च्या परीक्षेला बसला होता.

इतक्या वेळां परीक्षेला बसावें लागल्याबद्दल कोणी त्याची कींव करीत, तर कित्येकांना त्याची विलक्षण चिकाटी पाहून नवल वाटे. कोणी म्हणत 'मठ्ठ बुद्धीच्या मुलांनीं परीक्षा देण्याच्या भानगडींत पडावंच कशाला?' 'मुलांनीं' हा शब्दप्रयोग केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करून कांहीं विचारीत—अहो हीं मुलं कसलीं! ह्यांना स्वतःला दोन दोन मुलं झालीं. अजून किती दिवस ह्यांना मुलं म्हणायचं?

संजीवनबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या लोकांचीं मतें मात्र निराळीं होतीं.

'संजीवन बुद्धीनें चलाख आहे. तो अभ्यासच करीत नाहीं. अभ्यास करता तर एव्हाना...' संजीवनला दुसऱ्यांनीं मठ्ठ म्हटलेलें न खपून कांहीं लोक म्हणत.

'लग्न झाल्यावर कसला आलाय् अभ्यास?' स्त्री ही अभ्यासाच्या मार्गातली धोंड आहे अशा मताचा पुरस्कार करणारे कांहीं जण म्हणत.

संजीवनच्या अपयशाचें खापर कांहीं दैववादी लोक देवावर किंवा दैवावर फोडीत. ते म्हणत 'बिचाऱ्याचं नशीब नाहीं, नाहींतर तो प्रभाकरच पहाना—काय येताय त्याला!: पण अगदीं पहिल्या वेळेस पास झाला.'

संजीवनच्या अपयशाची मीमांसा त्याचे आईबाप निरनिराळ्या तऱ्हेनें करीत. त्याचे वडील म्हणत—

‘ पोराला सिनेमाचा नाद लागला आहे. हॉटेलांत जाण्याचं व्यसन जडलं आहे. कसा होणार ह्याच्या हातून अभ्यास ? हा नापास झाला तर नवल काय ? ’

आई म्हणे—

‘ सून लवकर आणवीसं वाटलं, हौसेनं मुलाचं लग्न केलं. पण आतां तो अभ्यासच करीत नाहीं. ’

‘ ही शेवटची परीक्षा—ती आतां सोडून देऊन कसं चालेल ? नाहींतर एवढं शिकल्याचा काय उपयोग ? ’ संजीवनचे जिव्हाळ्याचे दोस्त त्याला नेहमीं सांगत असत.

संजीवन परीक्षेंत नापास कां व्हावा ह्याबद्दल निरनिराळे लोक निरनिराळीं कारणें शोधून काढून भिन्न भिन्न मतें प्रदर्शित करीत.

बी. ए. च्या परीक्षेला बसणें हें संजीवनच्या आयुष्यांत एक नैमित्तिक कर्मच होऊन बसलें होतें एवढी गोष्ट मात्र खरी.

* * * *

संजीवन इंटर पास झाल्यावर त्याचें लग्न झालें. त्याचे वडील मुंबईतील एक नामांकित वकील होते. पोलिस कोर्टांतल्या प्रॅक्टीसवर त्यांनीं आजपर्यंत खूप पैसा कमावला होता.

वास्तविक, एव्हांना संजीवन एल्‌एल्. बी. होऊन त्याचा वकिलीच्या धंद्यांत वडिलांच्या पाठिंब्यामुळें चांगला जमहि बसला असता. वडिलांचें वय झाल्यामुळें स्वतःच्या धंद्यांत संजीवनची मदत मिळाली तर बरें असें त्यांना नेहमीं वाटे. पण मुलगा बी. ए.लाच जर इतका रखडतो तर एल्‌एल. बी.ला किती रखडेल हें त्रैराशिक त्यांच्या मनापुढें येऊन त्यांना वाईट वाटत असे.

* * * *

परीक्षा दोन महिन्यांवर आली होती. कांहीं झालें तरी या वेळीं पास व्हायचंच असा संजीवननें मनाशीं निर्धार केला होता.

आपल्या खोलींत अभ्यास करण्यांत तो इतका निमग्न झाला होता कीं शशिकला दार लोटून खोलींत केव्हां आली हेंहि त्याला समजलें नाहीं.

‘ माझी इच्छा पूर्ण करण्याचं मनावर घेतलं आहे अगदीं अलिकडे.’ संजीवनच्या गालावर चापट मारून शशिकला म्हणाली.

‘ अग, पण ह्याच्यांतून सुटेन तेव्हां खरा. एल्एल्. बी.च्या दोन परीक्षा आहेतच पुढं. वकिलीणबाई व्हायला किती वर्षं लागतील कोण जाणें !’

‘ किती वर्षं कसलीं ? आपण एकदां मनावर घेतलं कीं त्यांत कठीण काय आहे ? आतां पटकन् दोन वर्षं जातील आणि एल्एल्. बी. होणं होईल.’

‘ होय. तुझं म्हणणं तसं पाहिलं तर मुळींच खोटं नाहीं. एल्एल्. बी. होऊन वकिली सुरू करण्याचा केलाच आहे मी निर्धार ’ हाताच्या बोटांनीं शशिकलेची हनुवटी वर करीत संजीवन म्हणाला.

‘ माझी खात्रीच आहे मुळीं कीं मी वकिलीणबाई होणार म्हणून ! हिला वकील नवरा मिळणार असं ज्योतिषी माझ्या पत्रिकेवरून बाबांना नेहमीं सांगत असत. ’ शशिकलेनें एक गोड मुरका मारला.

‘ काय पण मुरका मारलास ! गोड मुरके मारण्याची तुला अगदीं वाईट संवय लागली आहे. तूं मुरके मारतेस पण आम्हाला पुस्तक मिटावं लागतं.’ पुस्तक मिटून संजीवन खुर्चीवरून उठला आणि शशिकलेच्या कोवळ्या ओठांचें त्यानें मनसोक्त चुंबन घेतलें.

‘ बरी बाई युक्ति साधल्याय आपल्याला. अभ्यास करायला नको तें कुठंच गेलं.’ मानेला एक नाजूक हिसका देऊन शशिकलेनें म्हटलें.

‘ हें बघ तूं जर अशी लचकूं मुरडूं लागलीस तर आपला नाहीं बुवा अभ्यास होणार. मग वकिलीणबाई झालीस नाहीं तर आपल्याकडे नाहीं रे बुवा.’ ह्या वेळीं संजीवननें शशिकलेच्या गालाचें चुंबन घेतलें.

वकिलीणबाई म्हणून मिरविण्याची शशिकलेला फार आवड होती. पण ही महत्त्वाकांक्षा साध्य करून घेण्याचें तिच्या हातांत थोडेंच होतें ! संजीवन वकील झाला तरच शशिकला वकिलीणबाई होणार !

आपली ही इच्छा शशिकलेनें संजीवनच्या कानावर वेळोवेळां घातली होती. आणि संजीवननेंहि आपल्या लाडकीची इच्छा परिपूर्ण करण्याचा संकल्प केला होता. तथापि बी. ए.च्या तेथेंच गाडें अडून बसलें होतें.

* * * *

बी. ए.चा ‘ रिझल्ट ’ लागला. यशस्वी उमेदवारांच्या यादींत संजीवनचें नांव परीक्षकांनीं वगळलें होतें. संजीवन आठव्यांदा परीक्षेंत नापास झाला होता !

किती निष्ठुर परीक्षकांची ही जात ! थोडीतरी माणुसकी धरून निदान आठव्या वेळीं तरी परीक्षकांनीं संजीवनला पास करायला नको का होतें ? पण वकिलीणबाई होण्याची शशिकलेची महत्त्वाकांक्षा परीक्षकांना सहन झाली नाहीं. वकिलीच्या सन्माननीय धंद्यांत पडण्याची संजीवनची मनीषा मत्सर-ग्रस्त परीक्षकांना रुचली नाहीं. त्याला नापास करून त्यांनीं त्याचे पाय मागें ओढले.

संजीवन उदासीन बनला. मनानें तो अगदीं खट्टू झाला होता.

‘ आठव्यांदा नापास ! आतां सासूबाई काय म्हणतील ! मामंजींना काय वाटेल ! लोक किती चेष्टा करतील ! ’ ज्या दिवशीं रिझल्ट लागला त्या दिवशीं शशिकला संजीवनजवळ म्हणाली होती.

शशिकलेचे ते शब्द संजीवननें मनाला लावून घेतले होते.

पुन्हां एकदां परीक्षेला बसण्याचें त्यानें मनाशीं ठरविलें.

पुन्हां एकदा संजीवनची अभ्यासाला जारीनें सुरवात झाली.

‘ शेंडी तुटो वा पारंबी तुटो—शशिकलेला वकिलीणबाई करायचंच ’ असा त्यानें मनाशीं ठाम निर्धार केला. आणि हा निर्धार पार पाडण्यासाठीं जालीम उपायांचा अवलंब करण्यासहि तो आतां मागेंपुढें पाहणार नव्हता.

‘ खूप अभ्यास करायचा—परिक्षकांचीं नांवं काढायचीं—त्यांच्याजवळ वशिला लावायचा—प्रसंग पडल्यास त्यांना लांचहि द्यायची—जमल्यास परीक्षेच्या हॉलमध्यें कॉपी करण्यासहि डरायचं नाहीं.’—पुनः परीक्षेला बसतेवेळीं अशा प्रकारचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्याचें त्यानें नक्की केलें होतें.

'इतका कडेकोट बंदोबस्त केल्यावर मी नापास होईन! काय बिशाद लागली आहे......' त्याच्या मनांत विचार येत असत.

*　　*　　*　　*

कॉन्व्होकेशन हॉल्मध्यें बी. ए. ची परीक्षा चालू होती. संजीवन अर्थशास्त्राचा पेपर लिहीत होता. पेपर लिहिणाऱ्या उमेदवारांच्या रांगांमधून सुपरवायझर मोठ्या काकदृष्टीनें फेऱ्या घालीत होते.

सुपरवायझरचें लक्ष नाहीं असें पाहून संजीवननें खिशांत हात घालून कागदाची एक घडी हळूच बाहेर काढली. घडी उलगडून कागदावरील मुद्दे तो आपल्या उत्तर-पत्रिकेंत शीघ्रगतीनें लिहूं लागला.

इतक्यांत मागून सिनिअर सुपरवायझरची स्वारी आली. त्याचें लक्ष संजीवनच्या हातांतील कागदावर गेलें.

सिनिअर सुपरवायझर संजीवनजवळील कागद आपल्या हातांत घेतो न घेतो तोंच संजीवन मूर्च्छित होऊन खालीं पडला. त्याच्या तोंडांतून फेंस येऊं लागला.

योग्य उपचार केल्यानंतर संजीवन शुद्धीवर आला. एक शिपाई बरोबर देऊन सुपरवायझरनें त्याची गाडींतून घरीं रवानगी केली.

नवव्या वेळीं परिक्षेला बसतांना हटकून परीक्षा पास होण्यासाठीं रामबाण उपायांचा अवलंब करण्याचें संजीवननें मनावर घेतलें होतें.

पण आणखी सात वर्षेपर्यंत तो बी. ए.च्या परीक्षेला बसणार नाहीं असा बंदोबस्त करण्याची आतां युनिव्हर्सिटीला लहर आली.

संजीवनला अशा प्रकारची बंदी करणारें युनिव्हर्सिटीचें पत्रक निरनिराळ्या कॉलेजांतील बोर्डावर झळकूं लागलें.

हाय! शशिकलेची महत्त्वाकांक्षा! संजीवनची मनीषा! त्याच्या वडिलांची अपेक्षा! आईची इच्छा! परीक्षकांचा कट! सुपरवायझरचा चोंबडेपणा! युनिव्हर्सिटीची कर्तव्यनिष्ठा! दैवाचें दुर्विलसित!!!

# ७

## मारुतीचा अश्रुपात !

असें म्हणत कीं—कित्येक भाविक लोकांच्यां नवसाला तो मारुति पावला होता. मारुतीभोंवतीं हजारों प्रदक्षिणा घालून कित्येक निपुत्रिक स्त्रियांनीं पुत्रांची प्राप्ती करून घेतली होती. रात्रीं अपरात्रीं दुष्ट स्त्रियांनीं विवस्त्र होऊन घातलेल्या उलट्या प्रदक्षिणांवर खूष होऊन त्याच मारुतीनें सुपुत्रिकांच्या पुत्रांना महिनानुमहिनें आजारी पाडलें होते. कित्येकांना निसंतान केलें होतें. सुष्टांना आणि दुष्टांना तो मारुति सारखाच प्रिय होता. आसपासच्या खेड्यांत त्याची अत्यंत प्रसिद्धी होती. दर शनिवारीं सकाळीं आणि संध्याकाळीं त्या मारुतीच्या देवळांत दर्शनोत्सुक स्त्रीपुरुषांची केवढी झुंबड उडायची !

लोकांवर कृपाप्रसादाचा वर्षाव करण्यासाठीं त्या जुनाट देवळाच्या प्रशस्त गाभाऱ्यांत मारुतीची ती भव्य व उंच मूर्ति आज कित्येक वर्षें उभी होती. मुंबईच्या गोपाळदास बरफीवाल्याप्रमाणें तो मारुति ' जुना अने जाणिता ' म्हणून सर्वत्र ओळखला जात होता.

देवळांतील पुजारीहि मारुतीप्रमाणेंच दिसावयाला भव्य आणि उंच होता. त्याच्या त्या भरदार मिशा, काळा वर्ण आणि राकट शरीर पाहून पाहणाऱ्याला क्षणभर भीति वाटल्यावांचून राहात नसे.

दररोज दुपारीं बारा वाजतां देवळाचा पुढील दरवाजा बंद होई. तो पुन्हां सायंकाळीं चार वाजतां उघडण्यांत येई.

आज पुजारी कोणाची तरी वाट पाहात असावा असें त्याच्या मुद्रेवरून आणि येरझाऱ्यांवरून स्पष्ट दिसत होतें. देवळाच्या बाहेरील दरवाजा बंद करण्याची वेळ होऊन गेली होती.

पण पुजाऱ्याला फार वेळ वाट पाहावी लागली नाहीं. एक गलेलठ्ठ, सोवळी झालेली, विकेशा विधवा मोठ्या लगबगीनें देवळांत शिरली. गाडी सुटण्याची वेळ झाली असतां ती चुकूं नये म्हणून मनुष्य जितकी घाई करतो तितकी लगबग आणि चपळाई तिच्या त्या वेळच्या हालचालींमध्यें प्रतीत होत होती.

सोवळी विधवा देवळांत शिरताक्षणींच पुजाऱ्यानें दार बंद करून घेतलें.

दोघेहि सरळ गाभाऱ्यांत गेली.

'मला वाटलं तूं आज येत नाहींस!' विकेशा विधवेचा कंकणविहीन हात आपल्या हातांत घेत पुजारी म्हणाला.

'काम आटपायला थोडा उशीर झाला खरा.'

'अगदीं वेळेवर आलं पाहिजेस तूं. तुला थोडा जरी उशीर लागला तरी मग मला सुचेनासं होतं.' तिच्या गळ्यांत आपले दोन्ही हात अडकावून पुजाऱ्यानें म्हटलें.

भर दुपारीं बारा वाजतां सूर्य बाहेर प्रखरतेनें तळपत असतां देवळाच्या गाभाऱ्यांतील तो अंधार आणि कोंदटपणा त्या दोघांना कां आवडला हें उघड आहे. आणि म्हणून ब्रह्मचारी मारुतीच्या गदाधारी मूर्तीला त्यांनीं त्यावेळीं काय प्रकार पाहावयास लावले असतील ह्याचें स्पष्ट वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं.

पंधरा मिनिटांनीं, तीं दोघें गाभाऱ्यांतून बाहेर आलीं. पुढें होऊन पुजाऱ्यानें पुढचें दार उघडलें. दार उघडून तो मागें वळला.

इतक्यांत दार उघडें पाहून दगडू मोची सरळ आंत शिरला.

'अरेरे!! काय भ्रष्टाकार मांडलास! बेशरम कुठला! चल नीघ—हो खालीं!' दगडूला आंत शिरलेला पाहून पुजाऱ्यानें गर्जना केली.

'उतर खालीं—उतर—धक्की मारून बाहेर घालवायला पाहिजे! बाहेर जात नाहीं म्हणजे काय!' विकेशा विधवा कडाडली.

पण त्याला बाहेर घालवायचा कसा? धक्की मारण्यासाठीं तरी अस्पृश्याला स्पर्श करून देह कसा विटाळायचा!—पूजाऱ्याला विलक्षण पेंच पडला. आजपर्यंत त्याला असा पेंच पडला नव्हता.

‘ अलिकडे ह्या चांभारड्यांचे फार चोचले माजले आहेत ! आमच्याच देवळांवर का रे तुमची दृष्टी ? खुशाल देऊळ बांधा आणि घाला हवा तो गोंधळ तिथं ! आम्हांला पाहिजे तर मज्जाव करा तुमच्या देवळांतून. पण तें करायचं सोडून आमच्याच देवळांतून तुम्हाला धिंगाणा घालायला पाहिजे नाहीं का ? ’ गंभीर आवाजांत पुजाऱ्यानें घोषणा केली.

देवळामध्यें खिडकींत असलेला आणि तेलानें भरलेला द्रोण हातांत घेऊन विधवा गाभाऱ्यांत गेली. मारुतीच्या त्या ऐसपैस मूर्तीवर तो द्रोण. उपडा करून ती बाहेर आली व थेट देवळाबाहेर निघून गेली.

‘ पुजारीबोवा कशाला त्रागा करता ? काल मला स्वप्नं आलं—प्रत्यक्ष मारुतिदेव माझ्या स्वप्नांत आले होते. त्यानीं सांगितलं कीं देवळांत जाऊन मला तेल आणि माळ घाल—नारळ फोड—म्हणजे तुझा मुलगा बरा होईल. पुजारीबुवा, गेले तीन वार मुलगा तापानं फणफणतो आहे. काल संध्या-काळपासून तर शुद्धीवरहि नाहीं.’ डोळ्यांत अश्रू आणून दगडूनें आपली हकीकत सांगितली.

‘ पुरे कर वटवट ! मला शहाणपणा शिकवतोस ! भ्रष्टाकार करून वर बडबड ! ’ पुजारी हात उगारून दगडूच्या अंगावर धांवला.

दगडू देवळाबाहेर पडला. लांबूनच त्यानें मारुतीला नमस्कार ठोकला.

मारुतीच्या अंगावर सोवळ्या ( ! ) विधवेनें नुकतेंच तेल ओतलें होतें. त्यामुळें जणूं काय दगडूबद्दल अनुकंपा उत्पन्न झाल्यामुळें मारुति अश्रू ढाळीत आहे आणि ते अश्रु त्याच्या अंगावर ओघळत आहेत असा भास होत होता.

अश्रू ढाळण्याव्यतिरिक्त मारुति दुसरें काय करणार ! दगडूला शांत घेण्याचें सामर्थ्य त्या दगडी देवांत कुठून असणार ! !

## ८

# राजयक्ष्मा

आज वृंदावनच्या वयाला पस्तिशी उलटून गेली होती. तथापि त्याला अजूनहि वयाच्या दुप्पट रुपये सुद्धां पगार मिळत नव्हता.

मुंबईला निघणाऱ्या एक एक पैसा किंमतीच्या दैनिकाचा तो सहसंपादक होता. हिंदुस्थानसरकारच्या ' बजेट'वर त्यानें अग्रलेखांतून कित्येक वेळां ऊहापोह केला असेल. परन्तु घरच्या जमाखर्चाच्या 'बजेट'ची तोंडमिळवणी करतांना त्याची नाकीं नऊ येत. इटली–ॲबिसिनीयामधील युद्धाच्या वेळीं त्यानें आपल्या वृत्तपत्रीय स्तंभांतून राष्ट्रसंघाला थोड्या वेळां इषारा दिला होता असें नाहीं. तथापि राष्ट्रसंघाला इषारा देणारा हा मुत्सद्दी आणि हिंदुस्थानसरकारला जमाखर्च शिकविणारा हा अर्थशास्त्रज्ञ स्वतःभोंवतीं दाणेवाला–तेलवाला–भाडेवालाआदिकरून घेणेकऱ्यांचा गराडा पडतांच गांगरून जात असे.

संततिनियमनाचा जर आपण पुरस्कार केला नाहीं तर पुरोगामी लेखकांत आपली गणना होणार नाहीं आणि सनातनी असें संबोधून लोक आपल्याला तुच्छ लेखतील अशी भीति वृंदावनला वाटे. म्हणून, ' हिंदुस्थानला संततिनियमनावांचून तरणोपाय नाहीं ' असें अतिशयोक्तिपूर्ण विधानहि ठोकून देण्यास तो मागेंपुढें पहात नसे. मात्र त्याचें लग्न झाल्यापासून दहा वर्षेंपर्यंत त्याच्या घरचा दोन दोन वर्षांचा पाळणा चुकला नव्हता !

आपण कोणीतरी ' मोठे ' व्हावें असें वृंदावनला नेहमीं वाटे आणि आपण ' मोठे ' होऊं शकूं असा त्याला आत्मविश्वास वाटत होता. कारण प्रथम ' लहान ' असलेले लोक पुढें ' मोठे ' कसे झाले त्याचे उद्बोधक आणि स्फूर्तिदायी वृत्तांत तो ' किर्लोस्कर 'मधून वाचीत असे आणि त्यावरून

आपणहि कधींतरी ' मोठे ' होणार अशी त्याची खात्री पटली होती. निदान आतांपर्यंत तरी तो दिवसेंदिवस लहानाचा मोठा, फक्त वयानेंच होत होता एवढें सांगणें मात्र जरूर आहे.

वृंदावनची महत्त्वाकांक्षा जबर होती. त्याला एकदां वाटे कीं राजकारणांत पडावें आणि सबंध देशभर जागृति करून सोडावी—एकदां वाटे कीं समाजकारणाची धुरा आपल्या शिरावर घ्यावी. एकदां वाटे उत्तम लेखक म्हणून प्रसिद्धी मिळवावी पण लगेच त्याच्या मनांत विचार येई—' लेखक होण्यापेक्षां नामांकित वक्ता म्हणून आपला लौकिक पसरला तर काय वाईट ! ' बालगंधर्वांची कंपनी भरभराटींत असतांना रंगभूमीवर अभिनयकुशल नट म्हणून नांव कमवावे अशी इर्षा त्याच्या मनांत उत्पन्न होई. परंतु अलिकडे बोलपटांचें वाढतें वैभव पाहून आपल्याला 'सिनेमा स्टार' होता आलें तर बरें असें तो म्हणत असे. एक वर्षापूर्वी ' ब्रह्मचर्य हेंच जीवन आणि वीर्यनाश हाच मृत्यु ' ही शिकवण त्याला पटली होती आणि त्याबरहुकूम वर्तन ठेवण्याची त्यानें प्रतिज्ञाहि केली होती. परंतु, प्रि. अत्र्यांचा ब्रह्मचारी बोलपट पाहिल्यावर त्याचे डोळे उघडले, प्रतिज्ञा ढासळली आणि तेव्हांपासून कडकडीत ब्रह्मचर्यापेक्षां ' बेतानें राहणें ' फार उत्तम अशी त्यानें मनाशीं खूणगांठ बांधली.

मोठेपणाची दिशा न ठरविल्यामुळें म्हणा, प्रयत्न अपुरे ठरले म्हणून म्हणा किंवा दैवानें मेहेरनजर न केल्यामुळें म्हणा, मोठेपणासाठीं धडपड करूनहि तो आतापर्यंत मोठा झाला नव्हता.

' काय केलं असता आपण एकदम आणि पटकन् मोठे होऊं ! ' अलिकडे ह्या विचार त्याचे मनांत सारखा घोळूं लागला होता.

मोठे होण्यासाठीं वृंदावननें आजपर्यंत जीवापाड मेहेनत केली होती. सार्वजनिक संस्थांतून स्वयंसेवक म्हणून तो काम करी पण त्यामुळें त्याची वाहवा होण्याऐवजीं त्या संस्थांच्या सेक्रेटरीनाच धन्यवाद मिळत. जगाचा हा न्यायच आहे—सैनिकांनीं पराक्रम गाजवावा आणि त्याचें सारें श्रेय सेनापतीला मिळावें ! सहसंपादकांनीं ओजस्वी लिखाण निर्माण करावे आणि ज्याला चार ओळींचें पत्रहि व्यवस्थित लिहितां येणार नाहीं अशा मुख्य

संपादकाच्या नांवावर तें लिखाण खपावे ! कष्ट करावयाचे एकानें आणि त्याचें फळ लुबाडायला मात्र दुसरा हजर !!

वृंदावननें कष्ट केले–धडपड केली–पण व्यर्थ ! त्या कष्टांमुळें आणि त्या धडपडीमुळें आतापर्यंत तो यत्किंचित्‌हि मोठा झाला असेल तर शपथ ! नाहीं म्हणायला त्या धडपडीचा त्याच्या शरीरप्रकृतीवर मात्र अनिष्ट परिणाम झाला.

'कांहीं तरी केलं हे पाहिजेच.' त्यानें मनाशीं निर्धार केला.

मजुरांचा पुढारी व्हायचें त्यानें ठरविलें.

आतांपर्यंत निरनिराळ्या दिशेनें प्रयत्न करून बिचारा अगदीं हताश झाला होता.

दैवयोगानें त्याला आयतीच संधि मिळाली. 'ट्रेड डिस्प्युट बिला'बद्दल निषेध आणि नापसंती व्यक्त करण्यासाठीं मुंबईला कारखान्यांतील व इतर कामगार एक दिवस संपावर जाणार होते. संपाच्या दिवशीं गिरण्यांसमोर हजर राहून मजुरांना 'कामावर न जाण्याचा' 'शांतता राखण्याचा' 'कोणावरहि सक्ती न करण्याचा' ठराविक उपदेश करण्याचें त्यानें नक्की केलें.

ठरल्याप्रमाणें संपाच्या दिवशीं वृंदावन परळला मजुरांच्या जमावांत घुसला आणि व्याख्यानबाजी करू लागला. जमाव अत्याचारप्रवृत्त होतो कीं काय अशी पोलिसांना भीति वाटूं लागली. शांततेचा भंग होऊ नये म्हणून दक्ष असणाऱ्या पोलिसांनीं अखेर स्वसंरक्षणार्थ गोळीबार केला.

त्या गोळीबारांत वृंदावन जखमी झाला. मजुरांचा पुढारी होण्याचा वृंदावन निर्धार करतो काय आणि थोड्याच दिवसांत गोळी लागून तो जखमी होतो काय ! विलक्षण योगायोग नाहींतर काय म्हणायचं त्याला !

तरीसुद्धां वृंदावनला समाधानाला जागा होती. हॉस्पिटलमध्यें तो पडून होता. 'मरण ओढवलं तरी बेहेत्तर ! ट्रेड डिस्प्युट बिलाचा बळी म्हणून तरी आपली कीर्ति आपल्यामागें दुमदुमत राहील' अशी आशा त्याला वाटूं लागली. बाबू गेनूचें भाग्य आपल्याला लाभणार असा भरवसा त्याचें मनांत दृढमूल झाला.

परन्तु वृंदावनची आशा वेडी ठरली—भरंवसा कोसळला. दुःखाची गोष्ट अशी कीं वृंदावन मेला नाहीं—तो ठणठणीत बरा झाला.

लक्ष्मीप्रमाणेंच कीर्तीचीहि तिच्या मागें लागून प्राप्ति होतेच असें नाहीं असा वृंदावनला कटु अनुभव आला.

'काय करावं बरं–मी मोठा कसा होणार–आणि कधीं होणार ?' वृंदावनला विलक्षण कोडें पडलें.

दिवसेंदिवस तो खंगत चालला. त्याचे गाल बसले, केस पिकले–रक्त बिघडलें. हळुहळू त्याला बारीक ताप येऊं लागला.

सहा महिने लोटले. वृंदावनची प्रकृति दिवसेंदिवस जास्तच खालावत चालली होती. डॉक्टरांपेक्षां वैद्यांवर त्याचा अधिक विश्वास होता. रोगाचें निदान करण्यासाठीं लंबोदरशास्त्री वक्रतुंडे नांवाच्या, जुन्या पिढींतील एका नामांकित वैद्याला वृंदावनच्या पत्नीनें बोलावून आणलें.

लंबोदरशास्त्र्यांनीं वृंदावनची नाडी तपासली. थोडासा विचार केल्यासारखें दाखवून लंबोदरशास्त्रीं म्हणाले, 'कठीण दिसतंय्–असाध्य आहे हा रोग !'

फार दिवस आपण काढणार नाहीं हें वृंदावन समजूनच होता. तथापि, तशा परिस्थितींतहि, 'मोठे होण्याची महत्त्वाकांक्षा राहिली, निदान असाध्य रोग तर आपल्याला साध्य झाला' असा विचार वृंदावनच्या मनांत डोकावूं लागला.

आणि वृंदावनला तसें वाटलें म्हणून दोष देण्यांत तरी काय अर्थ आहे ! असाध्य गोष्टी साध्य करणें हे कांहीं वाटेल त्याचें काम नाहीं ! त्याला खरा कर्तबगार मनुष्यच हवा !

'म्हणजे–काय झालाय् तरी काय ह्यांना ?' वृंदावनच्या पत्नीनें लंबोदरशास्त्र्यांना चाचरत विचारल.

'ह्याला आमच्या वैद्यकीयशास्त्रांत राजयक्ष्मा म्हणतात.' वैद्यबोवांनीं डोकें खाजवीत उत्तर दिलें.

'क्षयरोग ! ! आतां हे वाचणार नाहींत तर !' वृंदावनची पत्नी मनांत घाबरली.

'मोठं होण्याची आकांक्षा साध्य झाली नाहीं खरी. पण आपल्याला जो रोग झाला तो तरी मोठा झाला' असा विचार करून क्षयरोगानें पोखरलेला वृंदावन मनाचें समाधान करी !

बिचारा वृंदावन ! ! !

# १

## बंधनाच्या अलिकडे

बरोबर पांचच वर्षांपूर्वी करुणेनें केवढें धैर्य दाखविलें होतें! स्वतःच्या प्राणांवर उदार होऊन तिनें आपल्या अर्भकाची मुक्तता केली होती.

सबंध घर आगीनें पेट घेत होतें. विशेषतः ज्या खोलीमध्यें करुणेची मुलगी मोहना झोंपली होती त्या खोलींत जाण्याची तर सोयच नव्हती. वरचीं बह्यालें आगीनें जळून केव्हां खालीं कोसळतील ह्याचा नियम नव्हता.

करुणेला स्वतःचा जीव नकोसा झाला होता आणि म्हणून ती त्यावेळीं जीवावर उदार झाली अशांतला मुळींच भाग नाहीं. स्वतःचा जीव कसा बचावावा ह्याची जबरदस्त विवंचना तिच्या मनाला साहजिकच लागली होती. पण लाडक्या मोहनेसाठीं तिचा जीव वरखालीं होत होता.

मोहनेची गोड, रम्य व हंसरी मूर्ति क्षणभरच तिच्या मनश्चक्षूंपुढें चमकली. तिच्या मनाचा निर्धार झाला. मोहनेच्या खोलींत धाव ठोकून तिनें तिला हृदयाशीं कवटाळून धरलें. विचार करण्याला अवधी नव्हता. मोहनेसह पहिल्या मजल्यावरून तिनें खाली उडी मारली.

आणि आज—

त्याच करुणेनें स्वतःचें नुकतेंच प्रसूत झालेलें अर्भक म्युनिसिपालिटीच्या कचऱ्याच्या पेटींत फेकण्यासाठीं एका मोलकरणीजवळ दिलें होतें.

पांच वर्षांपूर्वी मोहनेचे प्राण वाचविण्यासाठीं करुणेनें स्वतःच्या प्राणांची पर्वा केली नव्हती.

आज स्वतःची अब्रू वांचविण्यासाठीं करुणेनें स्वतः अर्भकाचे प्राण घेतले होते. त्याला कचऱ्याच्या पेटीची वाट दाखविली होती.

## बंधनाच्या अलिकडे

आगीच्या ज्वाळांतून मोहनेची सुरक्षितपणें कशी मुक्तता होईल ह्याबद्दल पांच वर्षांपूर्वी तळमळणाऱ्या करुणेच्या हृदयाला मोलकरीणं बोभाटा न करतां मुलाची वासलात लावून केव्हां घरीं येते ह्याची चिंता वाटत होती.

पांच वर्षांच्या कालावधींत घडलेल्या घटनांमुळें पूर्वी मोहनेला कवटाळण्यासाठीं अधीर असलेलें करुणेचें हृदय, मोलकरणीकरवीं आज मुलाची वाट लावणं शक्य झालं म्हणून समाधानाचें निश्वास टाकीत होतें.

करुणा विधवा झाली. तिचें पाऊल वांकडें पडलें. अखेर संतति–नियमनाच्या साधनांना न जुमानतां पापानें आपलें डोकें वर काढलें आणि म्हणूनच, सामान्यतः आईला प्राणापेक्षांहि प्रिय असणाऱ्या अपत्याची करुणेनें कचऱ्याच्या पेटींत रवानगी केली.

आईचें प्रेम अब्रुच्या बंधनापलिकडे जाऊं शकत नाहीं तर ?

मातृप्रेम निस्सीम असतें ह्या वर्णनाची कविसंकेतांमध्येंच गणना करावयास नको का ?

१०

# न ओढलेली सिगारेट

डॉक्टरांनीं सिगारेट शिलगावली. दुपारीं बारा वाजतां दवाखान्यांतून घरीं परत आल्यावर साहेबी पोषाख उतरायचा व नंतर आराम-खुर्चीवर अंग टाकून स्वस्थपणें धूम्रपान करायचें असा त्यांचा परिपाठ होता.

'इश्य ! कसला नाद लागलाय्—एकसारखा धूर काढून काय मिळतं कुणाला माहित !' ह्या शब्दांत डॉक्टरांच्या धूम्रपानाबद्दल कालिंदी आपली नापसंती व्यक्त करीत असे. डॉक्टरांच्या नाकातोंडांतून धुराचे लोट बाहेर येऊं लागल्यावर आज सुद्धां तिनें तेच शब्द उच्चारले.

डॉक्टरसाहेब आज जरा जादा खुशींत दिसत होते. त्यांचा स्वभाव आनंदी होता. शिवाय आज बऱ्याच 'व्हिजिट्स' मिळाल्यामुळें त्या त्यांच्या नेहमीच्या आनंदांत आज साहजिकच अधिक भर पडली होती.

'धूम्रपान ही एक आजकालची फॅशन आहे. सिगारेट ओढणं ही सुद्धां कला आहे.' आपल्या पत्नीला धूम्रपानाची महती पटवून देण्याचा डॉक्टर-साहेबांनीं आज मनाशीं निर्धार केला होता.

'वा ! मोठीच कला आपण हस्तगत केली आहे तर !' उपरोधिक स्वरांत कालिंदीनें आपलें आश्चर्य प्रकट केलें.

'सिगारेट प्रथमच ओढणाऱ्या नवख्या माणसाला सिगारेट धरतां येत नाहीं, पेटवितां येत नाहीं, धूर काढतां येत नाहीं—त्याला ठसका लागतो आणि त्याचे प्राण कासावीस होतात.' सिगारेट ओढतां येणें म्हणजे लहान-सहान गोष्ट नव्हे हें पटवून देण्यासाठीं नवशिक्यांची तारांबळ कशी उडते ह्याचें डॉक्टरसाहेबांनी वर्णन केलें.

'चोरी करणं ही सुद्धां कला आहे. ज्याला अट्टल चोर होण्याची इच्छा आहे त्यानें धाडस, युक्ती, चापल्य, प्रसंगावधान, समयसूचकता इत्यादि गुण प्रथम संपादन केले पाहिजेत. अशा प्रकारचे गुण अट्टल चोराच्या ठिकाणीं असतात म्हणून चोरीची तरफदारी कुणी करतो काय?' कालिंदीनें सवाल टाकला.

'धूम्रपान प्रत्येकानं केलंच पाहिजे असं मी म्हणत नाहीं. ज्यांना कोणत्याहि कारणानं कां होईना धूम्रपानाची संवय-मी त्याला व्यसन म्हणायला तयार नाहीं-जडली आहे, त्यानं ती संवय टाकून देण्याचे प्रयत्न करण्याचं मुळींच कारण नाहीं असं मात्र माझं मत आहे.'

पहिली सिगारेट संपत आल्यामुळें 'ॲश ट्रे'मध्यें तिला फेकून देऊन डॉक्टरांनीं दुसरी सिगारेट पेटवली.

धूम्रपानाच्या व्यसनांत पतिराजांची स्वारी पूर्णपणें गुरफटली आहे ह्याची कालिंदीला पूर्णपणें जाणीव होती. डॉक्टरसाहेब तर धूम्रपानाची व्यसनांत गणना करण्यास बिलकूल तयार नव्हते. आपण करीत आहोंत ही गोष्ट वाईट आहे अशा प्रकारची त्यांना यत्किंचित्‌हि जाणीव नसल्यामुळें त्यांना जडलेलें धूम्रपानाचें व्यसन नाहिंसें किंवा निदान कमी तरी होईल अशी आशा करावयास जागा नव्हती. कालिंदीला वाईट वाटे तें ह्याचमुळें.

पतिराजांचें आपल्यावर गाढ प्रेम आहे ह्याची कालिंदीला खात्री होती. तथापि सिगारेटवरहि त्यांचें तसेंच गाढ प्रेम असल्यामुळें आपल्या शब्दासाठीं डॉक्टर सिगारेट सोडून देतील किंवा नाहीं ह्याचा स्पष्ट निर्णय तिला करतां येईना.

'सिगारेटच्या धुरांत विलक्षण जादू आहे. लहानपणापासूनच मला सिगारेटचा धूर आवडूं लागला. कोणी सिगारेट ओढत असला कीं मी त्याच्याजवळ जाई.' डॉक्टरांनीं पुराण सुरू केलें.

'जेवणाची आज शुद्ध आहे कीं नाहीं?' चिडक्या आवाजांत कालिंदी म्हणाली.

'युरोपिअन स्त्रिया सिगारेट ओढतात. त्यांना त्यांत कसलाहि कमीपणा वाटत नाहीं.'

'कशाला हवी आहेत त्यांचीं उदाहरणं?' कालिंदीच्या रागाचा पारा चढला होता.

'त्यांचीं उदाहरणं नको असतील तर आपलीं घ्या—कोळणी व इतर हलक्या जातींच्या बायका विड्या ओढतांना आपण पहात नाहीं काय?'

'शर्थ झाली बाई आतां! मला नाहीं आवडत हो असलीं व्यसनं. सिगारेटच्या धुरानं तर मला अगदीं कळमळायला लागलं.'

हळुहळू दुसरी सिगारेटहि संपण्याच्या बेतात आली. वास्तविक, डॉक्टरांची धूम्रपानाची तलफ आतां नाहींशी झाली होती. तथापि मुद्दाम पत्नीला चिडवून तिची गंमत पाहण्यासाठीं त्यांनीं टेबलावरील 'टिन'मधून आणखी एक सिगारेट काढून तोंडांत धरली.

कालिंदीला खरोखरच विलक्षण राग आला. त्या रागाच्या भरांत डॉक्टरांच्या तोंडांतून सिगारेट काढून तिनें ती बाहेर फेकून दिली. 'ह्या टिनमधील एकहि सिगारेट जर आज कमी झाली तर दोन दिवस आपण अन्नाला स्पर्शहि करणार नाहीं' अशी त्याच संतापाच्या भरांत तिनें प्रतिज्ञा केली.

* * * *

'टिन'मधील सिगारेटस् कालिंदीनें मुद्दाम मोजून ठेवल्या. घरांतील रामा गड्याला ही गोष्ट माहित नव्हती. कधींकधीं टिनमधून एकदोन सिगारेटस् तो अगदीं बेमालूमपणानें लांबवीत असे. आजहि त्यानें तसेंच केलें.

सिगारेट लांबवितांना योग्य ती खबरदारी आजपर्यंत त्यानें घेतली असल्यामुळें त्याची चोरी अद्यापपर्यंत उघडकीस आली नव्हती. ज्यावेळीं सिगारेटचा डबा नवीनच फोडला असेल किंवा ज्यावेळीं डब्यांत फारच थोड्या सिगारेटस् असतील अशा वेळीं केलेली सिगारेटची चोरी उघडकीस येण्याचा संभव फार हें समजण्याइतका तो धूर्त होता.

अलिकडे चारसहा दिवसांत त्यानें सिगारेट काढली नव्हती. शिवाय डब्यांतील पंचवीस तीस सिगारेटमधून आज जर एखादी सिगारेट काढली

तर ती गोष्ट डॉक्टरांच्या ध्यानीं येण्याचाहि बिलकूल संभव नव्हता हें त्याला कळून चुकलें.

डब्यांतून एक सिगारेट काढून त्यानें हातांत घेतली खरी. पण इतक्यांत कालिंदीनें हांक मारल्यामुळें त्याची विलक्षण तारांबळ उडाली.

टोपीच्या आंतील पट्टी वर करून त्यामध्यें ती सिगारेट त्यानें लपवून ठेवली व 'जी वैनीसाब' असें म्हणत मोठ्या लगबगीनें मालकीण-बाईच्या कामासाठीं तो निघून गेला.

*　*　*　*

रात्रीचें जेवण उरकून डॉक्टर दिवणखान्यांत आले. नेहमींच्या संवयी-प्रमाणें त्यांचा हात सिगारेटच्या 'टिन'वर गेला. पण कालिंदीच्या प्रतिज्ञेची त्यांना ताबडतोब आठवण झाली. म्हणून हातांत उचलून घेतलेला सिगा-रेटचा डबा त्यांनीं तसाच पुन्हां टेबलावर ठेवला. हातांतील डबा डॉक्टर ज्यावेळीं टेबलावर ठेवीत होते त्याच वेळीं स्वयंपाकगृहांत असलेल्या कालिंदीची दृष्टी दिवाणखान्याकडे गेली. तिनें तो प्रकार पाहिला. धूम्रपानाची तलफ भागविण्यासाठीं स्वारीनें नेहमींप्रमाणें डब्यांतून सिगारेट काढून डबा पुन्हां टेबलावर ठेवला अशी तिनें मनाशीं खूणगांठ बांधली.

निदान आजचा दिवस तरी कालिंदीच्या म्हणण्याप्रमाणें वागावयाचें असा डॉक्टरांनीं निर्धार केला होता.

आपली प्रतिज्ञाहि आपण पुरी पाडावयाचीच असें कालिंदीनेंहि मनाशीं ठरविलें होतें.

आपली दृष्टी सिगारेटवर गेली आहे असें समजतांच डॉक्टर सिगारेट ओढणार नाहींत असा कालिंदीला संशय आला. दोन दिवस उपास करून डॉक्टरसाहेबांना वठणीवर आणण्याचा तिचा निश्चय ठाम होता. म्हणून आपण कामांत गर्क आहोंत असें ती दाखवूं लागली व दहा मिनिटेंपर्यंत दिवाणखान्याकडे तिनें वांकड्या मानेनेंहि पाहिलें नाहीं.

'अखेर पुरुषांचीच जात! स्त्रियांच्या मनाची पर्वा तुम्हांला कोठून असणार!' दिवाणखान्यांत प्रवेश करतांना क्रुद्ध कालिंदी म्हणाली.

'काय झालं तरी काय?'

'वा! करून सवरून पुन्हां त्याची दाद सुद्धां नाहीं!!'

कालिंदीच्या म्हणण्याचा नीटसा अर्थ डॉक्टरसाहेबांना कळला नव्हता. परन्तु डॉक्टर मुद्दाम वेड पांघरीत आहेत अशी कालिंदीची खात्री झाली. दंभस्फोट करण्याच्या हेतूनें टेबलावरील सिगारेटचा डबा हातांत घेऊन ती म्हणाली—

'पहा, नीट पहा—एक सिगारेट ओढलीत कीं नाहीं? दुपारीं मी सिगारेटस् मुद्दाम मोजून ठेवल्या होत्या!'

आपण काय बोलावें ह्याचाच डॉक्टरांना उलगडा होईना. ते अगदीं भांबावून गेले होते.

'कां? आतां कां स्वस्थ राहिलांत?' कित्येक वर्षें फरारी झालेल्या चोराला पकडल्यावर डिटेक्टिव्हला जशा प्रकारचा आनंद व्हावा तशाच प्रकारचा आनंद कालिंदीला झाला.

भिंतीवरून नाहींशा झालेल्या हाराची कथा डॉक्टरांनीं शनिमहात्म्यांत वाचली होती. तशाच प्रकारचा अद्‌भुत प्रकार स्वतःच्या बाबतींत घडलेला पाहून त्यांना विलक्षण अचंबा वाटला. 'शनिमहात्म्या'च्या पोथींतील कथा भाकडकथा आहे असें त्यांना इतके दिवस वाटत होतें. परन्तु त्या कथेंत बरेंचसें तथ्य आहे असें त्यांना आज स्वानुभवावरून वाटूं लागलें.

'काय भुताटकी तर झाली नाहींना?'

'किती साळसूदपणा दाखवणं होतं आहे?'

'मला तुझाच संशय येतो! डब्यांतील सिगारेट तूंच काढून ठेवली आहेस.' थोडा विचार करून डॉक्टर म्हणाले.

डॉक्टरांनीं कालिंदीची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण व्यर्थ! 'सिगारेट ओढण्याचा माझा विचार होता—परन्तु तुझ्यासाठीं मी आज खरोखरच सिगारेट ओढली नाहीं' असें डॉक्टरांनीं कालिंदीला कितीदां तरी सांगितलें. पण ती डॉक्टरांच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्यास तयार नव्हती. तिच्याजवळ डॉक्टरांच्या धूम्रपानाचा प्रत्यक्ष पुरावा होता. डब्यांत दुपारीं सव्वीस सिगारेटस् होत्या—अर्थात् एक सिगारेट डॉक्टरांनीं रोजच्या

परिपाठाप्रमाणें ओढलीच असली पाहिजे—नव्हे ओढलीच ( कारण डॉक्टरांनां टेबलावर डबा ठेवतांना तिनें पाहिलें होतें ) अशा प्रकारचें अनुमान तिनें काढलें होतें.

पत्नीची समजूत घालण्यासाठीं नाहींशा झालेल्या सिगारेटचा हिशेब कसा द्यावा ह्याचें डॉक्टरसाहेबांना विलक्षण गूढ पडलें.

अन्नग्रहण न करण्याचा कालिंदीचा निश्चय कायम होता. ‘ अन्नावर राग काढण्यांत काय अर्थ ’ असें म्हणून ते तिला आपला हेकेखोरपणा टाकून देण्याची एकसारखी विनवणी करीत होते.

इतक्यांत टेलिफोन–बेल वाजली. एका सिरिअस् केससाठीं डॉक्टरसाहेबांना कॉल आला होता.

‘ रामा–रामा ’ डॉक्टरसाहेबांनीं हांक मारली.

टॅक्सी आणावयासाठींच आपल्याला ह्यावेळीं बोलाविलें असलें पाहिजे असा रामाचा अदमास होता. हातांत टोपी घेऊन धोतर नीट करीत करीत तो दिवाणखान्यांत आला.

‘ हे बघ, पटकन् टॅक्सी आण पाहूं.’ डॉक्टरांनीं हुकूम सोडला.

मोठ्या अदबीनें रामा डोक्यावर टोपी बसवूं लागला. इतक्यांत त्यानें दुपारीं टोपीच्या आंत ठेवलेली सिगारेट टपकन् खालीं पडली.

कामाच्या गर्दीत त्याला सिगारेटची आठवण झाली नव्हती. आपलें पाप बाहेर फुटलेलें पाहून तो ओशाळून गेला.

‘ ही पहा नाहिंशी झालेली सिगारेट ! राम्या–सिगारेटस् लांबवूं लागलास काय ?’ जमिनीवर पडलेली सिगारेट हातांत घेऊन त्यावरील ‘गोल्डफ्लेक’चा छाप न्याहाळीत डॉक्टर म्हणाले.

रामाचे पाय लटलट कांपत होते. रामानें लांबविलेली सिगारेट कालिंदीच्या हातांत देऊन डॉक्टर म्हणाले, ‘ ही पाहिलीस ? न ओढवलेली सिगारेट पाहिलीस ? आतां उपवास सोडा राणीसरकार !’

घडलेला खरा प्रकार ध्यानीं येतांच कालिंदीला विलक्षण हंसूं कोसळलें.

## ११

# चंचला

चंचला नांवाप्रमाणें चंचल आहे असा लोकांचा समज होता.

वाऱ्याबरोबर सैरावैरा फडफड करणाऱ्या पदराला कह्यांत ठेवण्याचा ती कधींहि प्रयत्न करीत नसे. म्हणून पदराप्रमाणें आपल्या नीतिमत्तेबद्दलहि ही निष्काळजी असावी अशी पदर एकसारखा सावरणाऱ्या स्त्रिया आपापसांत कुजबुज करीत.

ती अतिशय बारीक कुंकू लावी. शितावरून भाताची परीक्षा करणारे व सुतानें स्वर्गाला पोंचणारे लोक तिच्या कुंकवाच्या आकारावरून तिच्या शीलाची परीक्षा करीत.

तिरपा भांग, मानेवर रुळणारा सैलसा आंबाडा, त्यावर शोभणारी चमेलीची वेणी, कानांतून लोंबणारे इअरिंग, गळ्यांत शोभणारा कंठा, नाकांत चमकणारी चमकी, तोंडावर विलसणारें हास्य असा तिचा थाटमाट पाहून गरिबींत दिवस कंठणाऱ्या मत्सरग्रस्त स्त्रिया धुसफूस करीत व म्हणत, ' नायकिणीसारखे असले चाळे आम्हांला नाहीं माहीत ! '

रस्त्यांतून जातांना ती मान खालीं घालून जात असे. पण शिष्ट पुरुष म्हणत ' खालीं मान घालून चालणाऱ्या स्त्रियाच लबाड असतात.'

क्वचित्प्रसंगीं ती पाठीवर शेपटा सोडी. त्यावेळीं तिची निःसंकोच वृत्ती व खेळकर स्वभाव तिच्या पाठीवर खेळणाऱ्या त्या शेपट्यामध्यें प्रतीत होत असे.

फॅशनची विलक्षण आवड, मनमोकळा स्वभाव, धीटपणा, स्त्रियांप्रमाणेंच पुरुषांमध्येंहि वेळप्रसंगीं मिसळण्याची तयारी—एवंगुणविशिष्ट अशा चंचलेच्या

एकंदर वर्तणुकींत आक्षेपार्ह असा वास्तविक कोणताच भाग नव्हता. पण तिच्या धीटपणाचा लोक भलताच अर्थ करीत–छानछोकीच्या फॅशनेबल राहणीवरून निराळाच निष्कर्ष काढीत–पुरुषांमध्यें मिसळण्याच्या तयारीमध्यें तिचा वेगळाच अंतस्थ हेतू आहे असें म्हणत.

*　　　*　　　*

‘ आजचं ठिकाण पहाल तर खूष व्हाल अगदीं.’ चंचलेला आंतल्या खोलींत झोंप लागलेली आहे हें पाहून बापूराव म्हणाला.

‘ काय–काय म्हणतोस ? ’ चंचलेच्या पतीनें–बाबूरावनें–विचारलें.

‘ शोधून सांपडणार नाहीं.’

‘ पण गोवेकरणींचा वीट आला बुवा आतां.’ अंगाला आळेपिळे देत बाबुरावनें हलकेंच सांगितलें.

‘ अरे घाबरतोस काय ? अस्सल काश्मिरी ब्युटी दाखवितों ना.’

नंतर दोघांमध्यें कुजबुज सुरू झाली व थोडक्याच वेळांत प्रथम बापूराव व त्याच्या मागोमाग खिशांतील पाकिटांत नोटी कोंबीत कोंबीत बाबूरावची स्वारी घराबाहेर पडून जिना उतरूं लागली.

बाबूराव–बापूराव मित्रद्वयाचें खलबत चंचला स्वस्थपणें डोळे मिटून ऐकत होती. ते बाहेर पडल्यावर दरवाजा लावण्यासाठीं ती सहज उठून पुढें आली, तोंच—

‘ मित्राला स्वतःची बायकोहि देण्यास आमच्यासारखा मागेंपुढें पहाणार नाहीं ’ असें बापूरावचे शब्द तिच्या कानावर पडले.

चंचला स्वभावानें हौशी आणि मनमोकळेपणानें वागणारी होती खरी. परंतु तिच्या आर्यमनाला हे शब्द अगदीं तापलेल्या तेलाप्रमाणें चटका देत होते. नवमतवादाच्या सध्यांच्या बहकलेल्या ग्राम्य वासनांच्या प्रवाहांत अधो-गतीस चाललेल्या बापूराव–बाबूराव या जोडीचें दृश्य पाहून तिच्या अंतःकरणास धक्का बसला. ती मोकळ्या मनाची होती, हौशी होती, नटण्यामुरडण्याची तिला हौस होती. पण ती बहकलेली नव्हती. अर्थात् ते शब्द ऐकून तिच्या अंगावर शहारे आले. ‘ न जाणो ! असल्याच मुक्ताफळांचा आपल्या कानावर

आणखी आघात होईल कीं काय' ह्या भीतीनें तिनें दोन्ही कानांवर हात घट्ट दाबून धरले.

खिडकींतून दिसणाऱ्या रस्त्याकडे तिची दृष्टि गेली—बाबूराव विडा चघळीत व बापूराव सिगारेट फुंकीत चालले होते.

'पुरुषांचा कांहीं नियम नाहीं तर!' तिच्या मनांत विचार आला.

चंचलेच्या चेहऱ्यावर हास्य चमकत असे. परंतु त्यांत कृत्रिमता होती. कारण तिच्या हृदयांत दुःखाचा ज्वालामुखी सळसळ करीत होता.

तिच्या ओठांतून गोड आल्हाददायक शब्दच बाहेर निघत. परंतु त्यांतील बनावटपणा लपवितां येण्यासारखा नव्हता. कारण तिच्या पोटांत शोकाचा विलक्षण भडका उडाला होता.

बाहेरून ती समाधान दाखवीत होती. परन्तु तिच्या पतीनें बापूरावची धरलेली संगत व त्यामुळें त्याला जडलेलें बाहेरख्यालीपणाचें व्यसन—ह्या दोन गोष्टी तिच्या काळजाचें पाणी पाणी करून टाकीत.

नवऱ्याच्या व्यसनीपणाचा विचार आला म्हणजे ती कधीं कधीं क्रुद्ध होई. तथापि, आपली असहाय स्थिति तिच्या ताबडतोब ध्यानांत येई व त्यावेळीं तिला अब्रूनें दिवस काढण्याचें शहाणपण सुचे.

* * *

'चंचलाताई, बाबूराव नाहीं वाटतं घरीं?' बाबूराव ह्या वेळीं घरीं भेटणार नाहीं हें पक्कं माहीत असूनहि त्याच्या घरीं येऊन बापुरावनें चंचलेला प्रश्न विचारला.

नुसत्या मानेनेंच चंचलेनें नकारार्थी उत्तर दिलें.

चंचला पांढरें शुभ्र पातळ नेसली होती. चंचलेला पांढरें पातळ फारच खुलून दिसतें असें बापुरावला नेहमीं वाटे. म्हणून ती त्याला त्या वेळीं फार मोहक दिसली.

बापुरावच्या मनांत कित्येक प्रश्न उपस्थित झाले. विचारांची दाटी झाली. शंका उद्भवूं लागल्या व त्यांची समाधानकारक उत्तरेंहि दिसूं लागलीं.

हिचा दुःखभार हलका करण्याच्या मिषानें आपण हिच्याजवळ लगट केली तर ?

नवऱ्याला व्यसनापासून मुक्त करण्याचें आमिष दाखवून हिला आपल्या जाळ्यांत गुरफटविणें शक्य होईल काय ?

गोडीगुलाबीनें ती वश झाली नाहीं तर ?

लोक तिचा व माझा संबंध जोडण्यासहि मागेंपुढें पाहात नाहींत. मग तिच्यावर एकदम बलात्कार करण्याची धडाडी दाखवावी काय ?

तिनें ओरड केली तर ?

माझ्या नांवाचा लोकांत बभ्रा केला तर ?

बाबुरावजवळ माझ्या कृत्याचा बोभाटा केला तर ?

माझ्या पत्नीबाबत बाबूरावला मी वाटेल तसल्या सवलती दिल्या नाहींत काय ? वास्तविक चंचलेवर माझा हक्कच आहे. तो हक्क मी काय म्हणून गाजवूं नये ?

बापूरावला विलक्षण उन्माद चढला होता. इतक्यांत त्याला माडखोलकरांच्या ‘ शाप ’ कादंबरीची आठवण झाली. उन्मादाच्या भरांत हातून घडलेलें कृत्य पाप ठरूं शकत नाहीं अशा आशयाचें त्या कादंबरींतील वाक्य त्याला तेव्हां फारच आवडलें.

तिला आपल्या बाहुपाशांत कवटाळण्याचा त्यानें निर्धार केला व त्या निर्धारानुसार आपले दोन्ही हात पसरून तिच्याजवळ तो धांवतहि गेला.

ती बेसावध असल्यामुळें प्रथम त्यानें तिला पकडली खरी. तथापि तिला त्वेष चढल्यामुळें तिच्या अंगांत विलक्षण बळाचा संचार झाला. त्या बळाच्या जोरावर तिनें त्याचे हात सोडवून त्याला दूर लोटलें.

‘ एक वेळ गय करीत आहे–तुझ्यावर बलात्कार करीन ! काय समजलीस ? ’ अपमान असह्य होऊन बापुरावनें प्रतिज्ञा केली. बाबूराव घरीं येईल ह्या भीतीमुळें रागानें फणफणतच तो तेथून चालता झाला.

चंचलेच्या डोळ्यापुढें अंधेरी आली. हलकट बापुरावच्या नांवाचा बभ्रा करून त्याची चांगली फजीति उडवावी असा तिच्या मनांत विचार आला.

पण तिच्या मनमोकळ्या वर्तणुकीचा व फॅशनेबल वेषभूषेचा भलताच अर्थ घेऊन लोकांनीं तिच्या शीलाचे काढलेले वाभाडे तिच्या मनश्चक्षूंसमोर थैमान घालूं लागले.

‘ तुझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवण्याइतका समंजसपणा लोक दाखवितील अशी कल्पना तुला सुचते तरी कशी ?’ शंकेखोर मन तिला विचारूं लागलें.

बाबुरावच्या कानीं हें प्रकरण घालून नीच बापुरावचा पुरा बंदोबस्त करण्याची कल्पनाहि तिच्या मनांत चमकली.

‘ बापुरावच्या घरांत त्यांना कसलाच निर्बंध नाहीं. इतका मिंधेपणा पदरीं असतांना बापुरावकडे मान वर करून नुसते डोळे वटारून पाहण्याचें धाडस तरी त्यांना होईल काय ? ’ तेंच शंकेखोर मन पुनः प्रश्न करूं लागलें.

काय करावें—काय करूं नये असा तिला विलक्षण पेंच पडला.


बापुरावनें दिलेली धमकी तिच्या कानांत एकसारखी घुमूं लागली.

* * *

तिनें खोलीचें दार बंद केलें. तिच्या चेहऱ्यावर निश्चयाची छटा दिसत होती. तिनें स्टोव्ह पेटविला. आपल्या सर्व अंगावर तिनें रॉकेल ओतलें !

* * *

कॉरोनरच्या कोर्टांत चंचलेच्या मृत्यूची चौकशी झाली. ‘ स्टोव्हच्या अपघातामुळें चंचला भाजून मेली ’ असा ज्युरीनें एकमतानें निर्णय दिला !

## रुपयाचे सोळा आणे ?

आपण खर्च केलेल्या प्रत्येक रुपयाचे पक्के सोळा आणे वसूल व्हावे अशी इच्छा असल्यास आपलें प्रत्येक लहान मोठें शिवणकाम फक्त धी टेलर आणि कंपनींतच टाका. उत्तम शिलाई, माफक दर व निवडक कापडाचे नमुने आपल्याला फक्त ‘ धी टेलर आणि कंपनी ’तच मिळूं शकतील.

**धी टेलर आणि कंपनी, ( रजिस्टर्ड ) चर्नीरोड, गिरगांव—मुंबई.**

# १२

# विजयेचा विजय !

'मला आश्रय द्याल का? तुमचे उपकार मी आजन्म विसरणार नाहीं.'

आपल्या शेजारच्या खुर्चीवर बसलेल्या एका तरुण मुलीकडून अशा प्रकारचा प्रश्न विचारला जाईल अशी चिंतामणची कल्पना नव्हती. प्रथम-दर्शनीं प्रेम ही घटना जरी असंभाव्य नाहीं तरी क्वचित् प्रसंगींच जुळून येणारी आहे असें त्याला वाटत असे. म्हणून एखादी सुंदर तरुणी आपल्यावर आपल्याला पाहिल्याबरोबर प्रेमाचा वर्षाव करूं लागेल इतक्या थोर भाग्याचे आपण नाहीं असा त्याचा ठाम विश्वास होता. ज्या मुलीनें त्याला प्रश्न विचारला तिच्या जवळच्या खुर्च्यांवर दुसरे दोन पुरूष व दोन बायका बस-लेल्या होत्या. त्या कुटुंबांतीलच ती मुलगी असावी असा प्रथम त्याचा तर्क झाला. परंतु आश्रय देण्यासंबंधीं जेव्हां तिनें अनपेक्षित प्रश्न विचारला तेव्हां ती सिनेमाला एकटीच आली असली पाहिजे अशी खूणगांठ त्यानें बांधली.

'द्याल का आश्रय मला?' पहिल्या प्रश्नाला चिन्तामणकडून ताबडतोब उत्तर न मिळाल्यामुळें अत्यंत काकुळतीनें तिनें पुनः प्रश्न विचारला.

सिनेमा थिएटरसारख्या ठिकाणीं एका अनोळखी मुलीनें आपल्याला अशा प्रकारचा प्रश्न का विचारावा—हा प्रश्न विचारण्यांत तिचा कांहीं अंतस्थ हेतु आहे किंवा काय—ह्याचा चिन्तामणला उलगडा होईना. तथापि दोन वेळां प्रश्न विचारल्यामुळें तिला कांहींतरी उत्तर दिलेंच पाहिजे असें त्याला वाटलें.

'तुमचं नांव काय?'

'विजया.'

'तुम्ही मला ओळखतां!'

' नाहीं. तुमची माझी ओळख नाहीं व म्हणूनच तुमच्या साह्याची मी अपेक्षा करीत आहे. एकतर माझा फारच थोड्या माणसाशीं परिचय आहे. शिवाय नेहमींच्या परिचयाचीं व नात्याचीं माणसं संकटप्रसंगीं उपयोगी पडतात असं मला तरी निदान वाटत नाहीं.'

' तुम्ही कोणत्या संकटांत सांपडल्या आहांत ? '

' फार मोठ्या संकटांत सांपडली आहे मी. ' डोळ्यांत आलेलें पाणी विजया पुसूं लागली.

इतक्यांत इंटर्व्हल संपला. सिनेमागृहांतील दिवे घालविण्यांत येऊन दर-वाज्यावरील काळे पडदे फटाफट सरकविण्यांत आले. पडद्यावर चित्रें नाचूं लागलीं–बोलूं लागलीं. कथानकाला रंग चढला होता. विजया आपली कर्म-कथा चिन्तामणच्या कानावर घालणार होती परंतु सिनेमा पाहण्यांत चिन्तामण तल्लीन झाल्यामुळें–निदान तो तसें दाखवीत असल्यामुळें–विजयेला कांहीं काळ मौनव्रत स्वीकारणें भाग होतें.

' तुमची सारी हकीकत मला प्रथम ऐकली पाहिजे. ' विजयेचें चित्रपटाकडे लक्ष लागत नाहीं हें पाहून चित्रपट चालू असतांना मध्येंच चिन्तामणनें विजयेला हलक्या आवाजांत सांगितलें.

चिन्तामणचे शब्द कांनीं पडतांच विजयेच्या जीवांत जीव आला. चित्रपट संपतो केव्हां आणि आपली कहाणी त्याला सांगतें केव्हां असें तिला त्यावेळीं वाटूं लागलें.

' तुम्ही म्हणतां कीं मी मोठ्या संकटांत सांपडलें आहें. मग अशा वेळीं तुम्हाला सिनेमा पाहणं सुचतं तरी कसं ? ' चित्रपट संपल्यानंतर सिनेमा-गृहांतून बाहेर पडतांना चिन्तामणनें विजयेला विचारलें.

' माझं मन रिझविण्यासाठीं मी येथें आलें नाहीं. संकटांतून माझी मुक्तता करण्याबद्दल कोणातरी सधन माणसाजवळ मला याचना करावयास मिळेल ह्या हेतुनं पदरचा एक रुपया खर्चून मी आज सिनेमाला आलें. शिवाय...'

विजयेनें मदतीसाठीं मारलेली हांक व प्रेमासाठीं केलेली याचना ऐकून चिंतामणचे मनांत तिच्याविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली होती. तिच्या संक-

टाचें स्वरूप समजावून घेण्याची त्याला उत्कंठा लागली होती. म्हणून त्यानें तत्क्षणीं एका टॅक्सी ड्रायव्हरला खूण केली व विजयेसह त्या टॅक्सींत बसून तो आपल्या बिऱ्हाडीं निघाला.

चिंतामणच्या घरीं आल्यावर विजयेनें आपली कहाणी स्पष्टपणें चिंतामणच्या कानावर घातली व ती त्यानें सावधान चित्तानें ऐकली.

विजयेला आपल्या घरीं आश्रय देण्यास कोणतीहि हरकत नाहीं असें त्याला कळून चुकलें व ताबडतोब तसें त्यानें तिला सांगितलेंहि.

चिंतामणसारख्या तिऱ्हाइतानें दाखविलेलें औदार्य पाहून संकटांत सांपडलेल्या विजयेच्या उदासीन चेहऱ्यावरहि त्यावेळीं समाधानाचें सुख व प्रसन्नतेचा प्रकाश दिसल्याशिवाय राहिला नाहीं.

*  *  *  *

विजयेची आई शंकरराव सॉलिसिटरांच्या घरीं स्वयंपाकीणबाई म्हणून राहात असे. स्त्रीसौख्य व संततिसौख्य ह्यांच्या बाबतींत शंकरराव जरी दुर्दैवी होते तरी लक्ष्मीचा मात्र त्यांच्यावर चांगलाच अनुग्रह होता. विजयेच्या आईबरोबर विजयेचाहि मुलीप्रमाणें संभाळ व शिक्षण करण्याचें त्यांनीं पत्करल्यामुळें विजयाहि त्यांच्याकडेच राहात असे.

विजयेची आई आणि शंकरराव ह्यांच्या परस्पर संबंधाबाबत लोक बरीच कुजबुज करीत. विजयेच्या कानावर ही कुजबुज येई व त्यावेळीं तिला अत्यंत दुःख वाटे.

विजया फारशी सुंदर नव्हती पण कुरूपहि नव्हती. ज्या वयांत गर्दभीसुद्धां अप्सरा बनतात तें वय प्राप्त झाल्यावर मात्र ती आकर्षक दिसूं लागली. ती शंकररावांना वडिलांप्रमाणें मानी परंतु ती जसजशी वयांत येऊं लागली तसतशी तिच्यावर मुलीप्रमाणें प्रेम करण्याची कल्पना शंकररावांना कशीशीच व म्हणून त्याज्य वाटूं लागली.

विजयेच्या आईजवळ विजयेसंबंधीची आपली भावना त्यांनीं व्यक्त केली. विजयेच्या आईचे व त्यांचे संबंध इतक्या सलगीचे होते व तिच्याजवळ त्यांचा इतका वशिला होता कीं आपल्या मुलीबाबत शंकररावांनीं दर्शवि-

ल्या इच्छेविषयीं नुसती नापसंती व्यक्त करणेंहि विजयेच्या आईला अशक्य
लें असतें. शंकररावांचा विचार तिला पसंत होता ही गोष्ट निराळी!
कररावांनीं आपली मनीषा विजयेच्या आईमार्फत विजयेच्या कानावर घातली.

आई व शंकरराव ह्यांच्या परस्पर संबंधाबद्दल लोकांनीं चालविलेली कुज-
ज ऐकून तिच्या जिवाला विलक्षण रुखरुख लागली होती. त्यांत शंकर-
वांची ही नवी मागणी कानावर पडतांच तिला धक्का बसला.

तिची मॅट्रीकची परीक्षा जवळ आली होती. तथापि तें शिक्षणही नको
ाणि असल्या घरांत राहणेंहि नको असे विचार तिच्या मनांत वारंवार
ऊं लागले.

एके दिवशीं शंकररावांनीं तिचें शील चाचपून पाहण्याचा प्रयत्न केला.
ामुळें व्याधाकडून पाठलाग केल्या जाणाऱ्या हरिणीप्रमाणें अतिशय भयभीत
ऊन ती घराबाहेर पडली.

त्या निराधार स्थितींत कोणाचा तरी आश्रय घेणें तिला भाग होतें.
िनेमा पाहण्यासाठीं म्हणून जावें व तेथें एखाद्या सधन माणसाजवळ आश्र-
ची याचना करावी असें तिनें मनाशीं ठरविलें व त्याप्रमाणें सिनेमाला
ाऊन तिनें चिंतामणजवळ आश्रयाची याचना केली. चिंतामणची दयार्द्रवृत्ति
चंबळून आली व म्हणून त्यानें तिला आपल्या घरीं राहण्याची परवानगी
ली.

चिंतामणला आपली हकीकत सांगतांना विजयेनें शंकररावांच्या डावाचा
ागमूस लागूं दिला नाहीं व आपल्या आईचाहि उल्लेख केला नाहीं. माझा
ोठा आधार जो माझा वडील भाऊ तो एकाएकीं मुदतीचा ताप येऊन
ारल्यामुळें मी आतां उघडी पडली आहे असें तिनें चिंतामणला सांगितलें.

शंकररावांच्या कारस्थानाचा जर आपण स्फोट केला आणि ती गोष्ट जर
ांच्या कानावर गेली तर ते दंश धरून आपला पिच्छा पुरवतील व सूड
गविल्याशिवाय कदापि राहणार नाहींत ह्याची विजयेला जाणीव होती.
िवाय आपल्या आईनें घरांत चालविलेल्या निंद्य प्रकाराला आणखी प्रसिद्धि
ण्यास तिची हकीकत सांगून निदान आपण स्वतः तरी कारणीभूत होऊं

नये असें तिला वाटलें व म्हणूनच स्वतःला घर सोडण्यास कारणीभूत झालेली परिस्थिति तिनें चिन्तामणपासून लपवून ठेवली.

आज जवळजवळ दोन महिने ती त्याच्या छत्राखालीं राहात होती.

मोठ्या बाणेदारपणानें घराबाहेर पडून तिनें चिन्तामणचा आश्रय घेतला खरा. परंतु आपला भार त्याच्यावर पडतो हें पाहून तिला अलिकडे एक प्रकारची ओशाळगत वाटूं लागली होती.

ह्याच दोन महिन्यांच्या अल्पावधींत तिला आणखी एक विपरीत अनुभव येऊं लागला.

चिन्तामणच्या चारित्र्याबाबत शेजारपाजारचे लोक शंका प्रदर्शित करूं लागले. तो ज्या चाळींत राहात होता त्या चाळींतील गुंडांनीं तर चिन्तामणच्या देखत अगदीं उघड जरी नाहीं तरी त्याला समजेल अशी टीका सुरू केली.

विजयेला हा सर्व प्रकार डोळ्यांनीं पाहावा लागत होता. चिन्तामणच्या चारित्र्याला कलंक फासण्याचा कुटाळकंपुनें घातलेला घाट पाहून तिला फार खेद वाटे. चिन्तामणला जो त्रास सहन करावा लागतो तो केवळ आपल्यामुळेंच हा विचार तिच्या मनांत येई व त्यावेळीं तर तिला रडूं कोसळे.

पाऊस जोरानें वेडावांकडा कोसळूं लागला म्हणजे छत्रीचा निभाव लागूं देत नाहीं व छत्री धरणाऱ्या माणसालाहि भिजवतो. विजयेच्या बाबतींतहि असाच कांहींसा प्रकार घडून आला. चिन्तामणच्या छत्राखालीं वावरणाऱ्या विजयेलाहि लोकनिंदेचे चटके बसूं लागले.

त्यांत एके दिवशीं दुपारीं तिला पुढील धमकीवजा निनांवीं पत्र आलें.

‘लोकांची नाहीं तर नाहीं पण निदान मनाची सुद्धां लाज न बाळगतां तुम्ही चिंतामणजवळ बेलाशक राहात असतां. तथापि दोन दिवसांच्या आंत जर तुम्ही तेथून गेलां नाहींत तर आम्हीं चिंतामणचा पुरेपूर समाचार घेऊं. म्हणजे कधींकधीं मनापेक्षां सुद्धां लोकांची लाज कशी बाळगावी लागते त्याचें प्रत्यंतर तुम्हांला मिळेल.’

विजयेनें पत्रांतील मजकूर वाचला. आपण जर ह्यापुढें येथें राहिलों तर त्यामुळें चिंतामणवर कोणता भयंकर प्रसंग गुदरेल ह्याची स्पष्ट कल्पना तिला आली. दोन दिवसांच्या आंतच तिनें चिंतामणचें घर सोडलें.

*  *  *  *

'विजये, कां गेलीस मला सोडून !' ऑफिसांतून घरीं आल्यावर चिंतामण स्वस्थपणें विचार करीत बसला म्हणजे आपल्या मनाशींच तो हा प्रश्न विचारी.

'चिंतामण, आपला सहवास लोकांना पाहवला नाहीं. म्हणूनच तुमच्या गोड सहवासाला मी अंतरलें.' विजयेच्या अस्वस्थ मनांत असे विचार घोळूं लागले होते.

आपली सहचारिणी होण्याला विजया सर्वथैव लायक आहे अशी तिच्या सहवासावरून चिंतामणनें मनाशीं खूणगांठ बांधून ठेवली होती. योग्य प्रसंगीं आपला विचार तिच्या कानावर घालण्याचें त्यानें मनाशीं ठरविलें होतें. लाडक्या विजयेच्या सहवासांत आपला संसार सुखाचा होईल–वाटेल तीं दुःखें कोसळलीं तरी आपण त्यांना दाद देणार नाहीं अशी त्याची ठाम आणि प्रामाणिक समजूत होती.

'विजयेची टापटीप–मधुर भाषण–प्रेमळ स्वभाव–खरोखर तिच्यासारखी बायको मिळावयास मागच्या जन्मीचं भाग्य पाहिजे...' मनामध्यें असा विचार करीत चिंतामण जिना चढत होता.

जिना चढून आल्यावर तो आपल्या खोलीकडे वळला. खोलीला कुलुप असलेलें पाहून त्याचें हृदय किंचित् कंपित झालें.

स्टोव्हवर चहाचें आधण ठेवून विजया दररोज त्यावेळीं चिन्तामणची वाट पाहात असायची व संध्याकाळीं, घरीं आल्यावर, कपडे काढून विजयेची थट्टामस्करी करीत तिनें तयार केलेला चहा चिन्तामणनें घ्यावयाचा—विजया चिन्तामणाकडे राहावयास गेल्यापासून अशा प्रकारचा परिपाठच पडून गेला होता.

चिन्तामणनें खोली उघडून खालीं पडलेलें पत्र हातीं घेतलें व भीत भीत वाचण्यास सुरवात केली—

प्रिय चिन्तामण—

ह्यापुढें तुमच्या घरीं राहून तुमच्यावर संकटं ओढविण्याची माझी इच्छा नाहीं. शिवाय तुमचेवर किती दिवस मी माझा भार टाकूं ! कोणत्याहि गोष्टीला मर्यादा हवीच.

एका श्रीमंत कुटुंबांत लहान मुलींना शिकविण्याचं काम मला मिळाणार आहे. म्हणून आज मी येथून जात आहे. इतके दिवस उदार आश्रय देऊन आपण माझ्यावर जे उपकार केलेत त्याची फेड कशी करावी हेंच मला समजत नाहीं. माझा पत्ता आणखी कांहीं दिवसांनीं कळवीन. आपली,

**विजया.**

चिन्तामणबद्दल विजयेला नितांत आदर वाटत होता. आपल्या सारख्या निर्धन मुलीशीं चिन्तामण लग्न करण्यास तयार होईल असें तिला स्वप्नांतहि खरें वाटलें नसतें. कारण कुल, शील आणि धन ह्यापैकीं फक्त शीलच तिच्या-जवळ होतें. उच्च व प्रतिष्ठित कुळांत जन्म आणि पर्वताएवढीं पापें पचविणारा पैसा हीं दोन्हींहि तिच्याजवळ नव्हतीं.

पत्र वाचतांक्षणींच चिन्तामणनें हुंदके देण्यास सुरवात केली. विजयेसारख्या यःकश्चित् अबलेनें चिन्तामणला रडविलें.

‘ शेळपट पुरुषच स्त्रियांच्या संसाराचं मातेरं करतात ! ’ चिन्तामणच्या मनांत विचार आला. प्रि. अत्र्यांचें ‘ घराबाहेर ’ नाटक त्याच्या दृष्टीसमोर हलूं लागलें—निर्मलेची करुण मूर्ति त्याच्या दृष्टीस पडली. तिचा शेळपट आणि नेभळट नवराहि त्याच्या डोळ्यासमोर दिसूं लागला.

‘ विजये, माझ्या शेळपटपणामुळेंच तुला आज घराबाहेर पडावं लागलं ना ! लोकनिंदेची पर्वा मी का म्हणून करावी ? ’ विजयेला घराबाहेर जावयास लावणाऱ्या परिस्थितीचा आढावा चिन्तामणचें मन घेऊं लागलें.

आणखी चार सहा दिवसांनीं विजयेचें पुन्हां पत्र आलें. त्यांत विजयेनें स्वतःची खुशाली कळविली असून आपला पत्ताहि दिला होता.

त्या पत्त्यावर चिन्तामणनें विजयेची भेट घेतली. स्वतःच्या शेळपटपणाबद्दल तिची क्षमा मागून तिच्याशीं लग्न लावण्याचा आपला मनोदय त्यानें तिला सांगितला. ज्या गोष्टीवर आपण स्वप्नांतहि विश्वास ठेवला नसता ती गोष्ट आतां सत्यस्वरूप धारण करणार हें पाहून विजयेला आनंदाच्या गोड गुद-गुल्या व सुखाच्या संवेदना होऊं लागल्या. चिन्तामणशीं जर लग्न झालें तर ज्या परिस्थितीमुळें आपण शंरकरावांच्या घरांतून बाहेर पडलों त्या परिस्थिती-वर विजय मिळविण्यासारखेंच होणार आहे असा विचार त्यावेळीं तिच्या मनांत पटकन् चमकून गेला.

* * * *

विजया–चिन्तामणचा रजिस्टर्ड पद्धतीनें विवाह होणार होता. त्या विवा-हासंबंधींची नोटीस आज त्यांनीं दिलीहि होती.

शंकररावांच्या कानावर विजया–चिन्तामणच्या विवाहासंबंधीची बातमी गेली. चिन्तामणला पेंचांत कसा आणतां येईल ह्याचा ते विचार करूं लागले.

कर्मधर्मसंयोगानें चिन्तामण ज्या कंपनींत नोकरीस होता त्या कंपनीचें ह्याच सुमारास दिवाळें वाजल्यामुळें चिन्तामणची नोकरी सुटली होती. ‘टाइम्स’मधील जाहिरात वाचून तो सॉलिसिटर शंकरराव ह्यांच्या फर्म-मध्यें गेला. शंकररावांनीं त्याची ‘मॅनेजिंग क्लार्क’ म्हणून दरमहा शंभर रुपयांवर नेमणूक केली.

चार सहा दिवसांच्या आंतच त्यांनीं एक कट रचला. एका विश्वासू नोक-राच्या साह्यानें त्यांनीं चिन्तामणच्या अपरोक्ष त्याच्या कोटाच्या खिशांत दोन हजार रुपये ठेवण्याची व्यवस्था केली. शिवाय त्याच वेळीं त्यांनीं स्वतः खोट्या सह्या केल्या. हिशेबांतहि इतर भानगडी उपस्थित करून, चिन्तामणनें दहा हजार रुपयांची अफरातफर केल्याचा त्यांनीं लगेच दुसऱ्या दिवशीं सकाळीं कांगावा केला. शंकरराव स्वतः सॉलिसिटर असल्यामुळें अफरा-तफरीसंबंधीच्या साक्षीपुराव्याची भरपूर तयारी त्यांनीं आगाऊ करून ठेवली होती.

चिंतामणच्या गुन्ह्याचें स्वरूप शंकररावांनीं विजयेला समजावून सांगितलें. त्याबद्दल चिंतामणला जबरदस्त शिक्षा ठोठावण्यांत येईल अशी जाणीवहि त्यांनीं तिला दिली.

' त्यांना वाचवितां येईल का हो ! ' गालांवर ओघळलेले अश्रू पुशीत अत्यंत दीन मुद्रा करून विजयेनें विचारलें.

' त्यांना वाचवितां येणं कठीण आहे. पण तुझ्यासाठीं......'

' काय ? माझ्यासाठीं त्यांना वाचवाल ना तुम्ही ' अत्यंत अधीरतेनें विजयेनें प्रश्न विचारला.

' विजये, तुझ्यासाठीं मी त्याला वांचवीन ही गोष्ट खरी आहे. तुझ्यासाठीं माझा जीव तळमळतो आहे. माझं घर तूं सोडून गेल्यापासून माझ्या जिवाला चुटपुट लागली आहे. तुझ्यासाठीं—म्हणजे जर तूं माझ्याबरोबर लग्न करणार असशील तर. '

शंकररावांची कामुकता अजून कायम आहे असें दिसतांच विजया मोठमोठ्यानें हुंदके देऊं लागली.

' वियजे, मी जातों आतां—संध्याकाळच्या आंत तुझा विचार कळव. तुला जर माझ्याशीं लग्न करावयाचं नसेल तर चिंतामणला खडी फोडावयास पाठविण्याची हिंमत माझ्या अंगांत आहे. बरं—येऊं मी आतां ? '

*　　*　　*　　*

रात्रीं बाराचा सुमार.

शंकरराव व विजया ह्यांचा विवाह होऊन आज जवळजवळ पंधरा दिवस झालें होते.

विचार करीत 'सँढर्स्ट ब्रिज'वरून चिन्तामण चौपाटीकडे चालला होता.

इतक्यांत चौपाटीवरून छोटीशी ' बेबीकार ' भुर्रदिशीं निघून गेली.

गाडीकडे त्याच वेळीं चिन्तामणची दृष्टि गेली. आंत विजयेच्या मानेभोवतीं हाताचा विळखा घालून शंकरराव बसले होते.

तें दृश्य पाहून त्याच्या डोळ्यांत टचकन् पाणी आलें. झपाझप पावलें टाकीत तो चौपाटीवरील वाळूपर्यंत जाऊन पोंचला. खालीं बसून त्यानें खिशां-

तून एक पत्र आणि टॉर्च काढलीं. टॉर्चच्या प्रकाशांत तो वाचूं लागला—

‘ प्रिय चिन्तामण,

तुमच्याबद्दल मला नितांत आदर व प्रेम वाटत असतांहि मी शंकररावांशीं लग्न कसं लावलं ह्याबद्दल तुम्हाला अचंबा वाटत असेल किंवा स्त्रियांच्या विश्वाघसातकीपणाचाच हा एक मासला आहे असं तुम्ही मनांत म्हणत असाल !

माझ्या आवडत्या चिंतामणरावांनीं तुरुंगांत खडी फोडावी ही कल्पनाहि मला असह्य झाली व म्हणून शंकररावांशीं लग्न लावण्यास मी तयार झालें.

विषयवासनेपासून अलिप्त असं सात्विक आणि शुद्ध प्रकारचं प्रेम, स्त्री पुरुषावर करूं शकते अशी माझी समजूत आहे. आजपर्यंत मी तुमच्यावर अशाच प्रकारचं प्रेम केलं आणि ह्यापुढेंहि अशाच प्रकारचं प्रेम मी तुमच्या-वर निरंतर करीन.

लग्न करून प्रेमाचं प्रदर्शन आणि परिणति करण्याची परंपरा जुनी व सर्वांच्या परिचयाची आहे. तुमच्यावरील निरतिशय प्रेमामुळंच मला तुमच्याशीं लग्न करतां येत नाहीं.

परिस्थितीच्या कचाट्यांत सांपडल्यामुळं मला तुमच्याशीं लग्न करतां येत नाहीं ही गोष्ट खरी आहे. तथापि स्वार्थत्याग करून प्रियकराच्या हालअपेष्टा मी वाचवूं शकतें हा माझा विजयच समजला पाहिजे.

आपली,

**विजया.’**

विजयेची स्मृति होऊन चिंतामणच्या अंतःकरणाची ज्यावेळीं कालवाकालव होते त्यावेळीं तिचें हें पत्र वाचून तो आपल्या मनाचें समाधान करीत असतो.

## १३

# धर्मपत्नी !

पुष्पेनें गोड मुरका मारावा आणि पुनः तसाच मुरका मारण्याबद्दल प्रोफेसरनीं तिचा पिच्छा पुरवावा.

आरशांत पाहून पुष्पेनें केशरचना करावी आणि त्यावेळीं छुप्या कॅमेऱ्यानें तिचा फोटो घेण्याचा त्यांना अनिवार मोह व्हावा.

स्नानगृहांतून बाहेर पडल्यावर पुष्पेनें पांढरें पातळ नेसून केस पाठीवर मोकळे सोडावे व तें दृश्य पाहून ‘ जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभतें ’ ह्या ओळींतील सत्याची त्यांना स्मृति व्हावी.

पुष्पेनें गाल फुगवून बसावें आणि प्रोफेसरनीं त्या फुगलेल्या गालांवर टिचकी मारून तिचा उसना संताप नाहींसा करावा.

चांदण्या रात्रीं, कधींकधीं, पुष्पेनें आपलें मुखकमल प्रोफेसरांच्या विशाल छातीवर ठेवावें आणि धवल जोत्स्नेनें प्रकाशित झालेला तिचा चेहरा पाहून त्यांना कल्पनातीत समाधान वाटावें.

पुष्पा प्रोफेसरांची धर्मपत्नी होती. तिच्याकडे पाहतांक्षणींच त्यांची भूक आणि तहान हरपून जात असे.

पुष्पेच्या संगतींत आपण संकटाचे डोंगरहि उलटूं शकूं असा त्यांचा विश्वास होता.

‘ गृहिणी सचिवस्सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ’ हे अजराजानें केलेलें इंदुमतीचें वर्णन म्हणजे कालिदासाचा निव्वळ कल्पनाविलास होय अशी त्यांची पूर्वी समजूत होती. इंदुमतीसारख्या स्त्रिया—मग त्या बोटावर मोजण्याइतक्या कां असत ना—सत्यसृष्टींत असूं शकतात ह्या वस्तुस्थितीची त्यांना पुष्पेच्या सुमधुर सहवासामुळें जाणीव उत्पन्न झाली.

* * *

सुमन पुष्पेची बहिण खरी पण दोघींच्या बाह्य सौंदर्यामध्यें बराच फरक होता.

गौरकाय पुष्पेची उंची मध्यम आणि शरीरयष्टी किंचित् स्थूल होती. काळ्यासांवळ्या तथापि मोहक सुमनची उंच सडपातळ आकृति पाहिली म्हणजे ती एक तडफदार मुलगी आहे असा भास होई.

हंसतमुख पुष्पेच्या काळ्याभोर डोळ्यांमध्यें एक प्रकारचें शांत तेज चमकत असे. स्वर्गीय अप्सरा आपल्या नेत्रकटाक्षांनीं तपस्व्यांच्या तपश्चर्येचा भंग कसा करूं शकल्या असतील ह्याची कल्पना सुमनच्या भेदक पण मोहक दृष्टीवरून करतां आली असती.

पुष्पेचें लग्न होण्यापूर्वीं दोघींनींहि संध्याकाळीं बरोबर फिरावयास जावें आणि संध्यासमयीं दृष्टिगोचर होणाऱ्या नितांत रमणीय सृष्टिसौंदर्याचें निरीक्षण करून घरीं परतावें.

एकीच्या पायांत कांटा बोंचला तर त्याच्या यातना दुसरीला व्हाव्या ! पुष्पेला सुख व्हावें म्हणून सुमननें धडपड करावी आणि सुमनला त्रास होऊं नये म्हणून पुष्पेनें गडबड करावी ! पुष्पेची कोणी स्तुति करावी आणि त्याबद्दल सुमनला मूठभर मांस चढावें ! सुमनची कोणी निंदा करावी आणि त्याबद्दल संताप पुष्पेला व्हावा ! कष्ट करावें सुमननें आणि त्याचा त्रास व्हावा पुष्पेला !

* * * *

‘ सुटली बिचारी एकदांची ! ’ कुसुमची हकीकत पत्नीला सांगत असतांना प्रोफेसरनीं म्हटलें.

‘ मनांतल्या मनांत आज कित्येक दिवस ती झुरत होती.’ नेत्रावाटे आलेले अश्रु पदरानें पुशीत पुशीत पुष्पेनें उद्गार काढले.

‘ हे कसले नवरे, नरपशूच हे ! ’

‘ पण ह्याच नरपशूंचा संसार बायकांना थाटावा लागतो ना ! ’

‘ होय, हेंच तर खऱ्या पतिव्रतेचं व धर्मपत्नीचं लक्षण ! ’ उपरोधिक स्वरांत प्रोफेसर म्हणाले.

‘ किती शांत मुलगी ! किती सहनशील—’

‘ मुक्या जनावराप्रमाणं हालअपेष्टा सहन करणं हाच पतिव्रतेचा धर्म ! ’

कुसुमच्या अंताची करुण कहाणी ऐकून पुष्पेच्या अंतःकरणाला चटका बसावा ह्यांत कांहींच नवल नाहीं. कारण कुसुम पुष्पेची लहानपणापासूनची मैत्रीण. पुष्पेचें लग्न होऊन ती मुंबईस राहूं लागल्यामुळें दोघींच्या सहवासांत व्यत्यय आला खरा. तथापि नियमितपणानें दर आठवड्याला पत्रें पाठवून, दोघींनीं, एकमेकींशीं हितगुज करणें सुरू ठेवलेंच होतें. आपल्या नवऱ्याचें वर्तन बदफैलीपणाचें असल्यामुळें मला ‘ नको तें घर ’ असें होऊन गेलें आहे—मी मनांतल्या मनांत झुरत आहे असें कुसुमनें एकदां पुष्पेला स्पष्ट लिहिलें होतें. कुसुम झुरणीस लागली असली तरी तिचें मरण इतक्यांतच ओढवेल अशी पुष्पेची कल्पना नव्हती. म्हणून प्रोफेसरांच्या तोंडून कुसुमच्या निधनाची वार्ता ऐकतांच तिच्या मनाला किंचित् धक्का बसला.

‘ मागच्या रविवारींच तिचं पत्र यायचं ! तेव्हांपासून तिच्याबद्दल मला काळजी वाटत होती.’ पुष्पा प्रोफेसरना सांगूं लागली.

कुसुमच्या नवऱ्याची प्रोफेसरना अगदीं चीड आली होती. चढत्या आवाजांत ते म्हणाले, ‘ व्यभिचाराचं जसं कांहीं ह्यांचं व्रतच ! ह्यांच्या बायकांनीं मात्र नुसती वर मान करून बघण्याची देखील सोय नाहीं. आपल्या उडाणटप्पूपणामुळं बायकोला आपण किती दुःख देतो याची कल्पनाहि त्यांच्या मनाला कधीं शिवत नसेल ! ’

इतक्यांत बाहेरून कोणीतरी बेल वाजविल्यामुळें दार उघडण्यासाठीं प्रोफेसर पुढें झाले.

* * * *

पुष्पेला प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्यावर सुमननें समाधानाचा श्वास टाकला. पुष्पेच्या अत्यावस्थ स्थितीबाबत सकाळीं तार मिळाल्यापासून तिचें हृदयांत विलक्षण धडकी भरली होती. दुपारच्या गाडीनें ती पुण्याहून निघून संध्याकाळीं मुंबईला पोंहोंचली व पुष्पेचें बिऱ्हाडीं येऊन तिला पाहिल्यावर तिचा जीव खालीं पडला.

सुमन पुष्पेची शुश्रुषा करूं लागल्यापासून पंधरा दिवसाच्या आंत तिच्या प्रकृतींत फरक पडला आणि तिला थोडी हुषारी वाटूं लागली.

बहिणीची शुश्रुषा करण्यांत सुमननें दाखविलेली तत्परता आणि तिची एकंदर टापटीप पाहून प्रोफेसर तिच्यावर खूष झाले.

प्रोफेसरना कविता करण्याचा आणि लेख लिहिण्याचा नाद होता.

परंतु काव्यरचना करणें त्यांना आतां अशक्य झालें. त्यांची काव्यदृष्टि सुमनवर खिळून राहिली होती. सुमन डोळ्यासमोर असतांना कविता खरडत बसण्याइतके ते अरसिक नव्हते. काव्य वाचण्याऐवजीं अथवा लिहिण्यापेक्षां ते प्रत्यक्ष जीवनांत उतरविणेंच शहाणपणाचें असल्याबद्दल त्यांची खात्री झाली.

सुमनचें जिवंत काव्य घरांत वावरत असतांना गद्य लेख लिहिण्याचा आचरटपणा त्यांच्या हातून घडला नाहीं.

पुरुषांचें हृदय खेचून घेण्याइतकें सामर्थ्य कांहीं काळ्यासांवळ्या स्त्रियांच्याहि सौंदर्यामध्यें असते असा त्यांना सुमनकडे पाहिल्यावर अनुभव येऊं लागला.

सुमनचा सहवास म्हणजे आनंदाची लूट असली पाहिजे असा त्यांनीं तर्क बांधला.

प्रोफेसरांच्या दृष्टीची हालचाल व मनाची चलबिचल सुमनच्या लक्षांत आली.

तिचें मन त्यांच्याकडे ओढ घेऊं लागलें.

* * * *

‘ सुमा, तूं कांहीं म्हण, पण तुझ्यांत जो मोहकपणा आहे—जी जादू आहे ती पुष्पेच्यांत नाहीं ’—सुमनच्या मांडीवर चापट मारून रंगांत आलेल्या प्रोफेसरनीं आपलें हृदय खोललें.

‘ तुम्ही पुरुष भारीच उतावीळ ! ’ मानेला हिसका देऊन सुमन म्हणाली.

नव्या प्रीतिदेवतेपुढें प्रोफेसर आपल्या प्रेमाचें पुराण वाचीत होते.

खुशामतीचा तो पाल्हाळ श्रवण करीत असतांना सुमनला मनांत गोड गुदगुल्या होत होत्या.

तथापि, शृंगारशास्त्रांतील डावपेचांचें तिला संपूर्ण ज्ञान होतें. म्हणून—

तिनें मध्येंच मुरका मारावा.

मधूनमधून मानेला हिसका द्यावा.

' इश्श कांहींतरीच ! ' हे शब्द उच्चारावें.

रुमालानें तोंड पुसावें.

सहज केसांवरून हात फिरवावें.

बुचडा चाचपून पहावा.

मिस्किलपणानें हंसावें.

पदर सावरण्याचा अभिनय करावा.

चोरटी नजर फेंकावी.

लाजल्याचा आविर्भाव करून मान खालीं घालावी.

आणि सुमनचें हे बदलणारे रंग पाहून प्रोफेसरना अधिकच स्फूर्ति चढावी व नव्या उत्साहानें त्यांनीं पुनः प्रेमपुराणाचें पारायण करावें.

* * * *

सुमनला जिवाचा सोबती मिळाला. पुष्पेला जीव नकोसा वाटूं लागला.

बहिण बहिणीच्या संसाराला आग लावूं शकेल अशी निष्कपटी पण भोळसट पुष्पेची कधींच कल्पना झाली नाहीं.

स्त्रीहृदय म्हणजे एक विलक्षण गूढ आहे असें जें म्हणतात तें खोटें नाहीं असें तिला वाटूं लागले.

प्रेमी जीव निधड्या छातीचे असतात—दुसऱ्यांच्या सुखाबद्दल ते फिकीर करीत नाहींत असें ती म्हणूं लागली.

बायकोच्या बहिणीशीं—बायको जिवंत असतांना—प्रणयचेष्टा करणाऱ्या प्रणयी वीरांच्या कथा तिनें कादंबऱ्यांतून वाचल्या होत्या.

असले प्रकार कादंबऱ्यांतूनच होतात—सत्यसृष्टींत ते घडत नाहींत असा तिचा इतके दिवस समज होता.

पण ह्या समज गैरसमज असल्याचें तिला कळून चुकलें.

तिचे पतिराज आणि सुमन ह्यांच्या प्रणयचेष्टा सुरू होत्या. अशा प्रका-

रच्या प्रेमचेष्टा करून त्या दोघांनीं आपलीच चेष्टा चालविली आहे असें पुष्पेला वाटूं लागलें.

स्वतःच्या धर्मपत्नीसंबंधीच्या कर्तव्याचा प्रोफेसरना एकाएकीं विसर कसा पडला असा प्रश्न तिचें मनांत वारंवार घोळूं लागला व म्हणून ती घोंटाळ्यांत पडली.

तथापि सूक्ष्म विचारांतीं नवऱ्यानें तिच्याशीं केलेल्या प्रतारणेचें तिला नवल वाटेनासें झालें.

कारण पुरुषांचीं हृदयें कठोर असतात—अत्यंत कळकळीनें दिलेलीं वचनें ते अत्यंत बेफिकीरपणानें मोडूं शकतात हा सिद्धांत तिचें ध्यानांत येंऊं लागला.

स्त्रियांचीं मनें हळवीं असतात—अंतःकरणें मृदु असतात व हृदयें कोमल असतात हा स्त्रीस्वभावासंबंधीचा सिद्धांतहि तिनें ऐकला होता.

पण—

सुमन तिच्या दृष्टीसमोर येई. सुमनचे नाटकी हावभाव तिला दिसूं लागत.

सुमनच्या नाटकी चेष्टा पाहिल्यावर स्वतःच्या संसाराचा तमाशा तिच्या डोळ्यांपुढें नाचूं लागे व मग त्या डोळ्यांतून अश्रूंचे पुर वाहण्यास सुरवात होई.

'माझ्या सुखांत वीष कालविण्याऱ्या सुमनचं स्त्रीहृदय कोमलच आहे काय?' ही शंका वरचेवर पुष्पेच्या मनांत येऊं लागली.

## १४

# गन्डान्तर

रात्रीं दोन–अडीचचा सुमार झाला असेल. अपोलो बंदरावर शुकशुकाट झाला होता. समोरच्या ताजमहाल हॉटेलमध्यें मात्र अजून दिव्यांचा लखलखाट दिसत होता. रात्रीं जाग्रणें करणें ज्यांना परवडतें अशी श्रीमंत गुलहौशी मंडळी तेथील नाचरंगांत तल्लीन झाली होती. खालीं हॉटेलच्या जवळ मोटारींच्या रांगा लागल्या होत्या.

'हं, घे देवाचं नांव.' शास्त्र रूढीला म्हणालें. दोघेंहि अपोलो बंदरा-वरील एका दगडी कट्ट्यावर एकमेकांना बिलगून उभीं होतीं.

'मला नाहीं बाई धीर होत ! आयत्या वेळीं माझे पाय लटपटूं लागले आहेत !' शास्त्राच्या खांद्यावर हात ठेवून रूढि म्हणाली.

'रूढे, इतका चंचल स्वभाव असणं बरं नाहीं. मग सकाळीं कशाला कबूल केलंस...' रूढीनें खांद्यावर ठेवलेला हात बाजूला करीत शास्त्र रागानें म्हणालें.

'शास्त्रा, रागावूं नकोस. आम्हां बायकांची जात स्वभावतःच चंचल असते ही गोष्ट कशी विसरलास ? जीव देणं वाटतं तितकं सोप नाहीं अशी माझी आतां खात्री झाली आहे. चल, परत चल. दिवसरात्र उघडं असणारं इराण्याचं हॉटेल इथून अगदीं जवळ आहे. तिथं चहा घेऊं व गप्पा मारीत बसूं. पहिली ट्रॅम चार वाजतां निघते. त्या ट्रॅमनं मग आपण गिरगांवांत जाऊं या.'

'इराण्याच्या हॉटेलांत ! आणि चहा !! रूढे, अलिकडे तूं अगदींच ताळ सोडलास.' इराण्याच्या हॉटेलचें नांव निघतांच आपण येथें कशासाठीं आलों हें विसरून शास्त्र आश्चर्यानें आणि आवेशानें उद्गारलें.

'इराण्याच्या हॉटेलांत एकदां पिऊन तर बघ चहा, म्हणजे तूंसुद्धां ताळ सोडशील!' पदर सावरीत रूढि म्हणाली.

'किती बहकलीस!'

'इराण्याची शिफारस मी उगाच करीत नाहीं. तेथील स्वच्छता टापटीप व नोकरांची तत्परता तूं आतां प्रत्यक्षच पहा ना. शिवाय इराण्याच्या चहाची 'फ्लेवर'हि और असते. एक 'पावणा' कपाची ऑर्डर देऊन मन मानेल तितका वेळ इराण्याच्या हॉटेलांत बसतां येतं. 'दोन पैशां'च्या गिऱ्हाइकाला हॉटेलांत तासन्तास बसूं देण्याचा इराण्यांचा दिलदारपणा एका तरी हिंदु हॉटेलवाल्याजवळ असूं शकेल काय! 'विश्रांतिगृह' हें हिंदु हॉटेलांचं नांव खरं, पण तें इराण्यांच्या हॉटेलांनाच शोभून दिसतं.'

'पण त्या हॉटेलांत चार लोकांसमक्ष तूं माझ्या जवळ खुर्चीला खुर्ची लावून बसणार कीं काय?' मनांत उद्भवलेल्या शंकेचें निरसन करून घेण्यासाठीं शास्त्रानें विचारलें.

'किती खुळा आहेस! वास्तविक माणसानं कसं अगदीं अद्यावत राहिलं पाहिजे. तूं दिवसेंदिवस मागं पडत चालला आहेस. परिस्थितीप्रमाणं आपला नूर बदलला पाहिजे. आजकालची बदललेली परिस्थिति तूं मुळींच ध्यानांत घेत नाहींस. तरुण पिढीचा तुझ्यावर जो दांत आहे तो ह्याचमुळं!'

'मीं कोणता खुळेपणा केला?'

'खुळेपणा नाहींतर काय? इराण्याच्या हॉटेलांत 'फॅमिली कंपार्टमेंट' असतं ही गोष्ट इतकीं वर्षं मुंबईत राहून सुद्धां तुला माहीत नसावी ना? ह्या 'फॅमिली कंपार्टमेंट'मध्यें एकान्तांत चहा पितांना काय मौज येते, विचारूं नकोस! कॉलेजांतील विद्यार्थीविद्यार्थिनीं कॉलेजचें तास बुडवून हरहमेश ह्याच 'फॅमिली कंपार्टमेंट'मधें कालक्रमणा करीत असतात. मुंबईतील बरेचसे चोरटे प्रेमव्यवहार कुठं चालत असतील अशी तुझी कल्पना आहे?'

'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः हें माझं ब्रीद आहे. इराण्याच्या हॉटेलांत जाऊन चहा पिण्याचा बाटगेपणा माझ्या हातून कालत्रयींहि घडणार नाहीं?' शास्त्रानें ठांसून सांगितलें.

'पण आतां चार वाजेपर्यंत वेळ तरी कुठं काढणार? आपद्धर्म म्हणून एक वेळ हॉटेलांत जाण्यास कोणती हरकत आहे?'

'अग, आलीस कशासाठीं आणि निघालीस कुठं?' शास्त्र भानावर आलें. आपण येथें कशासाठीं आलों ह्याची आठवण होऊन शास्त्रानें आपलें पुराण सुरू केलें. 'तुझा जीव कुणासाठीं अडकून राहिला आहे? तुझे पाय मागं कां ओढ घेतात तेंच मला कळत नाहीं! तुझ्या किंवा माझ्या जीवनांत आतां काय मौज उरली आहे? मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम्! आपली कोणती विटंबना व्हायची राहिली आहे? आपल्या अब्रूचे आजपर्यंत जितके धिंडवडे निघाले तितके तुला पुरेसे नाहीं का झाले? ह्या लाजिरवाण्या जिण्याचा मला तर अगदीं कंटाळा आला आहे. तुला कसली भुरळ पडली आहे? हं, तयारी कर. नीट विचार करून जिवंत राहण्याचा अविचार सोडून दे? आत्महत्त्या केली तर पातक लागेल अशी भीति वाटल्यामुळं तर तूं गांगरून गेली नाहींस ना?'

'मुळींच नाहीं. शास्त्रा, पापपुण्याच्या कल्पनांनीं गांगरून जाण्याइतकी मी अजून अडाणी राहिलें नाहीं. पापपुण्याची खुळचट कल्पना लोकांमधें प्रसृत करून त्यांची दिशाभूल केल्याबद्दल तुला मात्र नरकांत काळ कंठावा लागणार!'

इतक्यांत एका पोलीस शिपायानें दोघांना हटकलें.

'ह्या वेळीं काय करीत आहांत इथं!' पोलिस शिपायानें पृच्छा केली.

'कांहीं नाहीं...कांहीं नाहीं. रीगल सिनेमाच्या शेवटच्या 'शो'ला गेलों होतों. 'शो' संपल्यावर इथं हवा खाण्यासाठीं आलों. नंतर पहांटे चार वाजे-पर्यंत ट्राम मिळणार नाहीं असं समजलं म्हणून तोंपर्यंत इथंच वेळ काढायचं ठरविलं आहे. मुंबईची आम्हांला कांहीं माहिती नाहीं. नवीनच आलों आहोंत.' शास्त्रानें थाप मारली.

जास्त चौकशी करण्याच्या भानगडींत न पडतां पोलिस शिपाई पुढें निघून गेला.

‘ रूढे, विलंब लावूं नकोस. ह्यावेळीं ‘सी. आय. डी’ ची माणसं साध्या पोषाखांत फिरत असतात. पोलीस चौकीवर जाण्याचा प्रसंग यायचा ! ’

‘ झाली माझी तयारी ! शास्त्रा, जगण्याच्या फंदांत पडणं व्यर्थ आहे असं मला सुद्धां पुन्हां वाटूं लागलं आहे. तूं म्हणतोस तेंच बरोबर ! आपली कोणती विटंबना करण्याचं लोकांनीं शिल्लक ठेवलं आहे. कांहीं कांहीं मासिकांच्या संपादकांनीं तर माझ्याविरुद्ध प्रचार करण्याची प्रतिज्ञाच केली आहे. ह्यापूर्वीच मी त्यांना कोर्टांत खेचलं असतं. पण...’ नवमतवादी मासिकांनीं चालविलेल्या आपल्या बदनामीची आठवण होऊन रूढि मुळुमुळूं रडूं लागली.

‘ नको, रडूं नको.’ खिशांतील रुमाल काढून रूढीच्या डोळ्यांतील अश्रु पुशीत पुशीत शास्त्र म्हणालें. ‘ वेडी कुठली ! अग माझीसुद्धां त्या मासिकांनीं थोडी नाहीं हेटाळणी चालविलेली ! तूं कशाला दुःख करतेस ? आपणां दोघांचा अपमान करणाऱ्या लेखकांना आणि त्यांना त्यांच्या कार्यात प्रोत्साहन देणाऱ्या साथीदारांना देव शासन करणार नाहीं असं का तुला वाटतं ? ’

‘ त्यांना शासन करण्याच्या भानगडींत पडायला मी नाहींच तयार ! मासिकं राहूं देत बाजूला पण ह्या नवमतवाद्यांनीं तर अगदीं जीव नकोसा केला आहे ! अगदीं सळो का पळो करून सोडलं आहे.’

‘ किती भोळसट आहेस तूं ! अग, मासिकांनींच नवमताचा प्रचार चालविला आहे. त्या मासिकांमुळंच लोकांमध्यें....’

‘ पुरे, पुरे ! तुझा पाल्हाळ ऐकण्याची मला मुळींच इच्छा नाहीं. मी आतां पाण्यांत उडी घेणार ! झाली तुझी तयारी ? ’ दोघेंहि पाण्यांत उडी घेणार इतक्यांत त्यांच्या दंडांना धरून त्यांना कोणीतरी मागें खेचलें.

‘ रूढे, डोक्यांत एकाएकीं अशी राख घालणं बरं दिसत नाहीं ! शास्त्रा, अशा प्रकारचा भ्याडपणा तुला शोभत नाहीं ! केवढा अविचार तुमच्या हातून आतां होणार होता बरं ! ’ शास्त्ररूढींच्या कानांवर शब्द आदळले.

आपले दंड मागें धरून ओढणाऱ्या व्यक्तीची शास्त्ररूढींना ओळख पटली. दररोज प्रसिद्ध होणाऱ्या एका सनातनी दैनिकाचा तो सनातनी संपादक होता. फोर्टमधील आपल्या पत्राच्या छापखान्यांत शेवटचीं प्रुफें तपासल्यानंतर तो हवा खाण्याच्या उद्देशानें फेरफटका करीत अपोलो बंदरावर आला होता.

‘ कशाला आमचा दंड धरलांत ? आमचीं दुःखं तुम्हांला काय समजणार ! ’ रूढीनें त्रासून विचारलें.

‘ मी संपादक आहे. मला सगळं समजतं ! रूढे, इतकं हताश होण्याचं काय कारण ? शास्त्रा, तुला आमचा पाठिंबा आहे. आम्हां सनातन्यांच्या जोरावर तूं काय वाटेल तें करूं शकशील ! आम्हांला सुद्धां तुझ्याशिवाय कोणाचा आधार आहे ? जीव देण्याचा असा आततायीपणा आम्हीं पुन्हां करणार नाहीं असं द्या पाहूं मला वचन ! ’ सनातनी संपादक अत्यंत कळवळ्यानें बोलत होता. बोलतांना त्याच्या डोळ्यांत अश्रु येत व म्हणून मधूनमधून ते अश्रु त्याला आपल्या उपरण्यानें पुसावें लागत.

सनातनी संपादकाचें सहानुभूतिपूर्ण भाषण ऐकून शास्त्राचें हृदय द्रवलें. रूढीच्या नेत्रांत कृतज्ञतेचे अश्रू चमकूं लागले.

‘ आपण आलांत म्हणून बरं झालं ! नाहींतर आज आमच्या हातून केवढा अविचार घडणार होता. आमची सर्व मदार आतां आपल्यावर आहे.’ शास्त्र आणि रूढि एकदम उद्गारलीं.

सनातनी संपादक, शास्त्र आणि रूढि ह्या तिघांनीं चार वाजेपर्यंत विविध विषयांवर गप्पा मारल्या. नंतर मंडळी ट्रॅममधून घरीं जाण्यास निघाली.

प्रार्थनासमाजच्या नाक्यावर ट्रॅम येतांच रूढि व शास्त्र खालीं उतरलीं. सनातनी संपादकाला पुढें दादरला जायचें होतें.

रूढीचा हात धरून शास्त्र झपाझप चालूं लागलें.

‘ बरं झालं, सनातनी संपादक आला म्हणून ! नाहींतर आपण विनाकारण जीव गमावून बसलों असतों ’ अशा प्रकारचा विचार मनांत आल्यामुळें दोघांच्या चेहऱ्यांवर समाधानाची छटा झळकत होती.

खेतवाडी चौथ्या गल्लीच्या दुसऱ्या टोंकाला तीं दोघें राहात होतीं.

तीं गल्लींत शिरतात न शिरतात तोंच—

‘ अयाई ऽ ऽ मे ऽ लों मेऽलों ऽ ’ अशी शास्त्रानें किंकाळी फोडली.

‘ सोडवा...सोडवा मे ऽ ऽ लें ! ’ रूढीची तर अगदीं बोबडीच वळली.

## ताडगोळे

एक नवमतवादी दोघांच्या अंगावर खंजीर उपसून धांवून आला होता. त्याचे केंस विसकटलेले दिसत होते. डोळे लाल झाले होते. खादीचा एक स्वच्छ शर्ट व हाफपँट त्यानें घातली होती.

नवमतवाद्याला पाहून शास्त्र आणि रूढीची भीतीनें गाळण उडाली.

' हं, चल बोल, समाजांत जी विषमता दिसून येते तिला कोण जबाबदार आहे ? लोकांची प्रज्ञा हरण करण्याचा धंदा कुठं शिकलास ? लोकांना स्वर्गाची लालूच दाखवून वाटेल त्या प्रकारचे अन्याय, पक्षपात आणि माणूसकीला काळिमा फासणाऱ्या गोष्टींची शिफारस करतांना तुला लाज वाटत नाहीं ? स्वर्गाचं आमिष दाखवून काम भागत नाहीं असं दिसतांच तूं नरकवासाची धमकी घालतोस, पुढील जन्माच्या कल्पित कथा सांगूं लागतोस. कुठं आहे तुझा तो स्वर्ग, तो नरक, तो पुनर्जन्म ? बोल पाहूं ? आणि ही कोण ? तुझीच साथीदारीण ! ' शास्त्राची मानगूट धरून नवमतवाद्यानें विचारलें.

' म–म–मा–माझा काय अप–प–राध...' शास्त्र अडखळत बोलूं लागलें.

' म–मा–माझा न–न–नाहीं हो ह्यांत संबंध–' रूढि गयावया करूं लागली.

' तुला मी पूर्णपणं ओळखून आहें. कित्येक वेळां शास्त्र थोडातरी समंजसपणा दाखवील. पण तुझी समजूत कांहीं केल्या होणार नाहीं. तुझ्याइतकी दुराग्रही, मूर्ख व घातकी स्त्री दुसरी सांपडणार नाहीं. लोक जों जों तुला मान देतात तों तों तूं फारच शेफारून जात चालली आहेस ! ' नवमतवादी रूढीकडे वळून क्रोधानें म्हणाला.

शास्त्राच्या पोटांत खंजीर खुपसण्यासाठीं नवमतवाद्यानें हात वर उचलला.

तथापि त्याच क्षणीं तो हात मागून खालीं ओढण्यांत आला.

हात कोणी ओढला हें पाहण्यासाठीं नवमतवाद्यानें मागें वळून पाहिलें. सुवर्णमध्याची स्वारी आपल्यासमोर उभी आहे असें त्याला त्यावेळीं दिसलें.

' अरे, तूं तर अगदीं कमालच केलीस ! रस्त्यावर कांहींतरी ओरड चालल्याचा भास झाला म्हणून बाहेर आलों, पाहतों तों तुझीच स्वारी ! '

'ह्यांच्या पाळतीवरच होतो मी इतके दिवस. आज संधि सांपडली पण आयत्या वेळीं तूंच मधें पडलास !' नवमतवाद्यानें उत्तर दिलें.

'पण कांहींतरी विचार ! खूनच करायला निघाला होतास ! मी म्हणतों शास्त्र पक्षपाती असेल, रूढि घातक असेल, परंतु आपल्या हातांनीं त्यांच्यावर शस्त्र उपसण्याचं काय कारण ?' सुवर्णमध्य सांगूं लागला.

'म्हणजे इतके दिवस दोघांची गय केली तें कुठंच गेलं ! ह्या दोघांचा प्रतिष्ठित आगलावेपणा आम्हीं किती दिवस सहन करायचा ? समाजाला ह्या दोघांची कीड लागली आहे. तिचा नायनाट कधीं करायचा ?'

'किती उतावीळ स्वभावाचा आहेस ? मला वाटतं ह्या उतावीळपणाबद्दल तुला पश्चात्ताप करण्याची पाळी येईल आणि आजपर्यंत आलीहि असेल. शास्त्राच्या आणि रूढीच्या नाशाला तूं कशाला विनाकारण कारणीभूत होतोस ? आपल्याच पापानं त्या दोघांना मरूं दे ना !' नवमतवाद्याचा हात धरून सुवर्णमध्यानें त्याला आपल्याबरोबर नेलें.

जिवावरचें गंडान्तरच टळलें असें सूचित करणारा समाधानाचा निःश्वास टाकून शास्त्ररूढी घराकडे जाण्यास निघालीं.

घरीं एकदांचें सुरक्षित कसें पोंहोंचतों अशी धागधुग आतां त्यांना वाटूं लागली !

*CINEMA RESTAURANT*

GENERAL PROVISION STORES.

Established 1909

**Sandhurst Road–Bombay 4.**

**( Opposite Khetwadi 6th Lane )**

***Best & Cheapest Hotel***

१५

# कुलीन नटी

सदानंदनें घरांत पाऊल टाकलें.

शैला आरशासमोर उभी राहून तोंडाला पावडर लावीत होती. घरांत पाऊल टाकतांना सदानंदचेंहि आरशांत प्रतिबिंब पडलें. तथापि शैलानें सदानंदकडे किंचित्हि वळून पाहिलें नाहीं. गालावर पावडरचा थर बेमालूम कसा बसवितां येईल ह्याकडेच तिचें सारें लक्ष लागून राहिलें होतें.

ऑफिसांतून घरीं दमून भागून परत आल्यावर पत्नीनें सस्मित वदनानें व मधुर भाषण करून आपलें स्वागत करावें असें कोणत्या रसिक पतीला वाटणार नाहीं ! विवाहापूर्वी सदानंदनें आपल्या भावी पत्नीबद्दल मनांत किती आकांक्षा बाळगल्या होत्या ! चित्तचक्षूंपुढें वैवाहिक जीवनाचीं किती सुरम्य चित्रें चितारलीं होतीं ! सहचारिणीच्या गोड सहवासाच्या विचारांनीं त्याला किती आनंद दिला होता !

‘ बाहेर जाण्याचा विचार आहे वाटतं ? ’ शैलाच्या शब्दांची बराच वेळ वाट पाहून शेवटीं सदानंदनेंच तिला प्रश्न विचारला.

‘ होय–आज महिलामंडळाची सभा आहे. मंडळाच्या सेक्रेटरी माझ्याकडे येऊन गेल्या. सभेचं अध्यक्षपद स्वीकारण्याची त्यांनीं मला विनंति केली आहे.’

‘ वा छान् ! आज चर्चेचा विषय कोणता आहे ? ’

‘ विधवांनीं कुंकू लावावं कीं नाहीं ? ’

‘ मग तुझं मत काय आहे ? ’

‘ माझं मत होय ? कुंकू लावण्याची किंवा न लावण्याची कुणावरच सक्ती असूं नये असं मला वाटतं. विधवेला कुंकवाची आवड असेल तर तिनं तें

खुशाल लावावं. सौभाग्यवतीला कुंकवाचा कंटाळा वाटत असेल तर तिनं तें खुशाल पुसावं.'

' विषयाची तयारी तर चांगलीच केली आहे अध्यक्षीणबाईंनीं ! ' शैलानें कुंकवावर सुरू केलेल्या पांडित्याला प्रतिबंध करून सदानंद म्हणाला. ' पण अध्यक्षीणबाईंची चहाची तयारी नाहीं ती कुठं दिसत ? अध्यक्षीणबाई आज आम्हांला चहा देणार कीं नाहीं ? "

' आतां कुठं मला वेळ आहे ? सहा वाजायला आले. दुसऱ्यांना आपल्यासाठीं तिष्ठत ठेवणं मला आवडत नाहीं.'

' घरीं चहासाठीं नवऱ्याला रखडत ठेवणं आवडतं का ? '

' बाई बाई, आतां मात्र कमाल झाली–जसें कांहीं तुम्ही चहाशिवायच राहणार आहांत. आतां हॉटेलांत जाऊन प्याल चहा.'

शैलाशीं जास्त वाद घालण्यांत अर्थ नाहीं असें मनांत आल्यामुळें सदानंद स्वस्थ बसला.

' हॉटेलमधें जायचं नसेल तर घरीं करावा चहा. कपाटांत दूध ठेवलं आहे.' जातां जातां शैला म्हणाली.

' पहातों आतां काय करायचं तें.' सदानंदहि बेफिकीरपणानें म्हणाला.

चहासाठीं मुद्दाम उठून बाहेर जाण्याचा सदानंदला कंटाळा आला होता. म्हणून सदानंद स्वयंपाकगृहांत गेला व चहासाखर, दूध, गाळणें वगैरे साहित्याची जमवाजमव करून स्टोव्ह पेटविण्यासाठीं खालीं बसला.

आदर्श पत्नी मिळावी अशी लग्नापूर्वीं त्याची फार इच्छा होती. पण लग्नानंतर त्याचा अनुभव मात्र विपरीत ठरला. आदर्श पत्नीसंबंधीच्या सदानंदच्या कल्पनेंत आणि शैलाच्या कल्पनेंत दोन ध्रुवांइतकें अंतर होतें.

' कार्येषु मंत्री करणेषु दासी
भोज्येषु माता शयनेषु रम्भा
धर्मानुकूला क्षमया धरित्री

शैलाच्या जवळ यापैकीं कोणता गुण आहे ?' स्टोव्हचा पंप करीत असतां त्याच्या मनांत विचार आला.

रूपाच्या बाबतींत शैला यथातथाच असल्यामुळें ' शयनेषु रम्भा'मध्यें तिची गणना करणें हास्यास्पद ठरलें असतें. ती कट्टर नवमतवादी होती. आचारविचारांवरील बंधनें–धर्मासंबंधीच्या जुन्या कल्पना हें एक निव्वळ थोतांड आहे असें ती नेहमीं म्हणत असे. पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांना हक्क मिळाले पाहिजेत असें मत ती प्रतिपादन करीत असल्यामुळें ' कार्येषु मन्त्री ' व ' करणेषु दासी ' हें आदर्श गृहिणीचें वर्णन तिला मान्य होण्यासारखें नव्हतेंच. स्वयंपाकगृहांतील भट्टीसमोर बसून जीभेचें कोड पुरविणाऱ्या खाद्यपेयवस्तूंच्या निर्मितीपेक्षां स्वयंपाकगृहाबाहेर पडून स्त्रियांनीं कांहींतरी विधायक कार्यक्रम हातीं घेतले पाहिजेत असा उपदेश ती स्त्रियांना करीत असे.

आणि ' कार्येषु मन्त्री–करणेषु दासी–भोज्येषु माता ' ह्यांमध्यें वर्णन केल्याप्रमाणें वागणें शैलाला शक्य तरी कसें झालें असतें ? सकाळीं आठ वाजतां उठणें–त्यानंतर साडे आठपर्यंत वर्तमानपत्रवाचन व चहा–नंतर दहापर्यंत चुलीवरून कसातरी भाजीभात उतरून टाकावयाचा–साडे दहा वाजतां सदानंद ऑफिसांत गेल्यावर केशभूषा–स्नान–वेशभूषा. दुपारीं एक वाजतां महिला-समाजांत जाऊन इंग्लीशचा क्लास घेणें–पांच वाजतां हँगिंग गार्डनवर सहल–घरीं परत आल्यावर लहर आल्यास, चुलीची आराधना करणें–नाहींतर हॉटेलांत ऑर्डर देण्याबद्दल सदानंदला हुकूम करणें, क्षुधाशमन झाल्यानंतर हार्मोनिअम वाजविणें, फोनो लावणें, चटकदार लघुकथासंग्रह वाचणें किंवा अन्य प्रकारें जिवाची करमणूक करणें—शैलाचा दैनिक कार्यक्रम अशा प्रकारचा होता.

फॅशनचा सोस, कीर्तीचा हव्यास, विद्वत्तेचा डामडौल, भावनाशून्य हृदय, बोलण्याचालण्यांत कमालीचा रुक्षपणा, पुरुषजातीबद्दल तेढ–अशा प्रकारचे गुणविशेष–अथवा दोषविशेष–शैलाच्या ठिकाणीं वास करीत होते.

' मागच्या जन्मीं मीं कोणता गुन्हा केला म्हणून ह्या जन्मीं माझी शैलाशीं गांठ पडली ? ज्यांना मनाप्रमाणें पत्नी मिळते त्यांनीं मागच्या जन्मीं कोणतेच गुन्हे केलेले नसतात काय ? गेल्या जन्मीच्या पापांचा युक्तिवाद लढवून नशिबाला दोष देणं रास्त आहे काय ? ' हे व अशाच प्रकारचे इतर प्रश्न सदानंदला सतावून सोडूं लागले. तो इतका भांबावून गेला होता कीं

समोर स्टोव्हवर दूध उतास जात होतें तेंहि त्याच्या लक्षांत आलें नाहीं. दूध पूर्णपणें उतू जाऊन ज्यावेळीं स्टोव्ह विझला त्यावेळींच त्याचें मन ठिकाणावर आलें. दूध खालीं उतरून तो फडक्यानें स्टोव्ह पुसूं लागला.

* * * *

सदानंदची पहिली नोकरी सुटून जवळजवळ सहा महिने झाले असतील. पुनः नोकरी मिळविण्यासाठीं ह्या सहा महिन्यांच्या अवधींत त्यानें जंग जंग पछाडले. 'टाइम्स'मधील 'सिच्युएशन्स व्हेकन्ट' ह्या सदराचा बारकाइनें अभ्यास करणें, दुपारीं फोर्टमधील ऑफिसांत हेलपाटे घालणें, वजनदार गृहस्थांकडून 'इन्ट्रोडक्टरी नोट्स्' मिळविणें हाच त्याचा व्यवसाय होऊन राहिला होता.

फोर्टमधील बरीचशीं ऑफिसें धुंडाळून तो आज घरीं परतला होता.

चहाचा कप हातांत घेऊन त्याच्या समोर शैला उभी होती.

'आज बरं वाटत नाहीं का ? कपाळ का दुखतं आहे ?' शैलानें प्रश्न विचारला.

शैलाचा प्रश्न ऐकून त्याला नवल वाटलें. कारण इतक्या सहानुभूतीनें त्याच्या कपाळाची व शरीरस्वास्थ्याची तिनें आजपर्यंत कधींच चौकशी केली नव्हती.

'नाहीं—जरा उन्हाचा त्रास झाला म्हणून पडलों आहे स्वस्थ.' सदानंदनें उत्तर दिलें.

'चहा घेतां ना ?'

तो कॉटवर उठून बसला आणि त्यानें शैलाच्या हातांतून चहाचा कप घेतला.

'एक गोष्ट विचारूं का ?' चहा पिऊन झाल्यावर सदानंदच्या हातांतून कप घेतांना शैलानें विचारलें.

'विचार—खुशाल विचार'

'अशी स्थिति किती दिवस चालावयाची ? त्यापेक्षां माझ्या मनांत एक विचार सुचला आहे पण तुमची परवानगी पाहिजे—द्याल का परवानगी ?'

'अग पण परवानगी कशासाठीं तें तर अगोदर समजूं दे !'

' मला वाटतं कीं मी सिनेमांत काम करावं. त्यामुळें द्रव्यप्राप्ती होऊन......'

' पण तूं कुलीन स्त्री आहेसना ? ' शैला बोलत असतांच तो उद्गारला.

सिनेमांत कामें करण्यासंबंधीचा शैलाचा विचार ऐकून सदानंदला कसेंसेंच वाटलें. सिनेमा म्हणजे कुलीन स्त्रियांना कुलटा बनविण्याचे मोठमोठे कारखानेच आहेत अशी त्याची पक्की खात्री होती. सिनेमासृष्टींत कुलीन स्त्रियांचें शील निष्कलंक राहूं शकेल असें अट्टाहासानें प्रतिपादणाऱ्या विदुषींचे लेख त्यानें वाचले होते. परंतु ती एक Improbable possibility आहे असें त्याचें मत होतें. पाण्यांत बुडी मारून अंग कोरडें ठेवणें जितकें शक्य आहे तितकेंच कुलीन स्त्रीला सिनेमासृष्टींत शीलाचा सांभाळ करणें शक्य आहे असें त्याला नेहमीं वाटे.

शैलानें त्याच्याजवळ बराच वादविवाद केला. शीलाचें रक्षण करणें किंवा तें भ्रष्ट होऊं देणें ह्या गोष्टी आपल्या हातच्या आहेत असें तिनें त्याला ठांसून सांगितलें.

शैलानें सिनेमांत जावें किंवा नाहीं ह्या प्रश्नावर त्यानें चार दिवस काथ्याकूट केला.

पुरुषजातीबद्दल शैलाला विलक्षण तेढ वाटत असे. स्त्रीस्वातंत्र्याची ती कट्टी पुरस्कर्ती होती. प्रसंग पडला तर स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं आवश्यक असणारी धडाडी आणि हिंमतहि तिच्या ठिकाणीं भरपूर होती. शिवाय त्यालाहि पैशाची गरज होती. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून शैलाला सिनेमांत जाण्याची त्यानें अखेर–कचरत कां होईना–परवानगी दिली.

* * * *

अभिनयनिपुण कुलीन सिनेमा नटी म्हणून लोक शैलाला आतां ओळखूं लागले होते. सिनेमासृष्टींत पदार्पण केल्यापासून शैलाच्या कित्येक नवीन ओळखी झाल्या होत्या.

त्यांनीं आतां वाळकेश्वरला मोठा फ्लॅट भाड्यानें घेतला होता.

शैलाच्या पूर्वीच्या आणि आजच्या पेहरावांतहि जमीन अस्मानाचें अंतर पडलें होतें.

शैला पूर्वी सकच्छ पद्धतीनें वस्त्र परिधान करीत असे.

आतां भारी किंमतीचीं जरीचीं पातळें विकच्छ पद्धतीनें ती रोज नेसूं लागली.

पूर्वी शैला क्वचितच विडा खात असे.

आतां ती तासातासाला मसाल्याची पट्टी खाऊं लागली.

पूर्वी नियमानें कपाळावर कुंकमतिलक लावणारी शैला आतां कुंकवाबद्दल अगदीं बेफिकीर बनली.

दंड झांकण्याबद्दल आणि पदर अस्ताव्यस्त न टाकण्याबद्दल पूर्वी दक्ष असणाऱ्या शैलाचा पदर आणि दंड आतां उघडे पडूं लागले.

'लीपस्टीक' लावल्याशिवाय ती आतां कधींच बाहेर पडत नसे.

सायकलवर बसण्यास आणि मोटार 'ड्राइव्ह' करण्यासहि ती आतां शिकली होती. कारण एका नव्या 'पिक्चर'मध्यें तशा प्रकारचें तिचें काम होतें.

शैलाचा बहुतेक वेळ इतर सुविख्यात नटांच्या सहवासांत जात होता. सदानंदला अलिकडे पन्नास रुपये पगाराची एक नोकरी मिळाली होती. म्हणून खोऱ्यानें पैसे ओढणारी शैला त्याला साध्या नोकराइतकीहि किंमत द्यावयास तयार नव्हती.

शैलाचें जेवणखाण ताजमहाल हॉटेलमध्यें होऊं लागलें होतें. कित्येक वेळां रात्रीं ती घरींहि येत नसे.

ह्या सर्व गोष्टी सदानंदला आवडूं लागल्या होत्या असें नाहीं. खरें सांगावयाचें म्हणजे त्याच्या संसाराचा पुरा बोजवारा उडाला होता. आदर्श पत्नीसमवेत संसार करण्याची त्याची आकांक्षा धुळीला मिळाली होती. तथापि प्राप्त परिस्थितीला तोंड देणें भाग होतें.

अलिकडे शैलानें कसलाच धरबंध ठेवला नव्हता. मोठ्या मोठ्या हॉटेलांमध्यें जाऊन ती मांसाशन आणि मदिरापानहि करूं लागली होती.

* * * *

## ताडगोळे

सदानंदशीं घटस्फोट मिळावा म्हणून शैलानें हायकोर्टाकडे 'Divorce Petition' केला.

दुसऱ्याच्या पत्नीशीं व्यभिचार केल्याचा आरोप शैलानें आपल्या जबानींत त्याच्यावर केला. 'Adultery' चा 'चार्ज' प्रस्थापित करण्यासाठीं तिनें आपल्या व्यवसायबंधूच्या साह्यानें बनावट साक्षीपुरावा हि तयार केला होता.

शैलाची जबानी चालू असतां सदानंदच्या अंगाची लाही लाही होत होती. ' कुलीन नटी'चा बुरखा घेऊन समाजांत संभावितपणें वावरणाऱ्या त्या कुलटेचें खरें स्वरूप कोर्टापुढें मांडावें अशी त्याच्या मनांत प्रबळ इच्छा उत्पन्न झाली.

' कोर्ट तुझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवणार नाहीं. शिवाय शैलाला जर तुझ्याशीं संबंध नको आहे तर कशाला तिच्या इच्छेआड येतोस ! लोक जें समजावयाचं तेंच समजतात. शैलानें तुला व्यभिचारी म्हटलं तरी जग म्हणेलच असं नाहीं. खऱ्या गोष्टीचा सुगावा लोकांना लागतोच.' विचारी मन सदानंदला सांगूं लागलें.

शैलानें केलेला आरोप त्यानें मान्य केला. तिला घटस्फोट मिळाला.

शैलानें एका सुविख्यात नटाशीं लग्न लावल्याची बातमी कांहीं दिवसांनीं त्यानें वृत्तपत्रांत वाचली.

' काय पण कुलीन नटीचा पराक्रम ! ' सदानंद मनांत उद्गारला.

## १६

# मैनी

‘ आतां कशाला हवी आहे माझी म्हातारीची अडगळ ! बोल, रमझान, जाऊं का मी घरांतून ?’ शेतामध्यें सबंध दिवस काम करून संध्याकाळीं रमझान घरीं पाऊल टाकतो न टाकतो तोंच त्याच्या आईनें—फतिमानें—त्याला प्रश्न टाकला.

‘ आई, अग झालं तरी काय ?’

‘ झालं काय ? त्या अवदसेनं आज मला शिवी दिली.’

‘ काय—काय म्हणाली ती ?’ क्रुद्ध रमझाननें प्रश्न विचारला.

‘ रमझान, मी तिला नुसतं म्हटलं कीं घरांतलीं कामं लक्षपूर्वक करावीं.’ फतिमा डोळ्यांतील अश्रू पदरानें पुसूं लागली.

‘ अग, पण ती तुला म्हणाली तरी काय ?’ रमझाननें त्रासून मघांचाच प्रश्न पुनः विचारला.

‘ तुम्ही भाजींत मीठ घालायला विसरलां आहांत असं मोठ्या उर्मटपणानं तिनं मला माझ्या तोंडावर सांगितलं.’

‘ म्हणजे तिनं कांहीं तुला शिवी दिली नाहीं !’

‘ तुला तसंच वाटणार—बायकोची बाजू घेऊन तूं आतां आईशीं भांडूं लागला आहेस. पण तिचा मगरूरपणा मी नाहीं हो सहन करणार !’

फतिमा रागानें दणदण पाय आपटीत स्वयंपाकगृहांत गेली. सासूच्या हातचा प्रसाद मिळणार ह्याची मैनीला कल्पना होतीच. तिच्या अंदाजाप्रमाणें सासूनें तिला तिचें केंस धरून ओढली. फतिमानें मैनीचे कान पिळगटले व तिच्या पाठींत रपाटेहि दिले.

द्रौपदीवस्त्रहरणाचें दृश्य ज्याप्रमाणें पांडव उघड्या डोळ्यांनीं पाहात होते त्याचप्रमाणें रमझानहि मैनीचा छळ मुकाट्यानें खालीं मान घालून सहन करीत होता.

*   *   *   *

मैनीचा छळ चालूच होता.

'चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे' ह्या म्हणीवर भरंवसा ठेवून मैनी काळ कंठीत होती.

रमझानच्या वृत्तींत मात्र अलिकडे विलक्षण बदल झाला होता. पूर्वी आईच्या विरुद्ध बायकोची बाजू घेऊन भांडण्याची धडाडी नसल्यामुळें मैनीचा फतिमेकडून होणारा छळ तो मुकाट्यानें सहन करीत असे. आई मैनीचा छळ करते तें योग्यच करते अशी अलिकडे त्याची समजूत झाली होती. फतिमानें रमझानला इतकें भारून टाकलें होतें, मैनीविरुद्ध त्याचे कान इतके फुंकलें होतें, कीं दरवेळीं सासूसुनेच्या भांडणांत मैनीच गुन्हेगार असली पाहिजे असें तो धरून चालत असे.

एक दिवस मैनीच्या हातून भाजींत जास्त मीठ पडलें व भाजी खारट झाली. ह्या घोर अपराधाबद्दल फतिमानें मैनीचा यथेच्छ समाचार घेतला. रडून रडून मैनीचे डोळे लाल झाले.

रात्रीं अकरा वाजतां मैनी माडीवर आपल्या खोलींत निजण्यासाठीं आली. जिना चढून वर आल्यावर फतिमाच्या खोलींत कुजबुज चालली असल्याचें तिला ऐकूं आलें. दाराआड उभी राहून तिनें कानोसा घेतला. फतिमा व रमझान कसला तरी बेत करीत असावींत असा तिला त्यांच्या अस्पष्ट कुजबुजीवरून संशय आला.

'चल, तयारी कर—आज मी तुला तुझ्या बापाकडे पोंचविणार आहे.' पहांटे उठून रमझान मैनीला सांगूं लागला.

माहेरीं जाण्याची मैनीनें ताबडतोब तयारी केली. तयारी करणें तिला भागच होतें. थोड्याच वेळांत रमझान मैनीसह घरांतून बाहेर पडला.

मैनीचें माहेर जवळच दोन मैलांवर होतें. रमझान—मैनी घरांतून बाहेर पडतात न पडतात तोंच बारीक पाऊस पडूं लागला. छत्री उघडून पतिपत्नी वाट चालूं लागली.

वाटेंत नदीवर बांधलेला एक पूल लागला. खिन्न वदनानें, खालीं मान घालून मैनी हळुहळु पुलावरून जात होती. पुलाच्या दुसऱ्या टोंकाशीं ती जाते न जाते तोंच रमझाननें तिला पुलाच्या खालीं मागून जोरानें ढकलली.

मैनी पुलाखालीं नदीच्या प्रवाहांत पडली. मैनीला ढकलून देतेवेळीं रमझानच्या अंतःकरणांत विलक्षण कालवाकालव झाली. ती खालीं पाण्याच्या प्रवाहांत पडली असें पाहतांच तो मागें फिरला आणि झपाट्यानें सरळ घरीं आला.

फतिमा दाराच्या उंबरठ्यांतच उभी होती. भिवया वर चढवून कुतुहलपूर्वक तिनें रमझानकडे पाहिलें.

'लावली—तिची वाट लावली!' किंचित् चिडक्या स्वरांत रमझाननें आईला सांगितलें.

जिना चढून रमझान मैनीच्या खोलींत आला. उशींत तोंड खुपसून त्यानें हुंदके देण्यास सुरवात केली. मैनीची करुणमूर्ती त्याच्या दृष्टीसमोर हलूं लागली. स्वयंपाकगृहांतील आरशासारखीं चकचकीत भांडीं त्याला नजरेसमोर दिसूं लागलीं. तिचा आवाज त्याच्या कानांत घुमूं लागला. तिची टापटीप, व्यवस्थितपणा व विनय हीं त्याच्या नेत्रांसमोर नाचूं लागलीं.

मैनीचा खून केल्याबद्दल रमझानला पश्चात्ताप होत होताच. शिवाय गुन्ह्याचा सुगावा लागून पोलिस आपल्यावर फौजदारी कोर्टांत खटला भरतात कीं काय अशी त्याला क्षणोक्षणीं धास्ती वाटत होती. बाहेर कुणाची चाहूल ऐकूं आली कीं त्याला वाटावें पोलिसरूपी यमदूतच आपल्या घरावर धाड घालण्यासाठीं पुढें येत आहे.

फतिमेच्या मनाची स्थिति सुद्धां चमत्कारिक झाली होती. रमझानकडून तिनें मैनीची वाट लावली खरी पण आतां तिचें मन तिला चैन पडूं देत नव्हतें.

दुष्ट कृत्य करण्याला आणि पचविण्याला मनाचा खंबीरपणा लागतो. विशेषतः दुष्ट कृत्य पार पाडल्यानंतर मनाचा खंबीरपणा टिकविण्याची दुष्टांना फार आवश्यकता असते. तथापि ही गोष्ट फक्त अभिजात दुष्टांनाच साधते.

फतिमा काय किंवा रमझान काय दोघांचीहि जातिवंत दुष्टांमध्यें गणना करतां येणार नाहीं. कारण रमझाननें मैनीला नदींत लोटली न लोटली तोंच त्याचें मन त्याला खाऊं लागलें—पश्चात्तापाच्या लाटा उसळी मारूं लागल्या. 'काय केलंस हें ! किती घोर कृत्य !' अशा प्रकारचे त्याच्या मनोदेवतेचे उद्गार त्याला ऐकूं येऊं लागले. लोकांनीं आपल्याभोंवतीं एकच गिल्ला केला आहे व ते कृतकर्माबद्दल आपल्याला जाब विचारीत आहेत अशीं दृश्यें अर्धवट गुंगींत त्याला दिसूं लागलीं. घराबाहेर पडण्याचीहि त्याला लाज आणि भीति वाटूं लागली.

फतिमेची सद्सद्विवेकबुद्धी तिला सुयांप्रमाणें टोचूं लागली होती. एक दिवस ती रमझानला म्हणाली—

'रमझान, मला नाहीं आतां ह्या घरांत चैन पडत !'

'बरं मग ?'

'मी कांहीं दिवस माझ्या भावाकडे जाण्याचा बेत केला आहे.'

'नीघ–चालती हो !' रमझान ओरडला.

फतिमा खरोखरच निघून गेली.

सबंध घर आ वासून आपल्याला गट्ट करण्यासाठींच जणूं काय टपलें आहे असें मैनीला नदीच्या प्रवाहांत लोटल्यापासून रमझानला वाटूं लागलें होतें. त्याची ही कल्पना फतिमा निघून गेल्यापासून तर विशेषच दुणावली.

* * * *

पश्चात्तापदग्ध रमझान खिडकींत उभा होता. रस्त्यावर त्याला मैनीचा बाप दिसला. रमझानच्या घराकडेच तो येत होता. तो मैनीचा बाप नसून वाघ आहे असें रमझानला त्यावेळीं वाटलें.

रमझानचे पाय लटलट कापूं लागले—त्याची जीभ कोरडी पडली. कपाळावर हात मारून तो मटकन् खालीं बसला.

' रमझान, मैनीला चार दिवस घरीं नेण्यासाठीं मी आलों आहे.' रमझानच्या जवळ बसून मैनीच्या बापानें रमझानला सांगितलें.

' मैनी ! हाय–बिचारी मैनी–ती बुडून मेली !! ' रमझाननें चांचरत उत्तर दिलें.

' कशी बुडाली ? '

' पुलावरून खालीं पडली. '

' ती जेव्हां पडली तेव्हां तुम्ही तिच्याबरोबर होतां ना ? '

दोन मिनिटें रमझाननें कांहींच उत्तर दिलें नाहीं. पण मग अत्यंत काकुळतेनें व अधीरतेनें तो म्हणाला—

' सांगा, मला खरं सांगा. मैनी जिवंत आहे काय ? '

' होय. तीन दिवसांपूर्वी–गुरुवारीं सकाळीं ती माझ्या घरीं आली. तिचं लुगडं पाण्यानें चींब भिजलं होतं. शिवाय ती फार थकली होती. पुलावरून पाय घसरल्यामुळं मी नदींत पडलें व प्रवाहाबरोबर वाहात वाहात जाऊं लागलें—थोडक्या अंतरावर नदीच्या कांठाशीं एक मोठा थोरला पिंपळ असल्याचं मला आढळून आलं—ह्या पिंपळाच्या मुळांचाच आधार घेऊन मी माझा जीव बचावला—अशी मैनीनें मला हकीकत सांगितली. तुम्ही तिच्याबरोबर होतां असं मजजवळ ती मुळींच म्हणाली नाहीं. रमझान, तुमच्या शरीराला इतका कंप का सुटला आहे ? मला वाटतं मैनीनें सांगितलेली हकीकत खोटी असावी ! मी तिला लोटून दिलेली नाहीं अशी घ्या पाहूं कुराणाची शपथ.'

आपण निरपराधी असल्याचें रमझान मैनीच्या बापाला आर्जवून सांगूं लागला. कांहीं वेळ दोघेहि स्तब्ध राहिले.

' तुमच्या कानावर एक गोष्ट घालण्यासाठीं मी आज मुद्दाम इथं आलों आहे.' स्तब्धतेचा भंग करून मैनीचा बाप सांगूं लागला–' आमच्या गांवां-

तील इब्राहीमच्या तरुण मुलाचें–इसाफचें–मैनीवर प्रेम बसलें आहे. मैनीशीं लग्न करण्याची त्याची तयारी आहे. इसाफशीं विवाहबद्ध होण्यास मैनीचीहि संमति आहे आणि मलाहि त्यांचा विचार मान्य आहे. म्हणून तुम्ही मैनीशीं काडीमोड करावा म्हणजे तिला इसाफशीं लग्न लावतां येईल.'

मैनीचा प्रेमळपणा, तिचें मधुर भाषण व गोड हास्य हीं सर्व रमझानला आठवलीं. मैनी दुसऱ्याची होणार ही कल्पना मनांत येतांच त्याच्या अंगावर शहारे आले. एकदम मोठ्यानें ओरडून तो म्हणाला—

'नाहीं ! मैनी माझी आहे–मी तिच्याशीं काडीमोड करणार नाहीं ! मी तिला परत घरीं आणीन !'

'पण मैनी घरीं परत आली पाहिजे ना ? सासूच्या छळाला ती पूर्णपणें कंटाळली आहे. शिवाय इसाफ श्रीमंत आहे. त्याच्यापासून तिला सुख मिळेल म्हणून मैनी इसाफशींच लग्न लावणार.'

'नाहीं–तिला इसाफशीं लग्न लावतां येणार नाहीं ! मी तिला तसं करूं देणार नाहीं.' रमझाननें दरडावून सांगितलें.

'बरं तर ! मी आतां पोलीस स्टेशनवर जाऊन तुम्ही केलेल्या घोर गुन्ह्याची वर्दी देतो. मग घडलेला खरा प्रकार मैनीकडून आम्ही काढून घेऊं. शिवाय दुसरेहि साक्षीदार आम्हांला मिळतील.'

आरोपीचा पिंजरा–कोर्ट–लोखंडी बेड्या–चाबकाचे फटकारे–जन्मठेप काळें पाणी–वगैरे दृश्यें रमझानला स्पष्टपणें दिसूं लागलीं. भीतिमुळें त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. मैनीच्या बापाच्या पायांवर डोकें ठेवून तो म्हणाला–

'एवढी गोष्ट करूं नका–माझ्यावर दया करा. तुम्ही काय सांगाल तें मी करीन. पण पोलिस स्टेशनवर वर्दी देऊं नका–मैनीशीं काडीमोड करण्याची माझी तयारी आहे.'

'एकंदरींत तुम्ही शुद्धीवर आलांत तर ! उद्यां सायंकाळीं आमच्या घरीं या. त्यावेळीं वधूला द्यावयाचा हुंडा घेऊन इसाफ हजर राहणार आहे. त्यावेळीं इतरहि साक्षीदार बोलावून आपण तुमच्या घटस्फोटाचा विधी पुरा करूं !'

* * *

मैनीच्या बापानें सांगितल्याप्रमाणें त्याच्या घरीं सायंकाळीं रमाझन जाऊन पोंचला. घरापुढील अंगणांत थोडेसे लोक जमलेले दिसत होते. एका बाजूला मैनी आणि इतर कांहीं स्त्रिया तोंडावर बुरखा ओढून बसल्या होत्या. दुसऱ्या बाजूला इसाफ व साक्षीदार बसले होते. मध्यें एक चटई पसरलेली होती. तिच्यावर हुंडा म्हणून इसाफनें देऊं केलेल्या पैशांची पिशवी ठेवण्यांत आली होती.

रमझान मुकाट्यानें मैनीच्या बापाजवळ जाऊन बसला.

साक्षीदारांच्या समक्ष ' तलक ' हा शब्द मुसलमान नवऱ्यानें तीन वेळा उच्चारला कीं त्याचा बायकोशीं घटस्फोट झाला असें मानण्यांत येतें. ' तलक ' शब्द उच्चारून रमझान मैनीला वैवाहिक पाशांतून मुक्त करील अशी तेथें जमलेल्या सर्व मंडळींची अपेक्षा होती. तथापि डोळे जमिनीकडे लावून रमझान विचारांत गुंग झाला होता.

पांच मिनिटांनीं तो उठून उभा राहिला. मैनीकडे दृष्टी स्थिर करून तो शब्द उच्चारणार तोंच मैनी एकदम त्याच्यापुढें आली आणि त्याचा हात हातांत घेऊन ती म्हणाली—

' मी तुमच्याशीं असा कोणता विश्वासघात केला आहे कीं तुम्ही माझ्याशीं घटस्फोट करावा ! तुमच्यावर माझं आत्यंतिक प्रेम आहे. तुम्ही सुखी राहवं हीच माझी इच्छा. माझा त्याग का करतां ? '

जमलेली मंडळी कुजबुज करूं लागली. सर्वांना स्तब्ध राहण्याविषयीं मैनीच्या बापानें विनंति केली.

' वेडे पोरी ! सासूच्या छळाचा तुला अजून कंटाळा आला नाहीं काय ? मूर्ख मुली, आमच्या घरांत स्वतःच्या जीविताची तरी तुला सुरक्षितता वाटते का ? ' रमझाननें हलक्या आवाजांत मैनीला प्रश्न केला.

' जीविताची पर्वा ! आयुष्य—मृत्यु हीं तर अल्लाच्या हातांत आहेत. पतीच्या सेवेंतच माझं आयुष्य गेलं पाहिजे. '

' मैनी, विचार कर. अविचार सोड !'

' नाहीं, मी तुम्हांला कधींहि सोडणार नाहीं ! ' रमझानच्या अंगाला घट्ट बिलगून मैनी म्हणाली.

मैनीच्या अंगाला स्पर्श होतांक्षणींच रमझानला रडूं कोसळलें. हुंदके देत देत व मैनीच्या पाठीवर हात फिरवीत तो म्हणाला—

' नाहीं. माझ्या लाडक्या मैनीला मी माझ्यापासून कधींहि दूर ठेवणार नाहीं. चल, आपल्या घरीं चल. सासूकडून तुझा होणारा छळहि आजपासून संपला आहे. फतिमा घर सोडून गेलीच आहे. आतां पुनः जरी ती परत आली तरी तिला मी घरांत घेणार नाहीं. इथं जमलेल्या सर्व लोकांसमक्ष मी अशी शपथ घेतों कीं फतिमेला ह्यापुढें मी घरांत थारा देणार नाहीं.: माझी लाडकी मैनीच इतःपर माझ्या घराची मालकीण होईल.'

मैनीच्या आनंदाला सीमा उरली नाहीं.

इसाफचा चेहरा काळवंडून गेला.

' हे घ्या तुमचे पैसे. माझ्या पतीबरोबर मी माझ्या घरीं जात आहें!' पैशाची पिशवी हातांत घेऊन मैनी इसाफला म्हणाली.

आमचेकडे सर्व तऱ्हेचीं, लहान मोठीं इलेक्ट्रिकल इरेक्शन, रिपेरिंग, लायटिंग व फिटिंगचीं कामें काळजीपूर्वक आणि समाधानकारक माफक दरानें करून देण्यांत येतील.

तसेंच येथें सर्व तऱ्हेचें इलेक्ट्रिकचें सामान माफक दरानें मिळेल.

जी. एम्. रानडे आणि कं.

राजबाग इस्टेट नं. १. ट्राम नाका, कांदेवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.

## १७

# त्याचा विनयभंग

शास्त्र समोरून येतांना रूढीनें पाहिलें. तिच्या कपाळावर आठ्या चढल्या—मुद्रेवर तिरस्काराच्या छटा प्रतीत होऊं लागल्या.

‘ ह्या वेळीं इकडे कुठें चाललीस ? ’ शास्त्रानें प्रश्न टाकला.

‘ अगदीं एकेरी नावानें संबोधूं लागलास. बोलण्यावागण्याची कांहीं पद्धत ! कांहीं शिष्टाचार...’

‘ निदान रूढीनें तरी मला शिष्टाचार शिकविण्याची आवश्यकता नाहीं.’ रूढीला पुरतें बोलूं न देतां शास्त्र मध्येंच तोऱ्यानें म्हणालें.

‘ माझा अगदीं उघड उघड अपमान करूं लागलास कीं ! तुझी स्वतः-बद्दल समजूत तरी काय आहे ? अलिकडे मला अगदीं कस्पटाप्रमाणं लेखूं लागला आहेस !’

‘ मी स्वतःला कोण समजतों यासंबंधीं उलाढाल करण्याचं तुला मुळींच कारण नाहीं. या गोष्टी तुला कळणार नाहींत. तुझी तेवढी योग्यता नाहींच. रस्त्यांत दिसलीस म्हणून सहज प्रश्न टाकला इतकंच.’

‘ वा ! वा ! बरीच शेखी मिरवूं लागलास ! कुठें शिकलास हा शिष्टपणा ?’ शास्त्राच्या घमेंडीची रूढीला अगदीं चीड आली होती.

‘ त्या भानगडींत बऱ्या बोलानं पडूं नकोस. माझा अपमान मी कधींही सहन करणार नाहीं. ’ शास्त्र फणकाऱ्यानें म्हणालें.

‘ तरी बरं, कोणीच मान ठेवीत नाहीं म्हणून ! ’ हंसत हंसत खंवचट-पणानें रूढी म्हणाली.

‘ म्हणजे...’ संतापानें शास्त्र अगदीं लालबुंद झालें.

‘ तुझा अपमान करायचा कोणी शिल्लक ठेवला आहे ? पुराणांतलीं वांगीं आतां पुराणांतच राहूं लागलीं नाहींत काय ? असं करा–तसं करा–असं करूं नका अशा प्रकारचे कित्येक विधिनिषेध तूं घालून दिले आहेस. पण तुला आजकाल विचारतो कोण ! माझीच सर्वत्र चलती आहे.’

‘ माझ्या शांतपणाची विनाकारण सीमा पाहूं नकोस. मागाहून पश्चात्ताप करण्याची पाळी येईल !’ रूढीच्या भाषणानें नाकाला मिरची झोंबल्यामुळें क्रुद्ध होऊन शास्त्र म्हणालें.

‘ विवाह, अस्पृश्यता, चार वर्ण, चार आश्रम, पतिव्रताधर्म, भक्ष्याभक्ष्य-निर्णय वगैरे विषयांवर तुझं काय कमी चऱ्हाट आहे ? तुझ्या कितीशा आज्ञा आज पाळल्या जातात ? तुझ्यावर किती बुरशी चढली आहे ह्याची कल्पना तरी तुला आहे का ? पहा–आरशांत तरी आपलं रूप नीट न्याहाळून घे ! ’ रूढीनें आपलें पुराण सुरू केलें.

‘ माझा आधार घेण्यासाठीं किती लोक धडपडत असतात ! जाणून बुजून आज तूं माझा अपमान करते आहेस !’

‘ तूं झोपेंत तर नाहींस ना ! नवमतवाद्यांनीं तुझी चालविलेली विटंबना पाहून मला तुझी कींव येते. स्वार्थी, कपटी, खुळचट इत्यादि विविध विशेषणांनीं तुझा धिःकार होत आहे. सर्वत्र आपलं असं हसं करून घेण्या-पेक्षां जीव दिलेला काय वाईट ?’

‘ कशाला मिजास मारतेस ? तुझा उपहास तरी काय कमी चालला आहे ? बॅ. सावरकरांनीं किर्लोस्कर मासिकांतून तुझ्यावर किती निष्ठूर हल्ले चढविले आहेत. तूं वाचतेस कां कधीं किर्लोस्कर मासिक ? ’ शास्त्रानें खोंचक प्रश्न केला.

‘ बजावून सांगते–मर्यादाभंग करूं नकोस. ’ शास्त्राच्या खोंचक प्रश्नानें निरुत्तर झाल्यामुळें रूढी चवताळली.

‘ तुझ्याशीं प्रश्नोत्तरं करीत बसलों ही मोठी चूक केली. तुझ्याजवळ

बोलतांना जर मला कोणी पाहिलं तर लोक माझी काय किंमत करतील ? बरं आहे. जातों मी आतां. ' मोठ्या ऐटीमध्यें शास्त्र जाण्यास निघालें.

' तूं इतका प्रतिष्ठित झाला असशील अशी मला कल्पना नव्हती. माझ्याशीं बोलतांना पाहिलं तर लोक तुझी किंमत करतील असं म्हणालास नाहीं कां ? कां बरं—मला कांहीं एखादी बाजारबसवी समजलास काय ?' रूढी त्वेषानें शास्त्राच्या अंगावर धांवून गेली.

रूढी शास्त्राच्या अंगावर धांवून जावयाला आणि त्याच वेळीं त्या ठिकाणीं एका संस्कृत विषयाच्या प्रोफेसरची स्वारी यावयाला एकच गांठ पडली.

' थांब—थांब, असला मवालीपणा बायकांना शोभत नाहीं. बिचारं शास्त्र ! त्याचा विनयभंग करून अब्रू घेण्याचाच विचार दिसतो तुझा ! पुरुषांनींच स्त्रियांचा विनयभंग करण्याचा परिपाठ आहे. पण रूढे, कमाल केलीस ! तूं तर पुरुषांच्या...' रूढीला उद्देशून प्रोफेसर मोठ्यानें म्हणाला. प्रोफेसरचा आवाज ऐकतांच रूढी चपापली आणि भांबावून गेल्यामुळें ती जागच्या-जागीं स्तब्ध उभी राहिली.

' मर्यादा कोणी सोडली आहे तें तुम्हीच सांगा प्रोफेसर ? ' शास्त्रानें विचारलें.

' किती दिवस तुम्हीं परस्परांशीं झगडणार ! रूढीला वाटतं—मी श्रेष्ठ—शास्त्राला वाटतं—लोकांनीं माझा अपमान करतां कामा नये ! तथापि तुम्हां दोघांहूनहि जो खरोखरच श्रेष्ठ आहे...'

' आं—माझ्याहून श्रेष्ठ ! !' रूढी उद्गारली.

' काय म्हणतां तरी काय ?' आश्चर्यानें शास्त्र स्तंभित झालें.

' होय. शाश्वत धर्म रूढीहूनहि श्रेष्ठ आहे. शास्त्रापेक्षांहि ह्या शाश्वत-धर्माची योग्यता अधिक आहे. किंबहुना हाच खरा धर्म आहे. सत्य, अहिंसा शांति, क्षमा, दया इत्यादि तत्त्वांचा ह्या शाश्वत धर्मामध्यें समावेश होतो. हा हेकेखोर नाहीं, दुराग्रही नाहीं. शास्त्राप्रमाणें खुळचट नाहीं, भोळसट नाहीं. रूढीजवळ सांपडणाऱ्या घातकीपणाचा लवलेशहि ह्याच्याजवळ तुम्हाला

मिळणार नाहीं. जे लोक विचारी असतात–ज्ञानी असतात ते शास्त्राला मान देत नाहींत आणि रूढीचीहि पर्वा बाळगीत नाहींत. ते फक्त शाश्वत धर्मच प्रमाण मानतात.' प्रोफेसर आपल्या वळणावर जाऊन गंभीर आवाजांत 'लेक्चर' देऊं लागला.

आपल्या व्याख्यानाचा शास्त्र–रूढीवर काय परिणाम होत आहे हें तो न्याहाळून पाहूं लागला.

त्यावेळीं रूढी लाजेनें मान खालीं घालून उभी होती. आणि शास्त्र! शास्त्र अत्यंत खजील झाल्यासारखें दिसत होतें.


ग्रॅम्स : "VIMAGRIH" फोन नं. २५१०२

**धी न्यू स्वस्तिक लाईफ अॅश्युअरन्स कंपनी, लिमिटेड.**

**आल्बर्ट बिल्डिंग, हॉर्नबी रोड, फोर्ट, मुंबई.**

**मॅनेजिंग एजन्टस्:–चुरी अॅन्ड कंपनी.**

पार्टनर्स :

श्री. पी. डी. चुरी    श्री. ज. श्री. अभ्यंकर, बी. ए.

आमची गॅरंटी बोनस पॉलिसी घेतल्यानें बोनस कमी होण्याची काळजी राहणार नाहीं.

**भरपूर कमिशन व सढळ अटींवर एजन्सीज् देणें आहेत.**

शेअर व सविस्तर माहितीकरितां वरील पत्त्यावर लिहा.

## १८

# संभावित

हमरस्त्यावरील आपल्या दुकानांत बसून तो रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या बायकांचें निरीक्षण करीत असे. ती त्याची नेहमींचीच वृत्ति होती. बायकांना न्याहाळणें हा त्याचा स्वभावधर्मच होता. देवदर्शनाला जाणाऱ्या बायकांचें दर्शन घेण्याची त्याला कोण उत्सुकता! कोण आतुरता!

तो निःपक्षपाती होता. बायकाबायकांमध्यें भेद मानण्याची कल्पना त्याला कधींहि शिवली नाहीं. ह्या बायका—ह्या मुली—ह्या तरुण—ह्या पोक्त असल्या क्षुल्लक भेदभावांना त्याच्या विचारी डोक्यानें आणि व्यापक दृष्टीनें कधींच थारा दिला नाहीं. शाळेच्या दिशेनें जाणाऱ्या मुली काय, चौपाटीची हवा खाण्यासाठीं निघालेल्या अल्लड तरुणी काय किंवा भाजी खरेदी करण्यासाठीं बाहेर पडलेल्या सुगृहिणी काय—ह्या साऱ्यांचा जन्म स्त्रीजातींतच झाला असल्यामुळें, त्यांच्यापैकीं कोणीहि त्याच्या भेदक दृष्टींतून सहसा सुटत नसत.

परंतु तो हलकट नव्हता. निदान लोकांनीं आपल्याला हलकट म्हणावें अशी त्याची इच्छा नव्हती. तो म्हणे—

'चोरून पाप करण्याला हरकत कोणती? मनांत पाप कोण करीत नाहीं! चोरी उमगली तरच गुन्हेगाराला शिक्षा होते. शिताफीनं चोरी करणं हा गुन्हा नसून ती लोकांना समजेल अशा निष्काळजीपणानं करणं हाच गुन्हा आहे.'

त्याच्या धूर्त व धोरणी डोक्यानें वरील सर्व गोष्टींची साधकबाधक मीमांसा केली होती. बायकांचें तो निरीक्षण करीत असे ही गोष्ट जितकी खरी तितकीच तो हें निरीक्षण चोरटेपणानें करीत असे ही गोष्टहि खरी होती.

शिवाय तो अगदींच मूर्ख नव्हता, अजागळ नव्हता. आपली खोड दुसऱ्याच्या नजरेंत भरूं नये म्हणून योग्य ती सावधगिरी बाळगण्याचें दूरदर्शित्व त्याच्याजवळ भरपूर होतें.

तो बोलूं लागला म्हणजे साक्षात् ब्रह्मचारी हनुमान्च ह्याच्या अंगांत संचारला आहे कीं काय असा क्षणभर भास झाल्यावांचून राहात नसे. आपल्या भाषणांत तो ब्रह्मचर्याचा कट्टा पुरस्कार करी. दांभिक जनांवर खूप झोड उडवून मग तो स्त्रियांवर पापी नजर ठेवणाऱ्यांचा खरपूस समाचार घेई.

स्त्रियांच्या सौंदर्याचें निष्पाप बुद्धीनें पान करण्यांत काय म्हणून हरकत असावी असा खोंचक सवाल त्याला त्याचे कलावान् मित्र वादविवादाच्या ऐन रंगांत टाकीत असत. हा प्रश्न ऐकून त्याचा संताप अनिवार होई. ' स्त्रियांचं सौंदर्य ! निष्पाप बुद्धि ! सौंदर्यपानासाठीं स्त्रियांचं निरीक्षण ! ' ह्या व अशा प्रकारच्या नानाविध कल्पना आपल्या मनःचक्षूंसमोर उभ्या असल्याचें तो दाखवी. अशा वेळीं त्यानें विलक्षण अकांडतांडव करावें आणि वादविवादाला बहारीचा रंग चढावा !

आजपर्यंत दुसऱ्या लोकांच्या बायकांजवळ त्यानें कितीदां संभाषण केलें असेल. कदाचित् हलकटपणाचे आणखीहि कांहीं प्रकार केले असतील आणि त्याबद्दल त्या बायकांनीं त्याची खूप शोभाहि केली असेल. गुपचूप होऊं नये असे झालेले सर्व प्रकार गुप्त राखण्यासाठीं त्यानें केलेल्या प्रयत्नांत आजपर्यंत त्याच्या सुदैवानें त्याला यश आलेलें होतं—निदान आजपर्यंत तो त्या बाबतींत विजयी ठरला होता.

परन्तु एकदां दैव उलटलें. तो बेसावध असतांना नशिबानें दगा दिला किंवा तो बेसावध होता म्हणूनच नशिबानें दगा दिला. तथापि समाधानाची गोष्ट ही कीं दगा देतांना नशिबानें नुसती चुणुकच दाखविली !

तो अविवाहित असला तरी चांदण्या रात्रींतील माधुर्य किंवा रसिकता त्याच्या परिचयाची होती. पण हाय ! चांदण्या रात्रीनेंच त्याचा विश्वासघात केला, त्याची फजीति उडविली. तो चौपाटीवर निघाला. चौपाटीवर इकडे तिकडे घिरट्या घातल्यानंतर एका आडोशाच्या ठिकाणीं त्याची स्वारी

थबकली. त्यानें कां थबकूं नये ! थबकण्यासारखें दृश्य समोर दिसलें असतांना थबकण्याची संधी तो फुकट कसा दवडील !

ती तरुणी त्याच्या परिचयाची नव्हती. परंतु ती त्याच्या परिचयाची नसली तरी तरुणी होती. म्हणूनच तो तेथें थबकला. ती जागा आडोशाची होती आणि त्याचें थबकणें कोणाच्याहि नजरेंत भरण्यासारखें नव्हतें.

त्याची स्थिति वेड्यासारखी झाली. तरुणीसौन्दर्यच त्याला जबाबदार होतें. त्यांत त्याचा काय अपराध ! थोड्या अंतरावरून तिच्या सौन्दर्याचें यथामति यथाशक्ति पान करण्यांत तो गुंग होऊन गेला.

एकाएकीं त्याचा भंग झाला. त्याला विलक्षण धक्का बसला. त्याची कल्पना होती कीं ती तरुणी एकटीच बसली आहे. परंतु तिचे ओंठ हलूं लागले, मंदस्मिताची गोड लकेर तिच्या मुखप्रांतावर चमकली, गालावर रक्तिमा चढला. तिच्याजवळ कोणीतरी तरुण असावा असा त्यानें निष्कर्ष काढला. असा निष्कर्ष काढणें त्याला भाग होतें. तरुणीच्या कपोलावरील रक्तिम्याचें कारण ‘ तरुण ’शिवाय दुसरें कोण असणार !

‘ इतका भाग्यवान् कोण आहे ! ’ तरुणीच्या तरुणाचा त्याला हेवा वाटूं लागला. मनाच्या गोंधळलेल्या स्थितींत तो पुढें सरकला. भाग्यवान् तरुणाची आणि त्याची दृष्टादृष्ट झाली. तो एकदम दचकला–भांबावला–गोंधळला–चमकला–चपापला–ओशाळला–मागें सरला–फजीति झाल्यामुळें खालीं मान घालून तडक दुसरीकडे निघून गेला.

तो भाग्यशाली तरुण त्याला अगदींच अपरिचित नव्हता. सकाळींच त्या तरुणाशीं त्याचा कडाक्याचा वादविवाद झाला होता आणि त्या वादविवादांत स्त्रियांवर पापी नजर ठेवून त्यांची टेहेळणी आणि न्याहाळणी करणाऱ्या ‘ संभावित हलकटां ’वर त्यानें खूप ताशेरा झाडला होता.

‘संभावित ! हलकट !!’ तो ओशाळून निघून जात असतां त्याला उद्देशून ‘ भाग्यशाली ’ तरुण तरुणीजवळ उद्गारला.

## १९

# चुकलेली वाट

प्रीतिविवाह ! किती गोड कल्पना !!

प्रीतिविवाहाच्या कल्पनेमध्यें इतकी गोडी कां आहे याची मीमांसा तो करूं लागला म्हणजे कित्येक कल्पना त्याच्या मनांत येत असत. तो म्हणे—

' खरं वैशिष्ट्य प्रीतिविवाहांतच आहे. आईबापांनीं लग्न करून दिलं तर मग त्यांत आपला पुरुषार्थ तो काय ? दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी पिण्यांत काय भूषण आहे ? स्वावलंबनाच्या उदात्त तत्त्वानुसार प्रत्येकानं स्वतःचा संसार स्वतःच थाटणं बरं ! '

प्रीतिविवाहामध्यें इतरहि बऱ्याच गंमती असल्या पाहिजेत अशी त्याची खात्री झाली होती. कारण—

नाविन्यपूर्ण कादंबऱ्यांतून सुप्रसिद्ध साहित्यिक प्रीतिविवाहावरच चर्वित-चर्वण करीत होते.

आधुनिक वाङ्मयांत प्रेमानें बराच धुमाकुळ माजविला असल्याबद्दल रुक्ष व संभावित टीकाकारांची ओरड सुरू होती.

रुपेरी पडद्यावर नाचणाऱ्या पात्रांच्या जीवनांतून प्रेम आणि विवाह हा एकच सूर स्पष्टपणें उमटत होता.

कवींना प्रेमाचें भरमसाट वेड लागलें होतें.

लव्हलेटर्स, लव्हमॅरेज, रोमान्स वगैरे विषयांवर कॉलेजांमधील विद्यार्थ्यांची चर्चा चालूच होती.

प्रणयिनी आपल्या प्रियकरांबरोबर पळून जात असल्याच्या बातम्या एकसारख्या कानावर येत होत्या.

कित्येक देशसेविका मात्र प्रेम आणि विवाह ह्यापैकीं फक्त विवाहाचाच विचार करीत होत्या. गेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळींत त्यांच्या प्रेमाचा प्रश्न सुटला होता. कोणत्या देशभक्तांच्या सान्निध्यांत देशहित साधेल ह्याचा निर्णय त्याच वेळीं त्यांनीं लावला होता. मात्र अनुदार मतें प्रदर्शित केल्याचा आरोप आपणावर येऊं नये म्हणून ह्या गोष्टी उघडपणें बोलून दाखविण्याच्या भानगडींत कोणी पडत नव्हता.

प्रीति व विवाह ह्याच विषयांना वाहिलेल्या नियतकालिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती.

प्रेमविषयक लघुकथांचा वृत्तपत्रांनीं वाचकांवर यथाशक्ति भडिमार चालविला होता.

प्रीतिविवाहाची एखादी केस कानावर आली म्हणजे जुन्या विचारसरणीच्या लोकांना प्लेगची केस कानावर आल्याचा भास होई व त्यावेळीं त्यांना किंचित् धक्का बसे. तथापि देवादिकांच्या धर्मबाह्य वर्तनाचीं वर्णनें ऐकून अथवा वाचून जुन्या विचारसरणीचे हेच लोक आनंदानें डुलत होते.

* * * *

‘ प्रीतिविवाह ! प्रीतिविवाहाचा मार्ग कोणता ? ’ त्याला पेंच पडला.

मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानांतून जातो असें त्यानें वाचलें होतें. प्रीतिविवाहाच्या मार्गाची दिशाहि कोणी दाखविली आहे किंवा काय ह्याचा तो मनाशीं विचार करूं लागला.

मरणाच्या मैदानांतून नव्हे तरी निदान चर्चगेटजवळील मैदानांतून प्रीतीचा मार्ग जाण्यास हरकत नाहीं असें त्याला वाटूं लागलें.

सूक्ष्म विचारांतीं त्याची खात्री झाली कीं प्रेमाचा मार्ग बागेंतून जातो, इराण्याच्या हॉटेलांतील ‘ फॅमिली कंपार्टमेंट ’मधून जातो, सिनेमागृहांतून जातो, चौपाटीवरून जातो, रेक्लेमेशनवरून जातो. ‘ तरुणींची आपण प्रणयाराधना करावी आणि त्यांनीं आपल्याला झुलवावें—मारीच रम्य आहे बुवा ही कल्पना ! ’ त्याला विचार सुचला.

' तरुणींच्या शृंगाराशिवाय जीवन, टेलिफोनशिवाय ऑफिस, संपादकाबांचून वृत्तपत्र, अग्रलेखावाचून दैनिक, नाटकाशिवाय नाटक मंडळी— साऱ्याच विचित्र कल्पना ! ' त्याला वाटे.

*   *   *   *

कॉलेजची ' बेल ' वाजली. प्रोफेसर क्लासमधून बाहेर पडले आणि त्यांच्या मागोमाग, विद्यार्थ्यांच्या गर्दीतून, विद्यार्थिनी, पदर सांवरीत व अंग चोरीत आपला मार्ग काढूं लागल्या.

जिन्याजवळ तो वाट पाहात उभा होता.

ती दिसल्याबरोबर तो पुढें सरकला आणि कांहींतरी बोलण्याच्या निमित्तानें त्यानें तिच्या हातांतील एक लठ्ठ पुस्तक आपल्या हातांत घेण्यासाठीं हात पुढें केला.

' अलिकडे तूं लठ्ठ पुस्तकं वाचूं लागलीं आहेस ? ' डोळे मिचकावीत तो म्हणाला.

सर्वच प्रश्न उत्तर मिळण्याच्या अपेक्षेनें विचारलेले असतात असें नाहीं आणि प्रत्येक प्रश्नाचें उत्तर दिलेंच पाहिजे असेंहि नाहीं ही गोष्ट सदाफुलीला माहीत होती.

म्हणून उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां तिनें एक गोड मुरका मात्र मारला.

तिला मुरका मारतांना पाहून त्याला आनंदाच्या विलक्षण गुदगुल्या होत होत्या. आज आपल्या जीवितार्चे खरेंखुरें सार्थक झालें असें त्याचें मन त्याला ग्वाही देऊं लागलें.

तिच्या मैत्रिणी तिला घरीं जातांना बोलवूं लागल्या. परन्तु आपल्याला दुकानांत जावयाचें आहे अशी थाप मारून तिनें त्यांना वाटेला लावलें.

मैत्रिणींचे कांटे नाहींसे करण्याबाबत त्यानें एक शक्कल लढविली.

' रीगल 'ला फारच सुंदर ' पिक्चर ' लागलं आहे असं म्हणतात. आतांच जाऊं या आपण ? ' तो विचारूं लागला.

‘ पहिला साडेतीनचा ‘शो’ सुरू व्हावयाला अजून एक तास आहे. ’ मनगटावरील ‘ रिस्टवॉच ’कडे पाहून सदाफुली म्हणाली.

‘ आणि तोंपर्यंत ? ’ प्रश्नचिन्हांकीत मुद्रा करून त्यानें विचारलें.

इतक्यांत कांहींतरी सुचल्यासारखें करून तो म्हणाला ‘ खरंच ! मला अजून चहा घ्यावयाचा आहे. मला वाटलं कीं तूं आम्हांला चहा देशील–पण तूं काय खमंग ! चहाचं नांव काढशील तर शपथ ! मीच देतो चल तुला चहा.’

* * * *

‘ तूं शेपटा सोडित जा. ’ असें त्यानें म्हणावें आणि ताबडतोब दुसऱ्या दिवशीं सदाफुलीनें शेपटा सोडून यावें.

‘ तुला गोल फॅशनचं नेसणं शोभतं. ’ असें तो म्हणण्याची खोटी कीं ताबडतोब दुसऱ्या दिवशी तिनें तशा पद्धतीचें नेसून यावें.

‘ तुझी मनीपर्स खराब झाली आहे. ’ असें तो एकदां सहज म्हणाला. तिला एक नवीन पर्स प्रेझेंट देण्याचा त्याचा विचार होता. पण त्यापूर्वीच तिनें पर्स स्वतः विकत घेतली.

एक दिवस तिनें आपल्या अंबाड्यांतील फूल काढून वासासाठीं त्याला दिलें.

तो तिची प्रणयाराधना करीत होता आणि ती सुद्धां त्याची अवहेलना करीत नव्हती.

सदाफुली त्याच्यावर खुष असतांहि त्याला आपलें कांहींतरी चुकलें आहे असें वाटूं लागलें.

मुलींच्या मागें आपण लागलों म्हणजे त्या आपल्याला झुलवीत ठेवतील अशी त्याची अपेक्षा होती.

पण त्याची अपेक्षा चुकीची ठरली. त्याचा अंदाज खोटा ठरला.

सदाफुली आपल्यावर इतकी खुश कां आहे ह्याचा तो मनाशीं शोध करूं लागला.

ती तरुणी होती पण तिच्या ठिकाणीं सौंदर्याचा मात्र पूर्ण अभाव होता. नांव सदाफुली पण चेहरा सदा रडवा ! वर्णानें काळीसांवळी. उंचीहि बेताचीच. शिवाय तोंडावर देवींच्या वर्णांची पखरण. अर्थातूच लग्नाच्या बाजारांत तिला फारच कमी 'प्रॉस्पेक्टस्' होते.

हळूहळू ह्या सर्व गोष्टी त्याच्या ध्यानांत आल्या.

ज्या गोष्टी सहज साध्य असतात त्या मिळूं लागल्या तर माणसाला त्याची किंमत वाटेनाशी होते.

हिची धोंड गळ्यांत बांधून घेण्यापेक्षां सुंदर मुलींच्या नुसत्या भुलवणींतच कितीतरी मौज असली पाहिजे—तो तर्क करूं लागला.

'आपल्या सहज आटोक्यांत येणार नाहींत अशा गोष्टीच आपण आपल्यापुढें ध्येय म्हणून ठेवल्या पाहिजेत' असे ब्राऊनिंग कवीचे उद्गार त्याला आठवले आणि पटले.

'खरी गंमत सुंदर मुलींची प्रणयाराधना करण्यांतच आहे—मग त्यांत आपल्याला अपयश आलं तरी हरकत नाहीं' असें त्याला कळून चुकलें.

'ह्या तरुणीच्या हावभावांमुळें आपण हुरळून गेलों पण आतांपर्यंत आपण स्वीकारलेला मार्ग चुकीचा आहे' अशी त्याची खात्री झाली.

जुनीं पुस्तकें विकतों व विकत घेतों—

धी गिरगांव बुक डेपो

गिरगांव ( कांदेवाडी नाका ), मुंबई नं. ४

वि. सू.—बाहेरगांवच्या ऑर्डरी अत्यंत काळजीपूर्वक त्वरित पुरविल्या जातात. बाहेरगांवीं पुस्तकें व्ही. पी. नें पाठवूं. व्यापाऱ्यांना भरपूर कमिशन.

## २०

# समाजसेवक !

स्त्री-स्वातंत्र्याचा चंद्रवदन कट्टा पुरस्कर्ता होता.

स्त्रियांच्या मानेवरील गुलामगिरीचें जोखड दूर व्हावें ह्या उद्देशानें त्यानें व त्याच्या कांहीं मित्रांनीं ' स्त्री–पारतंत्र्य–विध्वंसक–संघ ' नांवाचा एक संघ स्थापला होता.

मानेवरील गुलामगिरीच्या जोखडामुळें कोमलांगी स्त्रियांना कितपत शीण होत आहे हें अजमाविण्यासाठींच कीं काय आपल्या दृष्टिपथांत येणाऱ्या स्त्रियांना न्याहाळण्याची चंद्रवदनला संवय जडली होती.

पराधीन स्त्रियांबद्दल त्याचा जीव तीळतीळ तुटत असे. पराधीनतेच्या दडपणाखालीं स्त्रिया किती दबल्या आहेत ह्याचा अंदाज बांधण्यासाठींच तो स्त्रियांकडे पाहात असे. दैववशात् एखाद्या प्रतिभासंपन्न लेखकाची ज्याप्रमाणें लोकांकडून उपेक्षा व्हावी त्याचप्रमाणें त्या समाजसुधारकाची उपेक्षा होत होती.

लोकांना चंद्रवदनच्या कामगिरीचें महत्त्व अजून पटलें नव्हतें. स्त्रियांबद्दल त्याला कमालीची कळकळ वाटत असे. परंतु कित्येकांना त्याची दादहि नव्हती.

समाधानाची गोष्ट ही कीं निदान एका बाबतींत तरी सुधारकांशीं त्याचें साम्य होतें. नवीं नवीं मतें प्रतिपादन करणाऱ्या सुधारकांवर लोकनिंदेच्या शिंतोड्यांचें सिंचन होत असतें त्याप्रमाणें त्यालाहि लोकनिंदेचा थोडा थोडा अनुभव येऊं लागला होता.

स्त्रियांचें निरीक्षण त्यानें सहानुभूतिपूर्वक करावें परन्तु टवाळखोरांनीं म्हणावें ' ह्याला बायकांकडे पाहण्याची संवय आहे—ह्याची दृष्टि पापी आहे !'

दुसऱ्याचीं व्यंगें बाहेर काढण्यासाठीं लोक टपलेले असतात हें त्याला माहित होतें. स्त्रियांकडे आपण कोणत्या पवित्र (!) हेतूनें बघतो ह्याचें ज्ञान सर्वच लोकांना असणें शक्य नाहीं ह्याचीहि कल्पना त्याला होती. म्हणून लोकनिंदेला विनाकारण अवसर मिळूं नये ह्या स्तुत्य उद्देशानें स्त्रियांचें अगदीं चोरटेपणानें निरीक्षण करण्याची चंद्रवदन खबरदारी घेई.

परन्तु त्याची चोरटी दृष्टि लोकांच्या काकदृष्टींतून सहसा सुटत नसे. ते म्हणत–बायकाकडे पाहण्याची संवय तर वाईटच परन्तु त्यांच्याकडे चोरून पाहणं म्हणजे तर निव्वळ हलकटपणाच आहे.

स्त्रियांनीं शिक्षण घ्यावें किंवा नाहीं ह्या कित्येकांना डोकें खाजवावयास लावणाऱ्या प्रश्नाबद्दल चंद्रवदनला कधींच पेंच पडला नाहीं. स्त्री–पारतंत्र्य–विध्वंसक–संघाच्या सभेमध्यें, गणेशोत्सवांतील व्याख्यानांत, मित्रांशीं वाद-विवाद करतांना किंवा चौपाटीवर चर्चा सुरू झाली म्हणजे तो म्हणे—

' विद्येच्या योगानें स्त्रियांच्या हातून अनर्थ घडण्याचा जसा संभव आहे तसाच पुरुषांच्या हातून घडण्याचाहि संभव आहे. इतकेंच नव्हे तर पुरुषांच्या हातचे अनर्थ आपण अहोरात्र पहात आहोंत. मग अनर्थांच्या भयामुळें स्त्रियांनाच विद्या न शिकविणें हा अन्याय नव्हे काय ! '

मनुष्यनिर्मित विवाहसंस्थेचे जाचक व कृत्रिम पाश तोडल्याशिवाय समाजांतील दुःखें कधींहि नाहींशी होणार नाहींत असें तो ठासून सांगे. ' नैसर्गिक भावना दडपून टाकणं मूर्खपणाचं आहे—निसर्गाला विरोध केल्यामुळेंच जगांतील दुःखं उत्पन्न होतात ' अशी त्याची समजूत होती.

' सदाचरणाच्या धोपट मार्गानें जाणाऱ्या लोकांमध्यें हिंमत नसते–खरा दम नसतो ' असें तो म्हणत असे.

वशीकरणशास्त्रांतील खरी मख्खी चंद्रवदन आपल्या जिगर दोस्तांना कधींकधीं सांगे. त्यावेळीं तो म्हणे–' खडा मारायचाच झाला तर तो नेमका मारला पाहिजे. एक वेळ कुमारिकांची खोडी काढली तर ती अंगाशीं येण्याचा संभव कमी. पण पतिव्रतेच्या वाटेस मात्र शहाण्या माणसानं जाऊं नये. विवाहित परंतु ज्यांची नीतिमत्ता विवाद्य स्वरूपाची आहे अशा स्त्रियांशीं

लगट करण्यांत मात्र फारसा धोका नाहीं. बेवारशी विधवांशीं संधान बांधणं सगळ्यांत सोपं.'

प्रेमांत आणि युद्धांत विजय मिळविण्यासाठीं कसलेहि डावपेंच करावे ह्या सिद्धांतावर त्याचा पक्का भरंवसा होता.

समाजांत खरें स्वास्थ्य नांदावें अशी जर लोकांची इच्छा असेल तर त्यांनीं दर महिन्याच्या पंधरा तारखेला नियमितपणें प्रसिद्ध होणाऱ्या 'समाजस्वास्थ्या'चा अंक नियंमितपणें वाचलाच पाहिजे अशा मताचा तो होता.

पापपुण्याविषयींच्या त्याच्या कल्पना जर जुन्या पिढींतील लोकांनीं ऐकल्या असत्या तर त्यांना धरणीकंपाचा धक्का बसल्यासारखें झालें असतें.

नव्या जुन्याचा योग्य समन्वय करूं पाहणाऱ्या लोकांच्या अंगांवरहि त्याच्या त्या कल्पना ऐकून शहारे आले असते.

अंत्यजोद्धार, सहशिक्षण, सहवासोत्तरविवाह, मिश्रविवाह, पुनर्विवाह, रजस्वलाधर्म वगैरे प्रश्नांविषयीं त्याचीं मतें अत्यंत उदार होतीं.

सहशिक्षणासंबंधीचा चंद्रवदनचा युक्तिवाद ठरलेला असे. तो म्हणे—

मुलामुलींच्या शीलाची खरी जोपासना सहशिक्षणामुळें होणार आहे. मुलगे आणि मुली एकत्र आल्या म्हणजे त्यांना एकमेकांबद्दल आदर उत्पन्न होईल व तेव्हांच त्यांना शीलसंरक्षणाच्या जबाबदारीची जाणीव उत्पन्न होईल.

कांहींतरी समाजकार्य करण्याच्या उदात्त (!) हेतूनें त्यानें एक 'महिला-मंदिर' उघडलें.

महिलामंदिराचे वर्ग दुपारीं बारा वाजल्यापासून चार वाजेपर्यंत असत. प्रौढ स्त्रियांना इंग्रजी, मराठी, गुजराथी व हिंदी ह्या भाषांचें शिक्षण फुकट देण्याची व्यवस्था ह्या 'महिलामंदिरा'मध्यें करण्यांत आली होती.

कित्येक लेकुरवाळ्या परंतु हौशी बायकांनीं ह्या सुवर्णसंधीचा उपयोग करून घेतला. महिलामंदिरांत नियमितपणें हजर राहून मुळाक्षरांचे पाठ गिरविण्यास त्यांनीं सुरवात केली.

शुद्ध भाषा बोलण्यासाठीं अथवा लिहिण्याकरतां व्याकरणाचें महत्त्व

किती आहे हें चंद्रवदन आपल्या प्रौढ विद्यार्थिनींना विशद करून सांगूं लागला म्हणजे त्यांना त्याचें कौतुक वाटे. त्या मनांत म्हणत—

‘ स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल ह्याला किती कळकळ आहे ! स्त्रियांनीं शिकावं म्हणून स्वतःचे चार तास मोडून अडाणी बायकांजवळ काथ्याकूट करावा लागला तरी बिचारा कंटाळत नाहीं. ह्याला म्हणावं समाजकार्य ! हीच खरी देशसेवा ! हाच खरा समाजसुधारक ! ’

परंतु भोळ्याभाबड्या स्त्रियांच्या ह्या कल्पनेला एके दिवशीं जबरदस्त धक्का बसला.

कारण ‘ पहांट ’ नांवाच्या दैनिकांत खालील दोन बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या—

## चहा पितांना विनयभंग

येथील ‘महिलामंदिरा’चे संचालक त्यांच्या मंदिरांत शिकावयास जाणाऱ्या XXX ह्यांच्या घरीं काल सायंकाळीं गेले. तेथें XXXबाईनीं त्यांच्यापुढें चहाचा कप केला. महिलामंदिराच्या संचालकांनीं चहाचा कप हातांत घेतलाच व XXXबाईंचा हातहि एकाएकीं आपल्या हातांत धरला. ह्या दगलबाजीबद्दल XXXबाईनीं त्यांची हजेरी घेतली व चारचौघांसमक्ष त्यांची खूप शोभाहि केली. शिवाय ह्या विनयभंगाच्या प्रकरणाबाबत महिलामंदिराच्या संचालकां-वर त्या खटलाहि भरणार आहेत असें समजतें.

## समाजसुधारकावर फिर्याद

येथील सुप्रसिद्ध समाजसुधारक व महिलामंदिराचे संचालक श्री. चंद्रवदन ह्यांचेवर XXX नांवाच्या बाईनीं आपल्या मुलाच्या पोटगीसाठीं XXX कोर्टांत फिर्याद दाखल केली आहे. महिलामंदिराच्या संचालकांनीं माझ्याशीं ठेवलेल्या अनैतिक संबंधामुळेंच माझ्या मुलाचा जन्म झाला व म्हणून त्याच्या पालन-पोषणाची जबाबदारी महिलामंदिराच्या संचालकांवर आहे असें XXXबाईनीं आपल्या फिर्यादींत म्हटलें आहे.

अर्थात्‌च, ज्या दिवशीं ह्या दोन बातम्या प्रसिद्ध झाल्या त्या दिवसापासून महिलामंदिराचे वर्ग ओस पडले.